एस वाय बी कॉम * अभ्यासक्रम - सेमिस्टर 3
व्यवसायिक अर्थशास्त्र (समग्र)

## प्रकरण 1 - समग्र अर्थशास्त्राची ओळख

1.1 समग्र अर्थशास्त्र - अर्थ आणि व्याख्या
1.2 समग्र अर्थशास्त्र - स्वरूप
1.3 समग्र अर्थशास्त्र - व्याप्ती
1.4 समग्र अर्थशास्त्र - महत्व
1.5 समग्र अर्थशास्त्र - मर्यादा
1.6 समग्रलक्षी आर्थिक उद्दिष्टे

## प्रकरण 2 - राष्ट्रीय उत्पन्न

2.1 राष्ट्रीय उत्पन्न - अर्थ आणि महत्व
2.2 राष्ट्रीय उत्पन्नाच्या विविध संकल्पना
2.2.1 स्थूल राष्ट्रीय उत्पादन (GNP)
2.2.2 निव्वळ राष्ट्रीय उत्पादन (NNP)
2.2.3 स्थूल देशांतर्गत उत्पादन (GDP)
2.2.4 दरडोई उत्पन्न (PCI)
2.2.5 वैयक्तिक उत्पन्न (PI)
2.2.6 व्ययशक्य / खर्च योग्य उत्पन्न (DI)
2.3 राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन / गणना
2.4 राष्ट्रीय उत्पन्न गणनेतील अडचणी
2.5 उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह: द्विक्षेत्र प्रतिमान

## प्रकरण 3 - उत्पादन आणि रोजगार सिद्धांत

3.1 रोजगाराचा सनातनवादी सिद्धांत
3.2 सनातनवादी सिद्धांतावरील केन्स यांची टीका
3.3 केन्सचा रोजगार सिद्धांत

## प्रकरण 4 - उपभोग, बचत आणि गुंतवणूक

4.1 उपभोग फलन
4.1.1 उपभोग फलनाचा अर्थ
4.1.2 सरासरी उपभोग प्रवृत्ती (MPC)
4.1.3 सीमांत उपभोग प्रवृत्ती (MPC)
4.1.4 उपभोगासंबंधीचा केन्स यांचा मानसशास्त्रीय नियम
4.1.5 उपभोगाचे / उपभोग प्रवृत्तीचे निर्धारक घटक
4.2 बचत फलन
4.2.1 बचत फलनाचा अर्थ
4.2.2 सरासरी बचत प्रवृत्ती (MPS)
4.2.3 सीमांत बचत प्रवृत्ती (MPS)
4.2.4 बचतीचे निर्धारक घटक
4.3 गुंतवणूक- अर्थ आणि प्रकार
4.3.1 स्थूल गुंतवणूक व निव्वळ गुंतवणूक
4.3.2 स्वायत्त व प्रेरित बचत गुंतवणूक
4.4 भांडवलाची सीमांत लाभक्षमता / कार्यक्षमता (MEC) आणि निर्धारक घटक
4.5 संकल्पना: गुंतवणूक गुणक
4.6 संकल्पना: त्वरक तत्व

SYBCom-B.Eco-DBC

# प्रकरण 1 - समग्र अर्थशास्त्राची ओळख

## प्रास्ताविक:

अर्थशास्त्राच्या दोन अभ्यास पद्धती आहेत. एक सूक्ष्म अभ्यास पद्धती व दुसरी समग्र अभ्यास पद्धती. अर्थशास्त्राची समग्र अभ्यास पद्धती बरीच जुनी असून अठराव्या शतकातील निसर्गवादी अर्थशास्त्रज्ञांच्या लेखनातून ती जाणवते. 1936 मध्ये लॉर्ड जॉन मेनार्ड केन्स यांनी लिहिलेल्या, "The General Theory of Employment, Interest & Money" या ग्रंथापासून समग्र अर्थशास्त्रात, त्याच्या विवेचनात वेगाने बदल झाले. या ग्रंथाचा प्रभाव इतका मोठा आहे की आजही समग्रलक्षी अर्थशास्त्राचा मुख्य अभ्यास प्रवाह केन्स प्रणित अर्थशास्त्र म्हणून ओळखला जातो. एकोणिसाव्या शतकातील कार्ल मार्क्स, माल्थस, सिसमॉडी, यांनी समग्रलक्षी आर्थिक समस्यांचा विचार केला. वालरस, विक सेल, आणि फिशर यांनी समग्रलक्षी विश्लेषणाच्या विकास हातभार लावला. त्याचबरोबर मार्शल, पिगु, रोबर्टसन, हायेक व हॉट्रे यांचेही समग्र अर्थशास्त्राच्या विकासात योगदान आहे.

## 1.1.1 समग्रलक्षी अर्थशास्त्र- अर्थ:

समग्र अर्थशास्त्राला इंग्रजीमध्ये मॅक्रो इकॉनॉमिक्स (Macro Economics) हा शब्द वापरला जातो.
Macro (मॅक्रो) या शब्दाची उत्पत्ती Makros या ग्रीक शब्दापासून झालेली आहे. Makros या शब्दाचा इंग्रजीतील अर्थ Large असा, तर मराठीत 'मोठा' असा होतो.
समग्र अर्थशास्त्र समग्र पातळीवरील एकूण रोजगार, एकूण उत्पादन, राष्ट्रीय उत्पन्न अशा एकत्रित घटकांचा अभ्यास करते. समग्र अर्थशास्त्राला साकलीक अर्थशास्त्र / समष्टी अर्थशास्त्र / स्थूल अर्थशास्त्र असेही म्हटले जाते. समग्रलक्षी अर्थशास्त्र संपूर्ण आर्थिक व्यवस्थेचा अभ्यास असतो.

## 1.1.2 समग्र अर्थशास्त्र- व्याख्या:

1) **प्रा. के. ई. बोल्डिंग:** "समग्र अर्थशास्त्र वैयक्तिक परिमाणाशी संबंधित नसून ते अशा परिमाणाच्या समुच्चयाशी संबंधित असते; ज्याचा संबंध राष्ट्रीय उत्पन्न, सर्वसाधारण किंमत पातळी, राष्ट्रीय उत्पादनाशी असतो."

2) **प्रा. ॲक्ले:** "समग्र अर्थशास्त्राचा संबंध अशा मोठ्या आर्थिक व्यवहाराशी असतो जे आर्थिक जीवनाच्या सर्वसमावेशक विस्तारित बाबींशी संबंधित असते."

3) **प्रा. जे.एल. हॅन्सन:** "समग्र अर्थशास्त्र ही अर्थशास्त्राची एक महत्त्वाची शाखा आहे की, जी रोजगाराचे परिमाण, एकूण बचत आणि गुंतवणूक, राष्ट्रीय उत्पन्न, सर्वसाधारण किंमत पातळी, एकूण मागणी, एकूण पुरवठा, एकूण उत्पादन, एकूण उपभोग अशा मोठ्या समुच्चयातील संबंधांचा विचार करते."

4) **आर. जी.डी. ॲलन:** "स्थूल आर्थिक समुच्चयांमधील संबंधाच्या अभ्यासाचा उल्लेख 'समग्रलक्षी अर्थशास्त्र' या संज्ञेने केला जातो."

5) **जे. एम. कलबर्ट्सन:** "उत्पन्न, रोजगार, किमती, पैसा यांचा समावेश समग्रलक्षी आर्थिक सिद्धांतात केला पाहिजे."

## 1.2 समग्रलक्षी अर्थशास्त्राचे स्वरूप:

1) **समुच्चयात्मक दृष्टिकोन:** समग्र अर्थशास्त्रात वैयक्तिक आर्थिक घटकांचा अभ्यास न करता समुच्चयात्मक आर्थिक वर्तनाचा अभ्यास केला जातो. समग्र अर्थशास्त्रात वैयक्तिक वस्तूंच्या किमती ऐवजी सर्वसाधारण किंमत पातळी, वैयक्तिक उत्पन्ना ऐवजी राष्ट्रीय उत्पन्नाचा अभ्यास केला जातो. संपूर्ण अर्थव्यवस्थेत विविध वस्तू आणि सेवा यांच्या मागणी व पुरवठ्या बाबत लक्षावधी वैयक्तिक निर्णय दररोज घेतले जातात यातील प्रत्येक निर्णय विचारात घेणे अशक्य असते. म्हणून अशा निर्णयांच्या बेरजा करून त्याचे सरलीकरण केले जाते संख्याशास्त्रीय दृष्ट्या एकूण संख्या जेव्हा खूप मोठी असते तेव्हा वैयक्तिक भेद दुर्लक्षिले तरी फारसा फरक पडत नाही.

2) **समुच्चयन:** समग्रलक्षी अर्थशास्त्र समुच्चयन किंवा एकत्रीकरणाच्या तत्वाशी संबंधित आहे. समग्रलक्षी आर्थिक विश्लेषनातील समुच्चयन हे अर्थव्यवस्थेच्या मोठ्या भागाशी संबंधित असते. समग्रलक्षी अर्थशास्त्रात एकूण मागणी, एकूण पुरवठा, एकूण उत्पादन इत्यादींचा अभ्यास केला जातो.

3) **पैशात अभिव्यक्ती:** समग्रलक्षी पातळीवर बेरीज करताना वास्तव परिमाणांची बेरीज करणे अशक्य असते. अर्थव्यवस्थेतील उत्पादित केलेल्या सर्व वस्तू आणि सेवा यांची बेरीज केवळ अशक्य असते. उदा.

SYBCom-B.Eco-DBC

अर्थव्यवस्थेतील उत्पादित झालेल्या सर्व वह्या + पिन + चपला + दूध + टीव्ही + कपडे + मोबाईल + घरे + इत्यादी...यांची बेरीज अशक्य आहे. परंतु या वस्तूंच्या किमतींची बेरीज शक्य असते म्हणून अर्थव्यवस्थेतील उत्पादित झालेल्या सर्व वस्तू आणि सेवांचे पैशातील मूल्य एकत्रित करून देशाचे राष्ट्रीय उत्पन्न व्यक्त करता येते.

**4) मागणी-पुरवठा संबंध:** ग्राहक आणि विक्रेते यांचा एकमेकांच्या निर्णयावर बाजारा मार्फत प्रभाव पडतो. पुरवठ्याच्या बाजूने क्रयशक्तीचे मागणीच्या बाजूला प्रत्याभरण होत नाही पण समग्रलक्षी पातळीवर एकूण पुरवठ्याच्या बाजूने जेव्हा काही बदल होतात तेव्हा, एकूण मागणीवर होणारा प्रत्याभरण परिणाम दुर्लक्षिता येत नाही. संपूर्ण अर्थव्यवस्थेत ग्राहक आणि विक्रेते या दोन्ही भूमिका पार पडणारी माणसे तीच असतात. लोकांना उत्पादनात सहभागी झाल्याबद्दल पैसा मिळतो तो पुरवठ्याच्या बाजूने मिळतो. पण वस्तू आणि सेवांवर मागणीच्या बाजूने खर्च होणारा पैसाही तोच असतो आणि पैसा खर्च करणारी माणसेही तीच असतात.

**5) उत्पन्न दुवा:** संपूर्ण अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने जेव्हा किंमती वाढतात तेव्हा लोकांचे उत्पन्न वाढते आणि लोक वस्तू व सेवांची अधिक खरेदी करतात परंतु असे न झाल्यास उत्पादित वस्तू आणि विकलेल्या वस्तू यात असमतोल निर्माण होतो. थोडक्यात एका वस्तूच्या बाबतीतील मागणीतील बदलाचा संबंध किंमतीतील बदलांशी जोडता येतो. परंतु समग्रलक्षी पातळीवर मात्र मागणीतील बदलांचा संबंध, उत्पादनाच्या पातळीतील बदलांशी जोडावा लागतो. अशा रीतीने, समग्रलक्षी विश्लेषणात, मागणी आणि पुरवठा यांच्यातील दुवा म्हणजे उत्पन्न असतो, किंमत नव्हे.

**6) एकूण मागणी:** स्थूलमानाने अर्थव्यवस्थेतील एकूण मागणीचे चार गट करता येतात: उपभोक्ते, व्यवसाय संस्था, शासन संस्था व विदेशी ग्राहक या चार घटकांची अर्थव्यवस्थेत विविध वस्तू आणि सेवांसाठी असणारी मागणी म्हणजे एकूण मागणी होय. समग्र अर्थशास्त्र या एकूण मागणीचा अभ्यास करते.

**7) एकूण पुरवठा:** देशात तयार होणाऱ्या वस्तू व सेवा तसेच परदेशातून आयात होणाऱ्या वस्तू आणि सेवा यांचा मिळून एकूण पुरवठा होतो. देशात तयार होणाऱ्या वस्तू आणि सेवांमुळे देशातील नागरिकांना रोजगार आणि उत्पन्न मिळते. या उलट विदेशात तयार झालेल्या वस्तू आणि सेवांमुळे (आयात) विदेशी लोकांना रोजगार व उत्पन्न मिळते.

**8) राष्ट्रीय उत्पन्न, उत्पादन, रोजगार:** राष्ट्रीय उत्पन्न, उत्पादन आणि रोजगार या बाबी देशातील एकूण मागणी एकूण पुरवठा यामुळे निश्चित होतात.

**9) सर्वसाधारण समतोल:** समग्रलक्षी अर्थशास्त्र सर्वसाधारण समतोल विश्लेषणावर आधारित आहे. म्हणजेच, समग्र अर्थशास्त्र अनेक आर्थिक चलांचा व त्यातील संबंधांचा सविस्तर अभ्यास करते.

**10) गतिशील विश्लेषण:** समग्र अर्थशास्त्रात सूक्ष्म अर्थशास्त्रा प्रमाणे अधिक गृहीतांचा वापर केला जात नाही. अर्थव्यवस्थेतील सर्व बदलांचा गतिशील अभ्यास समग्र अर्थशास्त्रात केला जातो.

## 1.3 समग्र अर्थशास्त्राची व्याप्ती:

समग्र अर्थशास्त्र म्हणजे देशाच्या / विश्वाच्या संपूर्ण अर्थव्यवस्थेचा अभ्यास होय. समग्र अर्थशास्त्रात ज्या अभ्यास घटकांचा अभ्यास केला जातो त्यावरून समग्र अर्थशास्त्राची व्याप्ती लक्षात येते.

**1) राष्ट्रीय उत्पन्न:** राष्ट्रीय उत्पन्न हा देशाच्या आर्थिक विकासाचा निर्देशक समजला जातो. राष्ट्रीय उत्पन्नाची गणना, राष्ट्रीय उत्पन्न गणनेच्या पद्धती, राष्ट्रीय उत्पन्न गणना करताना येणाऱ्या विविध अडचणी, राष्ट्रीय उत्पन्नाच्या विविध संकल्पना, राष्ट्रीय उत्पन्न वाढविण्यासाठी करावयाच्या उपाययोजना, त्यामध्ये येणाऱ्या अडचणी या सर्व बाबींचा अभ्यास समग्र अर्थशास्त्र केला जातो.

**2) सर्वसाधारण किंमत पातळी:** सर्व वस्तू आणि सेवा यांची मूल्य पैशात व्यक्त करता येतात; कारण पैसा हे विनिमयाचे माध्यम आहे. मागणीच्या तुलनेत पैशाचा पुरवठा कमी-जास्त झाल्यास सर्वसामान्य किंमत पातळी बदलते. परिणामी वस्तूच्या / सेवेच्या मागणी व पुरवठ्या वर त्याचा परिणाम होतो. केन्स यांनी सर्वसाधारण किंमत पातळी आणि पैशाचा मागणी व पुरवठा याचा सखोल विचार केला आहे. चलन वाढ, चलन संकोच आणि सर्वसाधारण किंमत पातळी यांच्या सिद्धांतांचा अभ्यास समग्र अर्थशास्त्रात केला जातो.

**3) व्यापारचक्र:** आर्थिक व्यवहारातील तेजी-मंदी ची आवर्तने म्हणजे व्यापार चक्र होय. व्यापार चक्रांमुळे

SYBCom-BEco-DBC

आर्थिक व्यवहारात चढ-उतार होतात. निर्माण झालेला समतोल किंवा असमतोल दूर करणे आवश्यक असते. हे करीत असताना नैसर्गिक आणि मानवी साधनसामग्रीचा पुरेपूर / पर्याप्त वापर झाला पाहिजे. आर्थिक चढ-उतार कशामुळे होतात? आर्थिक चढउतार टाळता येणे शक्य आहे का? यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या पाहिजेत? अशा सर्व प्रश्नांची उत्तरे समग्र अर्थशास्त्रातील व्यापारचक्र विषयक सिद्धांतामध्ये शोधली जातात.

**4) मंदी युक्त चलनवाढ:** व्यापार चक्राच्या मंदीच्या अवस्थेत किमती व उत्पादन यात घट झालेली असते तर तेजीच्या अवस्थेत किमती उत्पादन यात वाढ झालेली असते. मात्र, मंदी युक्त चलनवाढीच्या अवस्थेत एकाच वेळी किमतीच्या बाबतीत तेजी आणि उत्पादनाच्या बाबतीत मंदी अनुभवास येते. मंदी युक्त चलनवाढ आटोक्यात आणण्यासाठी परंपरागत चलन विषयक व राजकोषीय धोरणांचा फारसा उपयोग होत नाही. मंदी युक्त चलनवाढीच्या समस्येला उत्तर म्हणून पुरवठ्याच्या बाजूच्या अर्थशास्त्राचा अभ्यास करतात.

**5) आर्थिक वृद्धी:** मानवी जीवनमानाचा दर्जा उंचावण्यासाठी आर्थिक वृद्धी आवश्यक आहे. लोकसंख्येतील वाढीपेक्षा वस्तू व सेवांच्या उत्पादनाच्या वाढीचा वेग अधिक असेल तर आर्थिक वृद्धी घडून येते. लोकांना पूर्वीपेक्षा अधिक वस्तू आणि सेवांच्या सुविधा प्राप्त होतात. यामुळे जीवनमान उंचावते / जीवनमानाचा दर्जा सुधारतो. अर्थव्यवस्थेमध्ये आर्थिक वृद्धी कशामुळे घडून येते किंवा ती कशी घडवून आणावी यासाठी आर्थिक वृद्धीचे सिद्धांत समग्र अर्थशास्त्र अभ्यासले जातात. वृद्धि आणि विकासाचे अर्थशास्त्र ही अलीकडील काळात विकसित झालेली अर्थशास्त्राची शाखा आहे. यामध्ये आर्थिक वृद्धी च्या सिद्धांतांचा ऊहापोह / अभ्यास केला जातो.

**6) व्यवहारतोल व विनिमय दर:** दोन स्वतंत्र राष्ट्रांमध्ये चालणाऱ्या व्यापाराला आंतरराष्ट्रीय व्यापार असे म्हणतात. आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये व्यवहारतोल ही संकल्पणा निर्माण होते. एका विशिष्ट आर्थिक कालखंडात एखाद्या देशाच्या उर्वरित जगाबरोबर झालेल्या आर्थिक व्यवहारांची नोंद किंवा ताळेबंद म्हणजे व्यवहारतोल होय. देशाचा व्यवहार तोल तुटीचा, वाढाव्याचा किंवा संतुलित असू शकतो. व्यवहारतोल तुटीचा किंवा वाढाव्याचा असणे अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने चांगले नाही. यासाठी व्यवहारातोल सिद्धांत मार्गदर्शन करतात, त्याचा अभ्यास समग्र अर्थशास्त्र केला जातो.

दोन स्वतंत्र देशांमध्ये वेगवेगळी चलने असतात. दोन देशांमध्ये व्यापार करताना या दोन देशांच्या चलनांची आदलाबदल करावी लागते; ही अदलाबदल ज्या दराने केली जाते त्यास विनिमय दर असे म्हणतात. विनिमय दर सिद्धांत समग्र अर्थशास्त्रात अभ्यासले जातात.

**7) उपभोग आणि गुंतवणूक:** लोक आपले उत्पन्न उपभोग्य वस्तू वर किंवा भांडवली वस्तूंवर खर्च करतात. आज खरेदी केलेल्या भांडवली वस्तू उद्या वस्तूंचे उत्पादन करतात. त्यामुळे समाजाचा भविष्यकालीन उपभोग हा वर्तमानकालीन गुंतवणुकीवर आधारित असतो म्हणूनच उपभोक्ता सिद्धांत, गुंतवणूक सिद्धांत त्यांचा अभ्यासही समग्र अर्थशास्त्रात केला जातो.

**8) विभाजनाचा समग्रलक्षी सिद्धांत:** कोणत्याही वस्तू किंवा सेवेचे उत्पादन करण्यासाठी उत्पादनाचे चार घटक आवश्यक असतात. यात भुमी, श्रम, भांडवल, संयोजक यांचा समावेश होतो. या चार घटकांत प्रत्येकी खंड, वेतन / मजुरी, व्याज आणि नफा हे मोबदले म्हणजेच राष्ट्रीय उत्पन्नाचे वाटप कसे करावे याबाबतचा अभ्यास समग्र अर्थशास्त्रात अभ्यासला जातो. या प्रश्नाकडे ॲडम स्मिथ, लॉर्ड केन्स, रिकार्डो, कार्ल मार्क्स तर आधुनिक काळात कॅलेकी आणि कॉल्डर या सर्वांचे लक्ष वेधले गेले.

## 1.4 समग्र अर्थशास्त्राचे महत्त्व:

समग्र अर्थशास्त्र आर्थिक अध्ययनाची एक महत्वाची पद्धती आहे. समग्र अर्थशास्त्राचे सैद्धांतिक आणि व्यावहारिक महत्व अनन्यसाधारण आहे. ते पुढील मुद्द्यांवरून दिसून येते.

**1) अर्थव्यवस्था समजण्यासाठी:** अर्थव्यवस्थेचे कार्य समजण्यासाठी समग्र आर्थिक चले किंवा समग्र आर्थिक घटक किंवा समग्र पातळीवरील आर्थिक प्रश्न / समस्या माहित असल्या पाहिजेत. समग्र अर्थशास्त्रात एकूण उत्पन्न, रोजगार, उत्पादन, सर्वसाधारण किंमत पातळी अशा अर्थव्यवस्थेशी संबंधित घटकांचा सविस्तर अभ्यास केला जातो. अर्थव्यवस्थेमध्ये या चलाना अत्यंत महत्त्व आहे ही चले एकमेकावर कशी प्रभाव पाडतात किंवा एकमेकांवर कशी अवलंबून आहेत हे समग्र अर्थशास्त्राच्या अभ्यासाने स्पष्ट होते. थोडक्यात, अर्थव्यवस्था समजून घेण्यासाठी समग्र अर्थशास्त्र उपयुक्त आहे.

SYBCom-BEco-DBC

**2) राष्ट्रीय प्रतिष्ठा:** आज कोणत्याही देशाची प्रतिष्ठा त्या देशाच्या सक्षम अर्थव्यवस्थेवर अवलंबून असते. सक्षम अर्थव्यवस्था असणाऱ्या नागरिकांच्या राहणीमानाचा दर्जा उंचावलेला असतो. प्रत्येक देश अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी प्रयत्नशील असतात. ज्या देशाची अर्थव्यवस्था मजबूत किंवा अर्थव्यवस्थेच्या विकासाचा दर अधिक असतो अशा देशांना जागतिक पातळीवर प्रतिष्ठा प्राप्त होते.

**3) आर्थिक धोरणे:** आर्थिक धोरणे तयार करण्याचे काम सरकारचे असते. विशेषतः विकसनशील देशांना आपल्या अर्थव्यवस्थेला योग्य दिशा देऊन आर्थिक विकास साध्य करण्यासाठी योग्य आर्थिक धोरणांची व त्यांच्या अंमलबजावणीची गरज असते. समग्रलक्षी अर्थशास्त्रात विविध प्रकारचे समग्र आर्थिक प्रश्न सोडविण्याबाबत मार्गदर्शन करण्यात येते. सरकारला संपूर्ण अर्थव्यवस्थेचे योग्य ज्ञान असेल त्याचबरोबर समग्रलक्षी आर्थिक धोरणांची जाण असेल तर योग्य आर्थिक धोरणे तयार करता येतात.

**4) राष्ट्राचे सामर्थ्य:** आधुनिक काळात कोणत्याही राष्ट्राचे सामर्थ्य हे अर्थव्यवस्थेच्या प्रगतीवर / विकासावर मोजले जाते. आर्थिक शक्तीच्या बळावर एखादा देश इतरांवर वर्चस्व गाजवू शकतो. आर्थिक ताकदीमुळे अमेरिकेला जागतिक महासत्ता असे म्हटले जाते. अलीकडील काळात चीनने आर्थिक प्रगती केल्यामुळे चीन जागतिक महासत्ता बनू पहात आहे.

**5) आर्थिक कामगिरी:** एखाद्या राष्ट्राची प्रगती / प्रतिष्ठा / सामर्थ्य त्या देशाच्या आर्थिक कामगिरीवर अवलंबून असते. देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नाची आकडेवारी त्या देशाची आर्थिक कामगिरी दाखवित असते. जागतिक पातळीवर देशाची आर्थिक प्रगती मोजण्याचे राष्ट्रीय उत्पन्न हे महत्वाचे निर्देशक आहे. त्याचबरोबर राष्ट्रीय उत्पन्नाचे वाटप अर्थव्यवस्थेतील लोकांच्या विविध गटात उत्पन्नाची विभाजन कसे झाले हे समजून घेण्याच्या दृष्टीने उपयोगी पडते.

**4) निवडणुक जाहीरनामे:** लोकशाही राज्यप्रणाली मध्ये विविध राजकीय पक्ष निवडणुकांना सामोरे जातात. आपण जनतेसाठी काय करणार आहोत या करिता ते आपल्या जाहीरनाम्यात विविध बाबींची यादी देत असतात. यामध्ये बहुतांश विभाग हा समग्र आर्थिक प्रश्नांशी संबंधित असतो. उदाहरणार्थ बेकारी, लोकसंख्या वाढ,गरीबी, रोजगार हमी, शेती, ग्रामीण विकास, नोकऱ्या, किमान गरजा, कर्जमाफी, प्रादेशिक समतोल, परकीय कंपन्या, औद्योगिक धोरण, आंतरराष्ट्रीय व्यापार, परकीय कर्ज, विनिमय दर असे अनेक मुद्दे समग्र अर्थशास्त्राशी निगडीत आहेत.

**5) सुजान नागरिक:** आज अनेक देशांनी लोकशाही शासन पद्धती स्वीकारलेली आहे. ठराविक मुदतीनंतर लोकशाही पद्धतीने निवडणुका होतात व सरकार स्थापन होते. निवडणुकां करिता अनेक राजकीय पक्ष आपल्या जाहीरनाम्यात मधून तसेच प्रचार आणि प्रसारामध्ये ज्या बाबींचा उल्लेख आपल्या जाहीरनाम्यामध्ये तसेच भाषणांमध्ये करतात यातील बहुतांश भाग हा देशातील समग्र पातळीवरील आर्थिक समस्यांशी निगडीत असतो यामध्ये बेरोजगारी, महागाई, शेतमालाच्या किमती, गरिबी व दारिद्य, ग्रामीण विकास, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, कर्जमाफी, औद्योगिक समस्या इत्यादींशी निगडीत असतो. नागरिकांना या प्रश्नांची जाणीव असेल तर कोणत्या राजकीय पक्षाकडे या समस्यांसाठी योग्य असा कार्यक्रम, धोरण किंवा नियोजन आहे त्या राजकीय पक्षाला मतदान करून सत्तेवर आणता येते. यासाठी समग्र अर्थशास्त्राचा अभ्यास उपयुक्त ठरतो.

**6) समग्रलक्षी आर्थिक धोरण:** देश पातळीवरील विविध आर्थिक समस्या सोडविण्यासाठी समग्रलक्षी आर्थिक धोरणांची आवश्यकता असते. अशा धोरणांचा वापर करून रोजगार निर्मिती, किंमत स्थैर्य, आर्थिक विकास आणि वृद्धी आणि यासारखी उद्दिष्टे साध्य करता येतात. परंतु त्याकरिता योग्य अशा समग्रलक्षी आर्थिक धोरणाची निवड करता आली पाहिजे व त्याची अंमलबजावणी केली पाहिजे. कारण सरकारच्या आर्थिक धोरणांचा फार मोठा परिणाम जनतेवर होतो. यासाठी समग्र अर्थशास्त्र महत्त्वाचे आहे.

**7) वैयक्तिक लाभ:** समग्र अर्थशास्त्राचा उपयोग केवळ शासनालाच होतो असे नाही. वैयक्तिक पातळीवर व्यक्ती, व्यवसाय संस्था, कुटुंबे यांना देखील समग्रअर्थशास्त्राच्या अभ्यासाचा, त्याच्या ज्ञानाचा उपयोग होतो. बाजारातील तेजी-मंदीचा अभ्यास करून व्यक्तीला, एखाद्या व्यावसायिकाला खरेदी आणि विक्री चे निर्णय घेता येतात. विविध व्यवसाय संस्था / कंपन्या अर्थव्यवस्थेत चालणाऱ्या घडामोडींची माहिती व आकडेवारी गोळा करून त्याचे विश्लेषण करण्यासाठी अर्थतज्ञांची नेमणूक करतात. यामुळे व्यवसाय संस्थांना

SYBCom-B.Eco-DBC

भविष्यकाळात असणाऱ्या संधी आणि समस्यां साठी योग्य ती तयारी करता येते. म्हणजेच समग्र अर्थशास्त्राचा लाभ वैयक्तिक पातळीवर देखील होतो.

**8) चलन विषयक समस्या:** पैसाधिष्ठित अर्थव्यवस्थेत चलन विषयक अनेक समस्या निर्माण होत असतात. या समस्यांचे विश्लेषण करणे त्या समजून घेणे व सोडविणे यासाठी समग्र अर्थशास्त्राचा अभ्यास उपयुक्त आहे. चलनवाढ, चलन घाट, पैशाच्या मूल्यात सातत्याने होणारे बदल या समस्या सोडविण्यासाठी समग्र अर्थशास्त्राचा अभ्यास उपयुक्त आहे.

**9) बेरोजगारी:** बेरोजगारी भारतासारख्या विकसनशील देशांसमोरील महत्वाची आर्थिक समस्या आहे. या समस्येमुळे सामाजिक समस्या देखील निर्माण होतात. बेकारीची कारणे, परिणाम व रोजगार निर्मितीसाठी उपाययोजनांचा अभ्यास करण्यासाठी समग्र आर्थिक विश्लेषण विशेष महत्वाचेआहे. बेकारी कमी करण्यासाठी गुंतवणुकीच्या संधी निर्माण करणे, कर्ज विषयक सुविधा उपलब्ध करून देणे, प्रभावी मागणी निर्माण करणे यासाठी समग्र अर्थशास्त्राचा अभ्यास केला जातो.

**10) आर्थिक चढउतार:** आर्थिक चढउतार किंवा तेजी-मंदी मुळे अर्थव्यवस्थेत अस्थिरता निर्माण होते; ती अर्थव्यवस्थेच्या विकासाच्या दृष्टीने अपायकारक असते. आर्थिक चढ-उतारांचे कारण समजून घेणे व त्यासाठी योग्य उपाययोजना करणे याकरिता समग्र अर्थशास्त्र महत्त्वाचे आहे.

**11) आर्थिक वृद्धी:** आर्थिक वृद्धी आणि विकासाचे अर्थशास्त्र ही समग्रलक्षी अर्थशास्त्राची एक महत्त्वाची शाखा आहे. या शाखेत अर्थव्यवस्थेतील साधन सामग्री व अर्थव्यवस्थेची क्षमता यांचे मूल्यमापन केले जाते. देशाचे राष्ट्रीय उत्पन्न, एकूण उत्पादन, एकूण रोजगार यात वाढ करण्यासाठी विविध योजनांची आखणी केली जाते. योग्य योजनेमुळे आर्थिक विकासाची पातळी वाढविता येते. समग्र अर्थशास्त्र अर्थव्यवस्थेची सातत्यपूर्ण आर्थिक वृद्धी कशी साध्य करावी याविषयी माहिती देते.

**12) वैयक्तिक एकक:** वैयक्तिक एककांचे वर्तन समजून घेण्यासाठी समग्र अर्थशास्त्र उपयुक्त ठरते. वैयक्तिक उत्पादनाची मागणी अर्थव्यवस्थेतील एकूण मागणीवर अवलंबून असते. एकूण मागणीतील कमतरतेच्या कारणांचे विश्लेषण केल्याशिवाय वैयक्तिक उत्पादनाच्या किंवा मागणीतील बदलांची कारणे समजत नाहीत. विशिष्ट व्यवसाय संस्था किंवा उद्योगाच्या खर्चात झालेल्या वाढीच्या कारणांची समिक्षा संपूर्ण अर्थव्यवस्थेची सरासरी परस्थिती समजल्याशिवाय करणे शक्य होत नाही अशाप्रकारे समग्र अर्थशास्त्र वैयक्तिक घटकांच्या अभ्यासासाठी उपयुक्त ठरते.

**13) समग्रलक्षी विरोधाभास:** वैयक्तिक पातळीवर घेतले जाणारे आर्थिक निर्णय समग्रलक्षी किंवा देशपातळीवर योग्य ठरतीलच असे नाही. मात्र तसे केल्यास विरोधाभासाची स्थिती निर्माण होते. उदा. बचतीचा विरोधाभास, वेतन कपातीचा विरोधाभास इ. बचत करणे हा वैयक्तिक पातळीवर चांगला आर्थिक निर्णय आहे परंतु, सर्वत्र मोठ्या पातळीवर बचत केल्यास प्रभावी मागणी घटते. आणि मंदी सारखी परिस्थिती निर्माण होते. तसे होऊ नये यासाठी समग्र अर्थशास्त्राचा अभ्यास महत्त्वाचा आहे.

**14) सूक्ष्म अर्थशास्त्राला मदत:** सूक्ष्म अर्थशास्त्राच्या अनेक नियमांची मांडणी करताना अनेक लोकांचे अनुभव गोळा करावे लागतात. सार्वत्रिक पातळीवर असे अनुभव आल्याशिवाय नियमाचे सामान्यीकरण करता येत नाही. म्हणजेच समग्र पातळीवरील अभ्यास झाल्यानंतरच सूक्ष्म पातळीवर सिद्धांत मांडता येतात.

**15) व्यावसायिक निर्णय:** व्यवसायिकांना, व्यवसाय संस्थांना अनेक निर्णय घ्यावे लागतात. असे निर्णय घेताना समग्र अर्थशास्त्राचे ज्ञान उपयोगी पडते. देशाचे राष्ट्रीय उत्पन्न, देशातील बेरोजगारी, एकूण मागणी, चलनविषयक धोरण, राजकोषीय धोरण, इत्यादीच्या संयुक्त परिणामातून आर्थिक पर्यावरण तयार होते. समग्र अर्थशास्त्रातील संकल्पनांची माहिती / ज्ञान व्यावसायिकांना असल्यास त्यांना आपले व्यावसायिक / आर्थिक निर्णय घेणे सोपे जाते.

अशाप्रकारे समग्रलक्षी अर्थशास्त्राच्या अभ्यासामुळे अर्थव्यवस्थेचे कार्यशील ज्ञान होते त्याचबरोबर आखणी व अंमलबजावणी करता येते, अर्थव्यवस्थेपुढील समस्या सोडविण्यास मदत होते.

### 1.5 समग्र अर्थशास्त्राच्या मर्यादा:

आधुनिक काळात अनेक देशांनी आर्थिक विकासासाठी नियोजनाचा मार्ग स्वीकारलेला आहे. कल्याणकारी अर्थव्यवस्थेसाठी व आर्थिक विकासासाठी आर्थिक नियोजन करावे लागते. साहजिकच यासाठी समग्र

SYBCom-B-Eco-DBC

अर्थशास्त्राचा फार मोठ्या प्रमाणावर उपयोग केला जातो. परंतु समग्र अर्थशास्त्राच्या काही मर्यादा देखील आहेत. त्या पुढीलप्रमाणे...

**1) एकजिनसी समुच्चय:** समग्रलक्षी विश्लेषणात समुच्चयाची अंतर्गत रचना विचारात न घेता समुच्चय एकजिनसी असल्याचे मानले जाते. देशातील सरासरी वेतन सर्व व्यवसायातील वेतनांची बेरीज करून काढले जाते; परंतु यामुळे प्रत्येक व्यक्तीचे वेतन तेवढेच राहील असे नाही तसेच रोजगाराची एकूण संख्या ही सरासरी वेतनावर अवलंबून नसते तर ती वेतनाच्या सापेक्ष रचनेवर अवलंबून असते.

**2) समग्रलक्षी चले:** अर्थव्यवस्थेतील सर्वच समग्रलक्षी चले सारखीच महत्त्वाची असतात असे नाही. कधीकधी या चलांच्या निष्कर्षावरून चुकीचा अर्थ काढला जाऊ शकतो. उदाहरणार्थ राष्ट्रीय उत्पन्न म्हणजे देशातील सर्व व्यक्तींच्या उत्पन्नाची बेरीज असते. काही मोजक्या लोकांचे उत्पन्न वाढल्याने राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होते. याचा अर्थ प्रत्येक व्यक्तीच्या वैयक्तीक उत्पन्नात वाढ झाली आहे असा होत नाही. म्हणून संपूर्ण समाजाच्या दृष्टीने सर्वच समग्रलक्षी चले नेहमीच किंवा सारखीच महत्वाची नसतात.

**3) सरसकट वापर:** अर्थव्यवस्थेतील समस्या सोडविताना समग्रलक्षी अर्थशास्त्राचा सरसकट वापर दिशाभूल करणारा ठरतो. उदाहरणार्थ अर्थव्यवस्थेत पूर्ण रोजगार साध्य करून तो टिकवून ठेवण्यासाठी केलेल्या धोरणात्मक उपायोजना वैयक्तिक / खाजगी व्यवसाय संस्था आणि उद्योग यांना लागू केल्यास ते संयुक्तिक / व्यवहार्य ठरत नाही.

**4) रचनेचा तर्कदोष / विरोधाभास:** एकूण किंवा समग्र आर्थिक वर्तन व्यवहाराची बेरीज असते. परंतु व्यक्तीगत घटकांच्या बाबतीत जे खरे असते ते संपूर्ण समाजाच्या / अर्थव्यवस्थेच्या बाबतीत खरे ठरेलच असे नाही. उदाहरणार्थ, बचत. बचत हा वैयक्तिक पातळीवर चांगला गुण आहे परंतु संपूर्ण समाजाच्या बाबतीत दुर्गुण आहे. कारण संपुर्ण देशात मोठ्या प्रमाणात बचत केली गेली तर मागणी घटते आणि मंदीची परिस्थिती निर्माण होते.

**5) सांख्यिकी व संकल्पनात्मक अडचणी:** समग्रलक्षी आर्थिक संकल्पनांचे मोजमाप करताना अनेक सांखिकी व संकल्पनात्मक अडचणी निर्माण होतात. समग्र आर्थिक चले म्हणजे वैयक्तिक चलांची बेरीज असते. सर्व वैयक्तिक चले एक सारखी असल्यास त्यांची बेरीज करणे सोपे असते मात्र वैयक्तिक चले असमान असतील तर त्यांची बेरीज करणे अवघड तर असतेच परंतु ते चुकीचे आणि घातक ठरण्याची शक्यता असते. उदाहरणार्थ, दरडोई राष्ट्रीय उत्पन्नाची संकल्पना.

## 1.6 समग्रलक्षी आर्थिक उद्दिष्टे:

**1) किंमत स्थैर्य:** किंमत स्थैर्य हे महत्वाचे समग्रलक्षी आर्थिक उद्दिष्ट आहे. किमतीतील चढउतारामुळे अर्थव्यवस्थेत अनिश्चितता व अस्थैर्य निर्माण होते. वाढत्या व घटत्या किमती या दोन्ही वाईट असतात कारण त्या अनावश्यक रितीने काहींना तोटा होण्यास व काहीना लाभ मिळण्यास मदत करतात. किमतीतील अस्थैर्याचे वाईट परिणाम घडून येतात. किमतीतील मोठ्या प्रमाणावरील चढउतारामुळे अर्थव्यवस्थेत गंभीर स्वरूपाचे अस्थैर्य निर्माण होते. त्यातून चलनवाढ व चलनघट निर्माण होते. या दोन्हीचे अर्थव्यवस्थेतील उत्पादन, विभाजन इ. वर अनेक दुष्परिणाम घडून येतात. किंमत अस्थैर्यामुळे होणारे दुष्परिणाम टाळण्यासाठी किंमत स्थैर्याचे उद्दिष्ट महत्वाचे आहे. चक्रीय चढउतार दूर करणे, आर्थिक स्थैर्य प्रस्थापित करणे, उत्पन्न व संपत्तीतील विषमता दूर करणे आणि पैशाचे मूल्य स्थिर राखणे यादृष्टीने किंमत स्थैर्याचे धोरण महत्त्वाचे ठरते. मात्र, किमतीचे स्थिरीकरण याचा अर्थ वैयक्तिक किमती एखाद्या विशिष्ट पातळीला स्थिर करणे असा होत नाही. किंमत स्थिरीकरण म्हणजे घाऊक किंमत निर्देशांकातून स्पष्ट होणारी सरासरी किंमत पातळी स्थिर राखणे होय.

**2) पूर्ण रोजगार:** पूर्ण रोजगार साध्य करणे हे विकसित आणि विकसनशील अशा दोन्ही प्रकारच्या देशातील समग्रलक्षी आर्थिक धोरणाचे एक महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. पूर्ण रोजगार म्हणजे अशी स्थिती की जेथे नोकरी किंवा काम करण्याची इच्छा व क्षमता असलेल्यांना नोकरी किंवा काम मिळते. मात्र, काही प्रमाणात संघर्षजन्य, हंगामी आणि संरचनात्मक बेकारी असू शकते (ज्यास बेकारीचा नैसर्गिक दर म्हणून ओळखले जाते). जेव्हा श्रमदल किंवा कामगार शक्ती उत्पादक कार्यात पूर्णपणे कार्यरत असते तेव्हा पूर्ण रोजगार असतो. श्रमदल आणि इतर उत्पादक स्त्रोत स्वतःच्या इच्छेविरुद्ध बेकार राहणे म्हणजे बेकारी होय.

SYBCom-B.Eco-DBC

बेकारी (श्रमाची) अर्थव्यवस्थेच्या एकूण उत्पादनाशी जवळून संबंधित आहे. बेकारीचा दर जास्त असेल तर वास्तविक एकूण उत्पादन आणि संभाव्य उत्पादन यामधील फरक अधिक असतो. त्यामुळेच बेकारी दूर करून पूर्ण रोजगार साध्य करणे हे समग्रलक्षी आर्थिक धोरणाचे एक महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. महामंदीच्या काळात जेव्हा काही अपवाद वगळता बहुतेक सर्व देशातील बेकारीचा दर उच्च होता तेव्हा धोरणकर्त्यांमध्ये पूर्ण रोजगाराचे उद्दिष्ट सर्वोच्च होते. कोणत्याही सरकारची कामगिरी पूर्ण रोजगार आणि किंमत स्थैर्य ही उद्दिष्टे साध्य करण्याच्या आधारे ठरवली जाते. या दोघांना अर्थव्यवस्थेच्या आरोग्याचे महत्त्वाचे निर्देशक म्हटले जाऊ शकते. दुसऱ्या शब्दांत, आधुनिक सरकारांचे ध्येय बेकारी आणि चलनवाढीचा दर कमी करणे हे असते. पूर्ण रोजगाराचे उद्दिष्ट विकसनशील देशांच्या दृष्टीने अधिक महत्त्वाचे आहे. अशा देशापुढे ज्या आर्थिक समस्या आहेत, त्यापैकी बेकारी दूर करणे ही एक महत्त्वाची समस्या आहे. अशा देशात चलनविषयक व राजकोषीय धोरणाची आखणी करताना पूर्ण रोजगाराच्या उद्दिष्टाला महत्त्व दिले जाते.

**3) आर्थिक स्थैर्य:** अर्थव्यवस्थेत आर्थिक व्यवहारात होणारे चढउतार कमी करून आर्थिक स्थैर्य प्रस्थापित करणे हे समग्रलक्षी आर्थिक उद्दिष्ट आहे. अर्थव्यवस्थेतील आर्थिक व्यवहारात चढउतार होतात, तेव्हा तेजी किंवा मंदीची स्थिती निर्माण होते. त्यातून निर्माण होणाऱ्या अस्थिरतेमुळे आर्थिक विकास प्रक्रियेस अडथळा येतो. उत्पादन, विभाजन आणि अनेक आर्थिक घटकांवर दुष्परिणाम होतात. मंदीच्या स्थितीत उत्पादन आणि रोजगार यात मोठ्या प्रमाणात घट होऊन आर्थिक अरिष्ट निर्माण होते. हे टाळण्यासाठी तेजी-मंदीच्या स्वरूपातील चढउतार कमी करून आर्थिक स्थैर्य प्रस्थापित करण्यावर समग्रलक्षी धोरणात भर दिलेला दिसून येतो. चलनविषयक व राजकोषीय धोरणे अर्थव्यवस्थेतील अस्थिरता कमी करून आर्थिक स्थैर्य प्रस्थापित करण्यास मदत करतात. किमती, रोजगार, आर्थिक वृद्धी, व्याज दर, गुंतवणूक आणि व्यापार यासारख्या प्रमुख निर्देशकांमध्ये अस्थिरता नसते तेव्हा आर्थिक स्थिरता येते. आर्थिक स्थैर्य प्रस्थापित करण्यावर समग्रलक्षी आर्थिक धोरणात भर दिलेला दिसून येतो.

**4) आर्थिक वृद्धी:** आर्थिक वृद्धी म्हणजे अशी प्रक्रिया की, ज्याद्वारे दीर्घकाळपर्यंत देशाच्या वास्तव दरडोई उत्पन्नात वाढ होते. आर्थिक वृद्धीचे मोजमाप देशात उत्पादित झालेल्या वस्तू व सेवांच्या परिमाणातील वाढीच्या आधारे केले जाते. जेव्हा अर्थव्यवस्थेच्या उत्पादनक्षमतेत वाढ घडून येते तेव्हा, आर्थिक वृद्धी घडून येते. उत्पादनक्षमतेतील वाढ वस्तू व सेवांचे उत्पादन करण्यासाठी वापरली जाते. अल्पविकसित देशांपुढील दारिद्रय, बेकारी यासारख्या समस्या सोडविण्यासाठी आर्थिक वृद्धी साध्य करणे महत्त्वाचे आहे. अशा देशात स्थैर्यासह आर्थिक वृद्धी घडवून आणण्यावर भर दिला जातो. आर्थिक वृद्धीचा उच्च दर साध्य करणे आणि तो टिकविणे यास बहुतेक विकसित आणि विकसनशील देशांच्या आर्थिक विषपत्रिकेत सर्वोच्च प्राधान्य दिले जाते. बाजार अर्थव्यवस्थेत आर्थिक वृद्धी कधीच स्थिर नसते. दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळात आणि वृद्धीचे उद्दिष्ट महत्वाचे बनले. दीर्घ कालावधीत उच्च आर्थिक वृद्धी साध्य करण्याचा देशाचा प्रयत्न असतो, जेणेकरून लोकांच्या सरासरी राहणीमानात किंवा जीवनमानात सुधारणा होऊ शकते. उच्च आर्थिक वृद्धीस अल्पकाळातील एकूण उत्पादनातील चढउतारांमुळे बऱ्याचदा अडथळा येतो. दुसऱ्या शब्दात सांगावयाचे झाल्यास आर्थिक वृद्धी आणि आर्थिक स्थैर्य या दोन उद्दिष्टात संघर्ष असतो. यावरुन समग्रलक्षी आर्थिक धोरणाने योग्य किंमत स्थिरतेसह आर्थिक वृद्धीस प्रोत्साहन दिले पाहिजे.

**5) व्यवहारतोल समतोल:** जागतिक व्यापारात मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याने व्यवहारतोलातील समतोल राखणे हे उद्दिष्ट साध्य करणे महत्त्वाचे झाले आहे. व्यवहारतोलातील तूट इतर उद्दिष्टे साध्य करण्याच्या बाबतीत अडथळा ठरते, व्यवहारतोलातील तुटीमुळे मोठ्या प्रमाणात सोने देशाबाहेर जाते. निर्यात करत असलेल्या वस्तूंच्या समान मूल्याच्या आसपास आयात करण्याचे सरकारचे उद्दिष्ट असते. हे देशाला परकीय चलन मिळविण्यास आणि देशातील नागरिकांना अधिक वैविध्यपूर्ण उत्पादनांचा पुरवठा करण्यास मदत करते. देशाचे उद्दिष्ट वाढाव्याचे किंवा तूटीचे नसते. जर देशाची निर्यात आयातीपेक्षा जास्त असेल तर तो देश व्यवहारतोल वाढावा किंवा सोने व परकीय चलन यासारख्या राखीव निधिचा संचय अनुभवतो. जेव्हा देश राखीव निधि गमावतो तेव्हा तो देश व्यवहारतोल तूट अनुभवतो. मात्र, राखीव निधितील घट अर्थव्यवस्थेची असमाधानकारक कामगिरी दर्शविते आणि त्यामुळे विविध समस्या निर्माण होतात. त्यामुळेच प्रत्येक देशाचे ध्येय परकीय चलन साठ्यात मोठ्या प्रमाणात वाढ करण्याचे असते.

*************************************************************************

SYBCom-Sem3-DBC

# प्रकरण 2 - राष्ट्रीय उत्पन्न

## प्रस्तावना:

समग्रलक्षी पातळीवर अभ्यासल्या जाणाऱ्या चलांमध्ये राष्ट्रीय उत्पन्न हा चल महत्त्वाचा आहे; कारण अर्थव्यवस्थेतील एकूण मागणी, एकूण उत्पादन, एकूण रोजगार वगैरे गोष्टी राष्ट्रीय उत्पन्नाच्या पातळीवरून निश्चित होत असतात. राष्ट्रीय उत्पन्नावरून अर्थव्यवस्थेच्या कामगिरीची कल्पना येते. तसेच राष्ट्रीय उत्पन्नाच्या आधारे जगातील विविध देशांच्या आर्थिक स्थितीची तलना करता येते. उत्पादन, उत्पन्न व खर्च पद्धतीच्या आधारे राष्ट्रीय उत्पन्नाची गणना केली जाते. अर्थव्यवस्थेत राष्ट्रीय उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह सातत्याने चालू असतो. उत्पन्नाच्या चक्राकार प्रवाहात काही घटकांमुळे भर पडून प्रवाहात वाढ होते तर काही घटकांमुळे उत्पन्नाच्या चक्राकार प्रवाहातून उत्पन्न काढून घेतले जावून प्रवाहात घट होते. उत्पन्नाच्या प्रवाहात पडणारी भर आणि त्यातून होणारी गळती समान असेल तर उत्पन्नाच्या प्रवाहात बदल होत नाही. प्रस्तुत प्रकरणात राष्ट्रीय उत्पन्नाचा अर्थ, राष्ट्रीय उत्पन्न गणणेचे महत्त्व, राष्ट्रीय उत्पन्न विषयक संकल्पना, कुटुंबे आणि व्यवसायसंस्था यातील उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह आणि राष्ट्रीय उत्पन्न गणनेच्या पद्धती हे अभ्यास घटक स्पष्ट केले आहेत.

## 2.1 राष्ट्रीय उत्पन्न:

### 2.1.1 राष्ट्रीय उत्पन्न अर्थ

राष्ट्रीय उत्पन्न ही प्रवाह संकल्पना आहे. राष्ट्रीय उत्पन्न संकल्पनेच्या आधारे अर्थव्यवस्थेतील वस्तू व सेवांच्या प्रवाहाचे मोजमाप केले जाते. विशिष्ट कालखंडात देशात उत्पादित झालेल्या वस्तू व सेवांचे मोजमाप राष्ट्रीय उत्पन्नाच्या आधारे केले जाते. स्थूलमानाने राष्ट्रीय उत्पन्नाची गणना करताना एक वर्षाचा कालावधी विचारात घेतला जातो. त्यामुळे एका वर्षाच्या कालावधीत देशात उत्पादित झालेल्या वस्तू व सेवांची गणना केली असता राष्ट्रीय उत्पन्न मिळते. राष्ट्रीय उत्पन्न म्हणजे विशिष्ट काळातील अर्थव्यवस्थेतील वस्तू व सेवांची बेरीज होय. राष्ट्रीय उत्पन्न संकल्पनेच्या अनेक अर्थशास्त्रज्ञांनी व्याख्या केलेल्या आहेत. भारताच्या राष्ट्रीय उत्पन्न समितीनेही राष्ट्रीय उत्पन्नाची व्याख्या दिलेली आहे. राष्ट्रीय उत्पन्न या संकल्पनेचा अर्थ समजून घेण्याच्या दृष्टीने या व्याख्यांचा अभ्यास महत्त्वाचा आहे .

**2.1.2 व्याख्या:** राष्ट्रीय उत्पन्न या संकल्पनेच्या काही व्याख्या पुढीलप्रमाणे आहेत.

**1) डॉ. मार्शल:** "देशातील श्रम व भांडवल यांच्याकडून नैसर्गिक साधनसामग्रीच्या साहाय्याने मूर्त व अमूर्त स्वरूपात वस्तू व सेवा यांचे काही एक संख्येइतके निव्वळ उत्पादन केले जाते. निव्वळ उत्पादन हा शब्दप्रयोग करण्याचा हेतू असा की, कच्च्या मालाचा व अर्ध-पक्क्या वस्तूंचा केला जाणारा वापर, तसेच उत्पादनप्रक्रियेत वापरल्या जाणाऱ्या संयंत्राचा घसारा येथे लक्षात घेतला आहे. निव्वळ उत्पन्न काढताना हा सर्व खर्च स्थूल उत्पन्नातून वजा करावा लागतो व त्यात परकीय गुंतवणुकीपासून मिळणारे उत्पन्न मिळवावे लागते. हेच खरे देशाचे निव्वळ वार्षिक उत्पन्न किंवा महसूल होय."

**2) प्रा. पिगू:** "समाजाच्या वस्तुनिष्ठ उत्पन्नाचा जो भाग पैशाच्या स्वरूपात मोजता येतो त्याला राष्ट्रीय उत्पन्न म्हणतात. अर्थातच, यात विदेशातून मिळणारे उत्पन्न समाविष्ट असते."

प्रा. पिगू यांनी दिलेली व्याख्या ही डॉ. मार्शल यांनी दिलेल्या व्याख्येपेक्षा अधिक काटेकोर आहे; परंतु जगातील ज्या देशांत वस्तुविनिमय पद्धतीचा अवलंब काही प्रमाणात का होईना होत आहे. अशा देशातील राष्ट्रीय उत्पन्न प्रा. पिगू यांच्या व्याख्येनुसार मोजले, तर ते कमी भरण्याची शक्यता आहे. त्यामुळे व्यावहारिक दृष्टीने ही व्याख्या फारसी उपयुक्त नाही.

**3) प्रा. फिशर:** "अंतिम उपभोक्त्यांना त्यांच्या भौतिक किंवा मानवी साधनसामग्रीपासून मिळणाऱ्या सेवा म्हणजे राष्ट्रीय उत्पन्न होय."

प्रा. फिशरने दिलेली व्याख्या अधिक शास्त्रशुद्ध आहे. मात्र, या व्याख्येच्या आधारे राष्ट्रीय उत्पन्न मोजताना उपभोगल्या जाणाऱ्या वस्तूंच्या सेवेची प्रत्यक्षात किंमत ठरविणे अवघड आहे. त्यामुळे व्यावहारिक दृष्टीने ही व्याख्या उपयोगी पडणारी नाही. भारताच्या राष्ट्रीय उत्पन्न समितीने राष्ट्रीय उत्पन्नाची सोपी व सुटसुटीत व्याख्या दिलेली आहे.

**4) राष्ट्रीय उत्पन्न समिती:** "एखाद्या विशिष्ट कालखंडात निर्माण केलेल्या वस्तू व सेवांची दुहेरी गणना टाळून केलेले मापन म्हणजे राष्ट्रीय उत्पन्नाचा अंदाज होय."

SYBCom-B.Com-DBC

राष्ट्रीय उत्पन्नाच्या वरील व्याख्यांवरून पुढील काही बाबी स्पष्ट होतात.

**अ) प्रवाह संकल्पना:** राष्ट्रीय उत्पन्न ही प्रवाह संकल्पना आहे. राष्ट्रीय संपत्तीप्रमाणे ती साठा संकल्पना नाही. विशिष्ट कालखंडात अर्थव्यवस्थेत उत्पादित झालेल्या वस्तू व सेवांची गणना राष्ट्रीय उत्पन्नात केली जाते.

**ब) दुहेरी गणना:** राष्ट्रीय उत्पन्नाची गणना करताना एकच वस्तू किंवा सेवा दोनदा मोजली जाणार नाही याची काळजी घेणे म्हणजेच, दुहेरी गणना टाळणे आवश्यक असते. अन्यथा राष्ट्रीय उत्पन्नाची योग्य गणना होणार नाही.

**क) पैशाचा वापर:** वस्तू व सेवांची गणना करताना त्या पैशात व्यक्त करून त्यांची गणना केली जाते. राष्ट्रीय उत्पन्नाची गणना पैशात केली जात असल्याने पैशाच्या स्वरूपात ज्यांचा विनिमय होत नाही, अशा वस्तू व सेवांचा समावेश राष्ट्रीय उत्पन्नात केला जात नाही.

### 2.1.3 राष्ट्रीय उत्पन्न गणनेचे महत्त्व:

राष्ट्रीय उत्पन्नाच्या आधारे विशिष्ट कालखंडात अर्थव्यवस्थेत उत्पादित झालेल्या वस्तू व सेवांची गणना केली जाते. या गणनेतून राष्ट्रीय उत्पन्नासंबंधीची जी आकडेवारी मिळते ती अनेक दृष्टीने उपयोगी पडते अर्थव्यवस्थेच्या कामगिरीची या आकडेवारीवरून कल्पना येतेच परंतु त्याचबरोबर विविध आर्थिक धोरणे आखण्यासाठी राष्ट्रीय उत्पन्नाची मदत होते राष्ट्रीय उत्पन्नाच्या आकडेवारीचे महत्त्व पुढीलप्रमाणे.

**1) एकूण उत्पादनाची माहिती:** राष्ट्रीय उत्पन्नाची गणना करताना एका वर्षातील अर्थव्यवस्थेतील वस्तू व सेवांचे मोजमाप केले जाते. वस्तू व सेवांचे मूल्य पैशात व्यक्त करून अशी गणना केली जाते. राष्ट्रीय उत्पन्नाच्या गणनेमुळे विशिष्ट कालखंडातील अर्थव्यवस्थेतील एकूण उत्पादनाची कल्पना येते.

**2) विविध क्षेत्राची प्रगती:** राष्ट्रीय उत्पन्नाची गणना करताना अर्थव्यवस्थेतील शेती, उद्योग, व्यापार, वाहतूक व दळणवळण अशा विविध क्षेत्रातील वस्तू व सेवांच्या उत्पादनाची गणना केली जाते. या गणनेवरून या विविध क्षेत्राच्या प्रगतीची कल्पना येते, तसेच अर्थव्यवस्थेतील विविध क्षेत्रांचे तुलनात्मक महत्त्व समजण्यासही मदत होते.

**3) वृद्धी दराची माहिती:** राष्ट्रीय उत्पन्नासंबंधीच्या आकडेवारीवरून देशातील राष्ट्रीय उत्पन्नाच्या वृद्धी दरासंबंधी माहिती मिळते. रा. उत्पन्नाचा वृद्धी दर हा अर्थव्यवस्थेचा वृद्धी दर स्पष्ट करतो. या दृष्टीने विचार करता अर्थव्यवस्थेची आर्थिक वृद्धीची कल्पना येण्यासाठी राष्ट्रीय उत्पन्नाची आकडेवारी महत्त्वाची ठरते.

**4) समाजाचे आर्थिक कल्याण:** देशाचे आर्थिक कल्याण हे राष्ट्रीय उत्पन्नाशी निगडित आहे. इतर परिस्थिती कायम असताना राष्ट्रीय उत्पन्नातील वाढ ही अर्थव्यवस्थेतील आर्थिक कल्याणातील वाढ स्पष्ट करते. साहजिकच राष्ट्रीय उत्पन्नविषयक आकडेवारीमुळे समाजाच्या आर्थिक कल्याणाची व त्यात होणाऱ्या बदलाची माहिती मिळण्यास मदत होते.

**5) आर्थिक विषमता:** राष्ट्रीय उत्पन्नाची आकडेवारी ही देशातील राष्ट्रीय उत्पन्न लोकसंख्येच्या विविध गटांत कसे विभागले गेले आहे हे दर्शविते. यातून राष्ट्रीय उत्पन्नातील विविध गटांचा वाटा समजतो. अर्थव्यवस्थेतील आर्थिक विषमता कमी होत आहे की वाढत आहे, याची आकडेवारीवरून कल्पना येते. राष्ट्रीय उत्पन्नातील श्रमिकांचा (वेतनाचा) वाटा वाढल्यास आर्थिक विषमता कमी झाल्याचे स्पष्ट होते.

**6) उपभोग, बचत व गुंतवणुक:** राष्ट्रीय उत्पन्नाची आकडेवारी उपभोग, बचत व गुंतवणुकीच्या परिमाणावर प्रकाश टाकते. उपभोगाची पातळी समाजातील आर्थिक कल्याणाची पातळी स्पष्ट करते, तर बचत व गुंतवणुकीची पातळी देशाची आर्थिक वृद्धी स्पष्ट करते.

**7) आर्थिक धोरणाची निश्चिती:** सरकारला योग्य, वास्तववादी व समतोल आर्थिक धोरणाची आखणी करताना राष्ट्रीय उत्पन्नविषयक आकडेवारी आवश्यक ठरते. देशाचे राष्ट्रीय उत्पन्न व त्याची विभागणी यासंबंधी अचूक व विश्वसनीय आकडेवारी उपलब्ध असावीच लागते.

**8) आर्थिक योजनांसाठी:** आज जगातील बहुतेक सर्व देशांनी नियोजनबद्ध आर्थिक विकासाचा मार्ग स्वीकारलेला आहे. राष्ट्रीय उत्पन्न, राष्ट्रीय उपभोग, राष्ट्रीय बचत व राष्ट्रीय गुंतवणूक यासंबंधी अचूक आकडेवारी उपलब्ध असल्याशिवाय आर्थिक योजनांची आखणी करणे शक्य होत नाही.

SYBCom-B.Eco-DBC

**9) विविध देशांची आर्थिक स्थितीची तुलना:** जगातील विविध राष्ट्रांच्या आर्थिक स्थितीची, त्या देशातील राहणीमानाची व आर्थिक कल्याणाची तुलना करण्यासाठी राष्ट्रीय उत्पन्नाची मदत होते. राष्ट्रीय उत्पन्नाची तुलना करून विविध देशांतील राहणीमान व आर्थिक कल्याणाची तुलनात्मक स्थिती समजते.

**10) संशोधकांना उपयुक्त:** राष्ट्रीय उत्पन्नासंबंधीची आकडेवारी संशोधकांना व विशेषतः अर्थशास्त्रातील संशोधकांना उपयुक्त ठरते. राष्ट्रीय उत्पन्नाशी संबंधित वेगवेगळ्या अभ्यासात राष्ट्रीय उत्पन्नविषयक आकडेवारीचा उपयोग होतो. उदा. आर्थिक कल्याण, आर्थिक विषमता, आर्थिक शक्तीचे केंद्रीकरण इ. अभ्यास करताना राष्ट्रीय उत्पन्नविषयक आकडेवारीचा उपयोग होऊ शकतो.

**11) मागणी पुरवठ्याचा अंदाज:** राष्ट्रीय उत्पन्नाच्या आधारे वस्तू व सेवांच्या एकूण पुरवठ्याचा अंदाज करता येतो. उत्पन्नाच्या पातळीवर मागणी अवलंबून असल्याने राष्ट्रीय उत्पन्नाच्या आकडेवारीच्या आधारे मागणीसंबंधी अंदाज करता येतो. अशा प्रकारे राष्ट्रीय उत्पन्नविषयक आकडेवारी विविध दृष्टीने सरकार, अर्थशास्त्राचे अभ्यासक व इतर अनेक घटकांना उपयोगी पडते, त्यामुळेच निरनिराळ्या देशांत राष्ट्रीय उत्पन्नाची गणना केली जाते.

## 2.2 राष्ट्रीय उत्पनाच्या संकल्पना:

### 2.2.1 स्थूल राष्ट्रीय उत्पादन (GNP):

एका विशिष्ट कालखंडात (साधारणपणे एक वर्ष) देशात उत्पादित होणाऱ्या वस्तू बाजारभावानुसार येणारे मूल्य म्हणजे स्थूल राष्ट्रीय उत्पादन होय. विशिष्ट कालखंडात देशातील नागरिकांनी उत्पादन केलेल्या अंतिम वस्तू व सेवांचे उत्पादन म्हणजे स्थूल राष्ट्रीय उत्पादन होय. या अंतिम वस्तूंत उपभोग्य व भांडवली वस्तूंचा समावेश होतो. संख्याशास्त्रीय दृष्टिकोणातून स्थूल राष्ट्रीय उत्पादनाचे मोजमाप हे निव्वळ राष्ट्रीय उत्पादनापेक्षा अधिक अचूक असते कारण घसाऱ्याचे अचूक मोजमाप करणे कठीण असते. स्थूल राष्ट्रीय उत्पादन आणि देशांतर्गत उत्पादन यामधील संबंध पुढीलप्रमाणे दाखविता येईल.

*स्थूल राष्ट्रीय उत्पादन = स्थूल देशांतर्गत उत्पादन + निर्यात - आयात.*

विशिष्ट काळातील स्थूल राष्ट्रीय उत्पादनातील वाढ ही अर्थव्यवस्थेच्या कामगिरीत सुधारणा होत असल्याचे स्पष्ट करते. स्थूल राष्ट्रीय उत्पादनाचे मोजमाप करताना दुहेरी मोजदाद टाळण्यासाठी अर्थव्यवस्थेतील उत्पादित अंतिम वस्तू व सेवांचे पैशातील मूल्य विचारात घ्यावे लागते. अंतिम वस्तू व सेवा म्हणजे अंतिमतः उपभोगासाठी वापरल्या जातात अशा वस्तू व सेवा होत.

### 2.2.2 निव्वळ राष्ट्रीय उत्पादन (NNP):

एका विशिष्ट कालखंडात देशातील रहिवाशांनी उत्पादित केलेल्या सर्व वस्तू व सेवांच्या निव्वळ उत्पादनाची बेरीज म्हणजे निव्वळ राष्ट्रीय उत्पादन होय. स्थूल राष्ट्रीय उत्पादनातून घसारा वजा केला असता निव्वळ राष्ट्रीय उत्पादन समजते.

*निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न = स्थूल राष्ट्रीय उत्पन्न - घसारा*

निव्वळ राष्ट्रीय उत्पादन म्हणजे विशिष्ट कालखंडातील उपभोग्य वस्तू व सरकारी वस्तूंचे उत्पादन आणि निव्वळ गुंतवणूक यांची बेरीज होय. याचाच अर्थ राष्ट्रीय उत्पादन म्हणजे एकूण उपभोग्य वस्तूंचे उत्पादन व अर्थव्यवस्थेच्या भांडवल साठ्यातील निव्वळ वाढ यांची बेरीज होय. निव्वळ राष्ट्रीय उत्पादन आणि निव्वळ देशांतर्गत उत्पादन यामधील संबंध पुढीलप्रमाणे दाखविता येईल.

*निव्वळ राष्ट्रीय उत्पादन = निव्वळ देशांतर्गत उत्पादन + निर्यात - आयात*

निव्वळ राष्ट्रीय उत्पादनाची संकल्पना ही वृद्धीच्या अर्थशास्त्राच्या अभ्यासात उपयुक्त आहे. मात्र, या संकल्पनेत एक गंभीर स्वरूपाची उणीव आहे व ती म्हणजे निव्वळ राष्ट्रीय उत्पादनाच्या गणनेत संयंत्र, इमारत इ. घसाऱ्याचे दर ठरविण्याबाबत गुंतागुंतीच्या व अवघड समस्या निर्माण होतात.

### 2.2.3 स्थुल देशांतर्गत उत्पादन (GDP):

स्थूल राष्ट्रीय उत्पादन म्हणजे देशाच्या नागरिकांनी एका वर्षात जेवढ्या वस्तू व सेवांचे उत्पादन केले त्यांचे पैशात व्यक्त केलेले एकूण मूल्य. आपल्या देशाच्या नागरिकांनी देशाबाहेर ज्या वस्तू व सेवांचे उत्पादन केले तेही हिशेबात धरावे लागते. इतर देशांत केलेल्या गुंतवणुकीवरील व्याज अथवा इतर देशात नोकरी करणार-या भारतीयांचे वेतन हे भारताच्या स्थूल राष्ट्रीय उत्पादनात समाविष्ट होते."स्थूल देशांतर्गत उत्पादन (GDP) म्हणजे एक वर्षात देशात उत्पादित होणाऱ्या अंतिम वस्तू व सेवांचे एकूण मूल्य."

SYBCom-Eco-DBC

देशात होणारे एकूण उत्पादन देशाच्या नागरिकांनीच केलेले असेल असे नाही. विदेशी भांडवल देशात येते, त्यावर व्याज दिले जाते. विदेशी तंत्रज्ञानाला रॉयल्टी मिळते. विदेशी कर्मचाऱ्यांना वेतन दिले जाते. अशा सर्व रकमा स्थूल राष्ट्रीय उत्पादनात येणार नाहीत; मात्र त्या देशांतर्गत उत्पादनात येतील. अशा रीतीने स्थूल राष्ट्रीय उत्पादन म्हणजे स्थूल देशांतर्गत उत्पादन अधिक देशाच्या नागरिकांना देशाबाहेर मिळणारे उत्पन्न वजा विदेशी नागरिकांनी आपल्या देशात मिळविलेले उत्पन्न. आपल्या नागरिकांनी विदेशात मिळविलेले उत्पन्न 'X' या अक्षराने आणि विदेशी नागरिकांनी आपल्या देशात मिळविलेले उत्पन्न 'M' या अक्षराने दर्शविल्यास GNP = GDP + X - M असे म्हणता येईल.

### 2.2.4 दरडोई उत्पन्न (PCI):

राष्ट्रीय उत्पन्नात वाढ झाली असता लोकांच्या राहणीमानात वाढ झाली आहे का, हे समजण्यासाठी दरडोई उत्पन्नाची संकल्पना महत्त्वाची आहे. दरडोई लोकसंख्येमागे उपलब्ध असलेल्या वस्तू व सेवांचे प्रमाण या संकल्पनेच्या आधारे समजते. एकूण राष्ट्रीय उत्पन्नाला एकूण लोकसंख्येने भागले असता दरडोई उत्पन्न समजते. एकूण राष्ट्रीय उत्पन्न ÷ एकूण लोकसंख्या = दरडोई उत्पन्न.

अशाच प्रकारे दरडोई वास्तव उत्पन्न शोधताना वास्तव राष्ट्रीय उत्पन्नाला एकूण लोकसंख्येने भागले जाते.

### 2.2.5 व्यक्तिगत उत्पन्न (PI):

व्यक्तिगत उत्पन्न म्हणजे व्यक्तीला सर्व मार्गांनी मिळणाऱ्या उत्पन्नांची बेरीज. यात वेतन, व्याज, लाभांश, भाडे, खंड इत्यादी सर्व मार्गांनी व्यक्तीला मिळणारे उत्पन्न मोजले जाते. शिवाय देवस्थान, क्लब इत्यादी कायदेशीर व्यक्तित्व असणाऱ्या संस्थांना मिळणाऱ्या उत्पन्नाचाही समावेश केला जातो. स्वयंरोजगारात गुंतलेल्यांच्या संमिश्र उत्पन्नाचाही यात समावेश असतो. पेन्शन, बेकारी-भत्ता, मनीऑर्डरने मुलांनी वडिलांना पाठविलेले पैसे / वडिलांनी मुलांना पाठविलेले पैसे इत्यादी हस्तांतरित उत्पन्नाचाही यात समावेश असतो. अशा तहेने राष्ट्रीय उत्पन्न वजा कंपन्या आणि सार्वजनिक उद्योगसंस्था यांचा अवितरित नफा अधिक हस्तांतरित उत्पन्न म्हणून व्यक्तींना मिळणाऱ्या रकमा म्हणजे 'व्यक्तिगत उत्पन्न' (Personal Income) होय. राष्ट्रीय उत्पन्नातून हस्तांतरित उत्पन्न वगळलेले असते तर व्यक्तिगत उत्पन्नात ते मिळविलेले असते. अधिक तपशीलाने सांगायचे तर,

*व्यक्तिगत उत्पन्न = राष्ट्रीय उत्पन्न - भविष्यनिर्वाह निधीत कर्मचारी व मालक यांनी भरलेले हप्ते + सरकारकडून व्यक्तींना मिळणारे हस्तांतरित उत्पन्न + व्यावसायिकांकडून व्यक्तींना मिळणारे हस्तांतरित उत्पन्न + सरकारकडून व्यक्तींना दिले जाणारे व्याज + उपभोक्त्यांकडून व्यक्तींना दिले जाणारे व्याज + लाभांश.*

### 2.2.6 खर्च करण्याजोगे उत्पन्न (DI):

एका वर्षाच्या कालखंडात व्यक्ती किंवा कुटुंबांना सर्व मार्गांनी प्रत्यक्षात मिळालेल्या सर्व उत्पन्नाची बेरीज म्हणजे वैयक्तिक उत्पन्न होय. यात खंड, व्याज, वेतन, नफा अशा घटकांना मिळणाऱ्या मोबदल्याचा आणि पेन्शन, बेकारी भत्ता अशा हस्तांतरित उत्पन्नाचा समावेश होत. व्यक्तींना मिळालेले सर्वच्या सर्व उत्पन्न व्यक्ती आपल्या मनाप्रमाणे खर्च करू शकत नाहीत. कारण या उत्पन्नातून व्यक्तींना व्यक्तिगत प्रत्यक्ष कर द्यावे लागतात. प्रत्यक्ष व्यक्तिगत कर दिल्यानंतर उरलेले उत्पन्न व्यक्ती आपल्या इच्छेप्रमाणे खर्च करू शकतात. व्यक्तिगत उत्पन्नातून व्यक्तिगत कर (उदा. प्राप्ती कर) वजा केले असता खर्च करण्याजोगे किंवा विनियोगक्षम उत्पन्न मिळते.

*खर्च करण्याजोगे वैयक्तिक उत्पन्न = वैयक्तिक उत्पन्न - वैयक्तिक कर.*

मात्र, सर्व खर्च करण्यायोग्य उत्पन्न हे उपभोगासाठी खर्च केले जायलाच हवे असे नाही. स्थूलमानाने व्यक्ती आपल्या खर्च करण्यायोग्य उत्पन्नापैकी फार मोठा भाग उपभोगावर खर्च करतात व उर्वरित रकमेची बचत केली जाते. खर्च करण्याजोगे वैयक्तिक उत्पन्न = उपभोग + बचत. खर्च करण्यायोग्य उत्पन्नाची वैयक्तिक उत्पन्नाची तुलना करून वैयक्तिक प्रत्यक्ष कराचा पैशातील भार शोधता येतो, त्यामुळे ही संकल्पना उपयुक्त व महत्त्वाची आहे.

### राष्ट्रीय उत्पन्न संकल्पना- सारांश:

1) स्थूल देशांतर्गत उत्पादन (GDP) = देशात उत्पादित होणाऱ्या सर्व वस्तू आणि सेवा यांचे पैशातील मूल्य
2) स्थूल राष्ट्रीय उत्पादन (GNP) = स्थूल देशांतर्गत उत्पादन + आपल्या नागरिकांनी इतर देशांत

SYBCom-BEco-DBC

मिळविलेले उत्पन्न विदेशी नागरिकांनी आपल्या देशात मिळविले उत्पन्न (GNP = GDP + X - M)

3) निव्वळ राष्ट्रीय उत्पादन - स्थूल राष्ट्रीय उत्पादन - भांडवल - क्षयभत्ता (NNP = GNP - CCA)

4) बाजारभावाने राष्ट्रीय उत्पन्न = निव्वळ राष्ट्रीय उत्पादन - हस्तांतरित उत्पन्न

(National Income at MP = NNP Transfer Payments)

5) घटकखर्चावरून राष्ट्रीय उत्पन्न = निव्वळ राष्ट्रीय उत्पादन - (अप्रत्यक्ष कर + हस्तांतरित उत्पन्न + सार्वजनिक उद्योगसंस्थांचा वाढावा - सरकारी अर्थसाहाय्य)

(National Income at Factor Costs = NNP - (Indirect Business Taxes + Business Transfer Payments + Current Surpluses of Public Enterprises - Government Subsidies).

6) व्यक्तिगत उत्पन्न = राष्ट्रीय उत्पन्न - कंपन्यांचा नफा - सामाजिक विम्याचा मालकाने दिलेला हप्ता - हस्तांतरित उत्पन्न - सरकारकडून मिळणारे न्याज - लाभांश

(Personal Income = National Income - Corporate Profits- Exployer's Constributions to Social Insurance - Transfer Payments (Govt. and Business) - Net Interested paid by Govt. Dividends)

7) उपलब्ध व्यक्तिगत उत्पन्न = व्यक्तिगत उत्पन्न - व्यक्तिगत कर

(Disposable Personal Income = Personal Income - Personal Taxes)

8) व्यक्तिगत खर्च = उपलब्ध व्यक्तिगत उत्पन्न - व्यक्तिगत बचत

(Personal Outlays = Disposable Personal Income - Personal Savings)

## 2.3 राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन / गणना:

सकल राष्ट्रीय उत्पादन (GDP) अर्थात जीडीपी हे कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्थेची स्थिती मोजण्याचे एक मापक आहे. एखाद्या देशाचा GDP म्हणजे त्या देशाने त्या वर्षी देशांतर्गत उत्पादन केलेल्या वस्तू आणि सेवांची एकत्रित किंमत होय. जेव्हा आपल्याला वेगवेगळ्या देशांच्या आर्थिक स्थितीची तुलना करायची असते तेव्हा GDP चा वापर केला जातो. तसेच देशांतर्गत गेल्या वर्षीच्या तुलनेत या वर्षी उत्पादन किती वाढले, हे मोजण्यासाठी GDP च्या दराचा वापर होतो. रोजच्या बोलण्यात आपण काही शब्द सहजपणे वापरत असतो. त्या शब्दांचा ढोबळमानाने अर्थही आपल्याला माहिती असतो. पण तो शब्द, त्यामागची संकल्पना आणि त्या संकल्पनेत अंतर्भूत असलेल्या व मुख्य म्हणजे अंतर्भूत नसलेल्या बऱ्याच गोष्टींची आपल्याला पुरेशी माहिती नसते.

'सकल राष्ट्रीय उत्पादन' अर्थात GDP हे कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्थेची स्थिती मोजण्याचे एक मापक आहे. एखाद्या देशाचा GDP म्हणजे त्या देशाने त्या वर्षी देशांतर्गत उत्पादन केलेल्या वस्तू आणि सेवांची एकत्रित किंमत होय. जेव्हा आपल्याला वेगवेगळ्या देशांच्या आर्थिक स्थितीची तुलना करायची असते तेव्हा GDP चा वापर केला जातो. तसेच देशांतर्गत गेल्या वर्षीच्या तुलनेत या वर्षी उत्पादन किती वाढले, हे मोजण्यासाठीही GDP च्या दराचा वापर होतो. पण अर्थव्यवस्थेचा आकार आणि प्रगती दर्शवणारा हा GDP कसा मोजला जातो?

एखाद्या राष्ट्राचा GDP हा त्या राष्ट्राच्या राष्ट्रीय उत्पादन (Production), राष्ट्रीय उत्पन्न (Income) किंवा राष्ट्रीय खर्च (Expenditure) यावरून ठरवता येतो.

राष्ट्रीय उत्पादनांवरून GDP मोजताना फक्त शेवटचे / अंतिम व्यवहारच ग्राह्य धरले जातात. इतर मधले (Intermediate) व्यवहार वगळून जी वस्तू आणि सेवांच्या उत्पादनांची किंमत राहते, तोच GDP. उदा. कापसापासून बनवलेले कापड, कापडापासून बनवलेले कपडे आणि कपड्यांची विक्री यांत अंतिम व्यवहार हा कपड्यांच्या विक्रीचा असतो; म्हणून तोच फक्त जीडीपीमध्ये पकडला जातो. तसे न केल्यास, किंमत दोनदा जीडीपीमध्ये मोजली जाण्याचा धोका असतो.

राष्ट्रीय उत्पन्नावरून GDP मोजताना राष्ट्रातल्या सर्व लोकांचे त्या वर्षांचे उत्पन्न मोजले जाते. उद्योगात काम करणाऱ्या कामगारांचे पगार, जमिनीचे व उपकरणांचे भाडे, दिलेल्या कर्जावर मिळणारे व्याज आणि उद्योगातून होणारा नफा. अशा सर्व उत्पन्नांना मिळून जीडीपी मोजला जातो. राष्ट्रीय खर्चाच्या दृष्टीने जेव्हा GDP मोजला जातो तेव्हा त्यात ग्राहकांचा खर्च, उद्योगांनी केलेली गुंतवणूक आणि सरकारी खर्च यांचा विचार केला जातो. तसेच आयातीमुळे राष्ट्राचा खर्च वाढतो (त्याचा फायदा राष्ट्रातील कोणालाच

SYBCom-BEco-DBC

उत्पन्नाच्या स्वरूपात मिळत नाही आणि निर्यातीमुळे राष्ट्राचे उत्पन्न वाढते (राष्ट्रातील कोणाचाच खर्च न वाढता); त्यामुळे हा आयात-निर्यातीतील फरक (निर्यात-आयात) GDP मध्ये धरावा लागतो. राष्ट्रीय खर्च विचारात घेऊन GDP मोजण्यासाठी:

C+I G+(X-M) असे समीकरण वापरण्यात येते.

(येथे, C = Consumption, I = Investment, G = Government, X = Export, M = Import)

सोप्या शब्दांत सांगायचे, तर या पद्धतीत अर्थव्यवस्थेत तयार झालेल्या सर्व अंतिम वस्तू आणि सेवांवर झालेला खर्च मोजण्यात येतो.

भारतात 'केंद्रीय सांख्यिकी संस्था' (Central Statistics Office-CSO) ही सरकारी संस्था भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नाचे मोजमाप करते. वेगवेगळ्या सर्वेक्षणांवरून आणि निर्देशाकांवरून (Indexes) माहिती गोळा केली जाते आणि त्यावरून वार्षिक व तिमाही GDP घोषित केला जातो. वर सांगितलेल्या पद्धतीवरून काढण्यात आलेल्या जीडीपीला 'नॉमिनल जीडीपी' असे म्हणतात. एखाद्या वर्षी महागाईमुळे वस्तू आणि सेवांच्या किमती वाढल्या, तर या वाढलेल्या किमतीमुळे जीडीपीही वाढलेला दिसतो, जरी इतर कोणत्याही प्रकारे अर्थव्यवस्था वाढली नाही तरीही. अशा वेळेस महागाईचा परिणाम जीडीपीमध्ये मोजला जाऊन 'खरा' जीडीपी काढला जातो, ज्याला 'रिअल जीडीपी' असे म्हणतात.

आज सर्वसामान्यपणे GDP हे एखाद्या राष्ट्राच्या आर्थिक प्रगती पुस्तकासारखं वापरलं जातं. अर्थव्यवस्थेची ताकत आणि वाढ त्यावरून ठरवली जाते. पण GDP च्या वापरावरही काही मर्यादा आहेत. GDP फक्त विक्री झालेल्या वस्तूच मोजते. काळा बाजार किंवा वस्तू विनिमय (बार्टर) यातील व्यवहार जीडीपीच्या कक्षेबाहेरच राहतात आणि त्याची कल्पना GDP पाहून येत नाही. उद्योगांचा पर्यावरणावरचा परिणाम आणि वाढलेलं प्रदूषण हे GDP मध्ये मोजलं जात नाही. नफेखोरीसाठी पर्यावरणाकडे दुर्लक्ष झालं तर अशी प्रगती फार काळ टिकवून ठेवता येत नाही आणि त्याचा विचार GDP मध्ये होत नाही. तसेच GDP चा आधार हा आर्थिक व्यवहार हाच असल्याने, वस्तू व सेवांची वाढलेली गुणवत्ता आणि त्या अनुषंगाने झालेल्या प्रगतीचे मोजमाप GDP करू शकत नाही. उदाहरणार्थ, दहा वर्षांपूर्वी आपण वापरत असलेले मोबाइल फोन आजच्या स्मार्ट फोनपेक्षा गुणवत्तेने कमी असूनसुद्धा किमतीने जास्त होते. थोडक्यात, दहा वर्षांपूर्वीच्या फोनचा GDP मध्ये आजच्यापेक्षा मोठा वाटा होता. एखाद्या राष्ट्राचा GDP खूप जास्त असला म्हणजे त्या राष्ट्राची सर्वांगीण प्रगती होते आहे असे मानणेही चुकीचे आहे. जर संपत्ती फक्त काही लोकांकडेच जमा होत असेल, तर त्यामुळे समाजातील आर्थिक विषमता वाढते.

### 2.3.1 राष्ट्रीय उत्पन्न गणनेच्या पद्धती:

राष्ट्रीय उत्पन्नाची गणना करताना विविध पद्धतींचा उपयोग केला जातो. राष्ट्रीय उत्पन्नाच्या संकल्पनेतून तीन स्पष्टीकरणे मिळतात .

1) राष्ट्रीय उत्पन्न म्हणजे अर्थव्यवस्थेतील एकूण वार्षिक उत्पादनाचे पैशातील मूल्य होय.
2) राष्ट्रीय उत्पन्न म्हणजे देशातील एकूण उत्पन्न होय.
3) राष्ट्रीय उत्पन्न म्हणजे अर्थव्यवस्थेतील एकूण खर्च होय.

अशा तीनपैकी कोणत्याही दृष्टीने राष्ट्रीय उत्पन्नाकडे पाहिल्यास मिळणारा परिणाम सारखाच असतो. याचे कारण असे की, प्रत्येक खर्च हा त्याच वेळी प्राप्तीही असतो आणि खर्च व प्राप्ती हे दोन्हीही खरेदीदार व विक्रेते यांच्यातील विनिमय झालेल्या वस्तू व सेवांच्या मूल्याबरोबर असतात. यातूनच राष्ट्रीय उत्पन्न गणनेच्या विविध पद्धती निर्माण होतात.

**1) उत्पादन पद्धती:** उत्पादन पद्धतीनुसार अर्थव्यवस्थेतील कोणत्याही एका वर्षातील अंतिम वस्तू व उत्पादनाचे मूल्य पैशात मोजले जाते. अंतिम वस्तू व सेवांच्या एकूण उत्पादनाला त्यांच्या प्रत्येकाच्या बाजारातील किमतीने गुणून स्थूल राष्ट्रीय उत्पादन मिळते. उत्पादन प्रक्रियेत यंत्रसामग्री व इतर साधनांची झीज होत असते. स्थूल राष्ट्रीय उत्पादनातून घसारा वजा केला असता देशाचे राष्ट्रीय उत्पन्न समजते.

अशा प्रकारे उत्पादन पद्धतीच्या आधारे अर्थव्यवस्थेतील शेती, उद्योग, व्यापार, वाहतूक, दळणवळण अशा विविध क्षेत्रांत उत्पादित झालेल्या वस्तू व सेवांची किंमत ठरवून त्या किमतींची बेरीज केली जाते.

**2) उत्पन्न पद्धती:** राष्ट्रीय उत्पन्न गणनेची ही दुसरी पद्धती असून, या पद्धतीनुसार उत्पादनाच्या प्रक्रियेत सहभागी झाल्याबद्दल सर्व उत्पादन घटकांना मिळणाऱ्या उत्पन्नाची बेरीज म्हणजे राष्ट्रीय उत्पन्न होय.

उत्पादनप्रक्रियेत भूमी, श्रम, भांडवल, संयोजन असे घटक सहभागी होतात. या उत्पादन घटकांना मिळणाऱ्या मोबदल्याची बेरीज केली असता राष्ट्रीय उत्पन्न समजते. यालाच घटक खर्चानुसार राष्ट्रीय उत्पन्न असेही म्हणतात. अशा प्रकारे उत्पादनाच्या विविध घटकांना एका वर्षाच्या काळात मोबदला स्वरूपात मिळणाऱ्या उत्पन्नाची बेरीज केली असता देशाचे राष्ट्रीय उत्पन्न समजते.

**3) खर्च पद्धती:** या पद्धतीनुसार देशातील कुटुंबे, व्यवसायसंस्था आणि सरकार यांनी केलेल्या विशिष्ट वर्षातील खर्चाची बेरीज करून राष्ट्रीय उत्पन्न मिळते. या पद्धतीच्या आधारे राष्ट्रीय उत्पन्न मोजताना पुढील चार प्रकारचा खर्च विचारात घेऊन त्या खर्चांची बेरीज केली जाते.

अ) वैयक्तिक उपभोग खर्च: देशातील व्यक्तींनी उपभोग्य वस्तू व सेवा विकत घेण्यासाठी केलेला खर्च म्हणजे वैयक्तिक उपभोग खर्च होय.

ब) स्थूल देशांतर्गत खासगी गुंतवणूक: उत्पादन कार्यात सहभागी झालेल्या व्यवसायसंस्था नवीन यंत्रे, अवजारे यासाठी व त्यांच्या देखभालीसाठी जो खर्च करतात त्या सर्व खर्चांची बेरीज म्हणजे स्थूल देशांतर्गत खासगी गुंतवणूक खर्च होय.

क) वस्तू व सेवांची सरकारकडून होणारी खरेदी: सरकारकडून विविध प्रकारच्या वस्तू व सेवांची खरेदी केली जात असते. ही खरेदी चालू उपभोगासाठी असते. तशीच ती भांडवली कारणासाठीही असते.

ड) निव्वळ परकिय गुंतवणुक: देशातील नागरिकांनी परकीय वस्तू व सेवांवर केलेला खर्च आणि परकीय नागरिकांनी देशातील वस्तू व सेवांवर केलेला खर्च यातील फरकास निव्वळ गुंतवणूक खर्च असे म्हणतात.

वरील चार प्रकारच्या खर्चाची बेरीज केली असता राष्ट्रीय उत्पन्न समजते व यास बाजारातील किमतीनुसार राष्ट्रीय उत्पादन म्हणतात.

राष्ट्रीय उत्पन्न गणनेच्या वरील तीन प्रमुख पद्धतीव्यतिरिक्त आणखीही एक पद्धती आहे व ती म्हणजे मूल्य वृद्धी पद्धती (Value Added Method) होय. या पद्धतीनुसार उत्पादनाच्या प्रत्येक अवस्थेला असलेले राष्ट्रीय उत्पादनाचे मूल्य आणि आदानाचे मूल्य यातील फरक म्हणजे मूल्य वृद्धी होय. अशा प्रकारे निरनिराळ्या पद्धतीच्या आधारे राष्ट्रीय उत्पन्नाची गणना केली जाते. देशातील राष्ट्रीय उत्पन्नाची गणना करताना एकाच वेळी एकापेक्षा जास्त पद्धतींचाही उपयोग केला जातो. भारतात राष्ट्रीय उत्पन्नाची गणना करताना उत्पादन पद्धती व उत्पन्न पद्धतीचा उपयोग केलेला दिसतो.

### 2.3.2 राष्ट्रीय उत्पन्न गणनेतील अडचणी:

राष्ट्रीय उत्पन्नाची गणना करताना एका वर्षाच्या कालावधीतील देशातील सर्व उत्पादक क्षेत्रात निर्माण होणाऱ्या वस्तू व सेवांचे मोजमाप केले जाते. असे मोजमाप करताना कोणत्याही वस्तू व सेवांची दुहेरी गणना होणार नाही याची काळजी घ्यावी लागते. देशात हजारो वस्तू व सेवांचे उत्पादन होत असते. त्यांची गणना करणे अनेकदा अडचणीचे असते. विकसित देशात अविकसित देशांच्या तुलनेत राष्ट्रीय उत्पन्न गणना करताना कमी अडचणी येतात. भारतासारख्या अल्पविकसित देशात राष्ट्रीय उत्पन्नाची गणना करताना अनेक अडचणी येतात या अडचणी पुढीलप्रमाणे.

**अ) संकल्पनात्मक अडचणी:**

उत्पन्नाची गणना करताना 'राष्ट्रीय उत्पन्न' या संज्ञेचा निश्चित अर्थ विचारात घेणे गरजेचे असते. त्यासाठी राष्ट्रीय उत्पन्नात कोणत्या वस्तू व सेवांचा समावेश करावयाचा आणि कोणत्या उत्पन्नाचा समावेश करावयाचा नाही हे ठरवावे लागते. मात्र, हे ठरविणे अवघड असल्याने याबाबतीत अडचणी निर्माण होतात. या अडचणी पुढीलप्रमाणे:

**1) सेवांचा समावेश:** राष्ट्रीय उत्पन्नाची गणना करताना देशातील एका वर्षाच्या कालावधीत उत्पादित झालेल्या वस्तू व सेवांची बेरीज केली जाते. वस्तूंचे मोजमाप करणे शक्य असते. मात्र, सेवांची गणना करताना अडचण येते. राष्ट्रीय उत्पन्नात कोणत्या सेवांचा समावेश करावा हे ठरविण्याचा प्रश्न निर्माण होतो. ज्या सेवांचे मूल्य पैशात व्यक्त करता येते किंवा ज्या सेवांचा पैशाशी विनिमय होतो त्यांचाच समावेश राष्ट्रीय उत्पन्नात केला जातो. मात्र, पैसा न घेता दिलेल्या सेवांचा समावेश राष्ट्रीय उत्पन्नात केला जात नाही. वास्तविक, त्यांचा समावेश राष्ट्रीय उत्पन्नात व्हायला हवा. मात्र, त्यांचे मोजमाप करणे अडचणीचे असल्यामुळे त्या वगळाव्या लागतात.

SYBCom-BEco-DBC

**2) बेकायदेशीर व्यवहार:** काळ्या बाजाराच्या माध्यमातून होणाऱ्या व्यवहारांची नोंद घेता येत नाही. बेकायदेशीर रीतीने असे व्यवहार होत असतात. गैरव्यवहाराची नोंद घेतली जात नसल्याने सर्व आर्थिक व्यवहाराचे मापन करता येत नाही. चोरट्या मार्गाने देशात अनेक वस्तू येतात. नोंदणी न करता खूप मोठ्या प्रमाणावर व्यवहार होतात. त्यामुळे अनेक व्यवहारांचे प्रतिबिंब राष्ट्रीय उत्पन्नात पडत नाही. सर्व व्यवहारांचे मापन करता येत नसल्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नाचे योग्य मापन केले जाण्यात अडचण येते.

**3) हस्तांतरित उत्पन्न:** काही व्यक्तींना उत्पादन कार्यात सहभागी न होता उत्पन्न मिळत असते. पेन्शन, बेकारी भत्ता या स्वरूपातील हस्तांतरित उत्पन्न सरकारकडून लोकांना मिळत असते. अशा हस्तांतरित उत्पन्नाचा समावेश राष्ट्रीय उत्पन्नात करावयाचा की नाही, हा प्रश्न निर्माण होतो. कोणत्याही उत्पादन कार्यात सहभागी न होता असे उत्पन्न मिळत असल्याने त्याचा समावेश न करणे योग्य असले तरी हे उत्पन्न खर्च केल्यावर आर्थिक व्यवहारात वाढ होते, त्यामुळे त्यांचा समावेश करणेही आवश्यक ठरते.

**4) सरकारी सेवा:** सरकारकडून वाहतूक, दळणवळण अशा अनेक प्रकारच्या सेवा पुरविल्या जातात. सरकारच्या सेवांचा समावेश राष्ट्रीय उत्पन्नात करावयाचा की नाही हे ठरविण्याच्या बाबतीत अडचण निर्माण होते. सरकारकडून पुरविण्यात आलेल्या सेवांचा वापर उपभोक्ते व उत्पादक यांच्याकडून केला जातो. सरकारकडून उपभोक्त्यांना मिळणाऱ्या सेवांचा राष्ट्रीय उत्पन्नात समावेश करणे संयुक्तिक ठरते व उत्पादकांकडून वापरल्या जाणाऱ्या सेवा वगळणे योग्य असते. मात्र, या सेवा दोन्ही घटकांकडून एकाच वेळी वापरण्यात येत असल्याने कोणत्या सेवा वगळाव्यात हे ठरविणे अवघड असते.

**ब) व्यावहारिक अडचणी:**

राष्ट्रीय उत्पन्नाची गणना करताना संकल्पनात्मक अडचणींबरोबर अनेक व्यावहारिक अडचणीही निर्माण होतात. भारतासारख्या विकसनशील देशात मोठ्या प्रमाणात व्यावहारिक अडचणी निर्माण होतात त्या पुढीलप्रमाणे.

**1) दुहेरी गणना:** राष्ट्रीय उत्पन्नाची गणना करताना एका वस्तूची दोनदा गणना होणार नाही याची काळजी घ्यावी लागते. त्यासाठी अंतिम वस्तूंचीच गणना करावी लागते. एकच वस्तू दोनदा मोजली गेल्यास गणना दोषपूर्ण ठरते. कापसाची गणना शेती क्षेत्रातील उत्पादन म्हणून केली, तर त्यापासून तयार होणाऱ्या सुताची किंमत राष्ट्रीय उत्पन्नात समाविष्ट करणे चुकीचे ठरते. प्रत्यक्षात अशी दुहेरी गणना टाळून राष्ट्रातील उत्पन्नाची गणना करणे अवघड व अडचणींचे असते.

**2) वस्तुविनिमय:** राष्ट्रीय उत्पन्नाची गणना करताना मोठ्या प्रमाणावर वस्तू व सेवांचा पैशांशी विनिमय होतो असे मानले जाते. मात्र, भारतासारख्या देशात शेती क्षेत्र हे महत्त्वाचे क्षेत्र असून, येथील शेतकरी चरितार्थाचे साधन म्हणून शेतीकडे पाहतात. त्यामुळे त्यांनी उत्पादित केलेल्या शेतमालापैकी बराचसा शेतमाल स्वत: च्या उपभोगासाठी वापरला जातो किंवा इतर वस्तूंच्या बदल्यात त्यांचा विनिमय केला जातो. हे सर्व उत्पादन वगळले, तर राष्ट्रीय उत्पन्न खूपच कमी येईल. शेतकऱ्यांनी स्वत:च्या उपभोगासाठी वापरलेल्या उत्पादनाचे मोजमाप करण्यासाठी सध्यातरी कोणतीही वस्तुनिष्ठ पद्धती अस्तित्वात नाही.

**3) व्यवसायानुसार उत्पन्न:** राष्ट्रीय उत्पन्नाची गणना करताना वेगवेगळ्या व्यवसायात निर्माण झालेल्या उत्पन्नाचे मोजमाप केले जाते; परंतु व्यक्तीच्या उत्पन्नाची विभागणी व्यवसायानुसार करण्यात अडचण येते. भारतात शेती व्यवसायाचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा मोठा आहे. शेतकरी शेती कसतो, त्यामुळे त्याचे उत्पन्न शेती या व्यवसायातील उत्पन्न म्हणता येते. मात्र, शेती व्यवसाय हा हंगामी स्वरूपाचा असल्याने शेतकरी इतरही कामे करताना दिसतात. ते रोजगार हमी योजनेचे काम करतात, बैलगाडीच्या मदतीने इतरांच्या मालाची वाहतूक करतात, घरगुती स्वरूपाचे इतर छोटे व्यवसाय करतात त्यामुळे, त्यांच्या उत्पन्नाची व्यवसायानुसार गणना करण्यात अडचण येते. देशातील शेतकऱ्यांची व असे वेगवेगळे व्यवसाय करणाऱ्यांची संख्या मोठी असल्याने राष्ट्रीय उत्पन्न गणना करण्यात अडचण येते.

**4) असंघटित क्षेत्र:** भारतीय अर्थव्यवस्था संघटित व असंघटित अशा दोन भागांत विभागलेली आहे. संघटित क्षेत्रातील उत्पन्नासंबंधी माहिती घेणे शक्य असते कारण या क्षेत्रातील उत्पन्नासंबंधी व खर्चासंबंधी सविस्तर व पद्धतशीर नोंद ठेवलेली असते. मात्र, असंघटित क्षेत्रातील उत्पन्नासंबंधी पद्धतशीरपणे ठेवलेल्या नोंदीचा अभाव असतो. लाखो शेतकरी, कारागीर, छोटे व्यावसायिक उपजीविकेचे साधन म्हणून व्यवसाय करतात. शेतकरी उत्पादित केलेल्या मालापैकी बराचसा माल स्वत:च्या उपभोगासाठी वापरतात.

SYBCom-B.Eco-DBC

वित्तपुरवठ्याच्या क्षेत्रात सावकार, सराफी पेढीवाले यांचा असंघटित क्षेत्रात समावेश होतो. शेतकऱ्यांकडून वस्तुविनिमयाचे व्यवहार होतात. विक्रीसाठी बाजारात आणला जाणारा शेतमाल मर्यादित असतो. भारतात असंघटित क्षेत्र मोठे असल्याने आणि असंघटित क्षेत्रातील उत्पन्नाचे मोजमाप करणे कठीण असल्याने राष्ट्रीय उत्पन्नाची गणना करण्यात अडचण येते.

**5) हिशेबाचे अल्प प्रमाण:** आपल्या उत्पन्नाचा व खर्चाचा हिशेब न ठेवण्याची प्रवृत्ती भारतात मोठ्या प्रमाणावर आहे. देशात घरगुती स्वरूपात अनेक उद्योगात उत्पादन केले जाते, तसेच अनेक लहान उत्पादक निरनिराळ्या वस्तूंचे उत्पादन करतात. त्यांच्याकडून उत्पन्न व खर्चाविषयीची पद्धतशीरपणे नोंद ठेवली जात नाही. भारतातील ग्रामीण भागात निरक्षरतेचे प्रमाण खूप आहे. ग्रामीण भागातील शेतकरी आपल्या उत्पन्नाचा व खर्चाचा हिशेब ठेवीत नाहीत. त्यामुळे त्यांचे उत्पन्न निश्चित करणे व त्यांची गणना करणे अवघड होते. राष्ट्रीय उत्पन्नाची गणना करताना देशातील सर्व उत्पादक क्षेत्रातील उत्पन्नाची माहिती घ्यावी लागते. मात्र, शेतकरी, छोटे उत्पादक यांच्या उत्पन्नाची माहिती मिळत नाही. त्यामुळे राष्ट्रीय उत्पन्न मोजण्यात अडचण निर्माण हात.

**6) आकडेवारीची उपलब्धता:** राष्ट्रीय उत्पन्नाची गणना करताना विविध बाबींसंबंधी माहिती उपलब्ध व्हावी लागते. उत्पन्न पद्धतीच्या आधारे उत्पन्न गणना करताना देशातील सर्व व्यक्तींच्या सर्व मार्गाने मिळणाऱ्या उत्पन्नांची बेरीज करावी लागते. शेतकऱ्यांच्या उत्पन्नाचा अचूक अंदाज घेता येत नाही, तसेच अनेक व्यावसायिकही आपले खरे उत्पन्न दाखवीत नाहीत. कर चुकविण्यासाठी उत्पन्न कमी दाखविले जाते. व्यक्ती किंवा कुटुंबाचे उत्पन्नाच्या वाटणी संबंधीची आकडेवारी उपलब्ध होण्यात अडचण असते. त्यामुळे राष्ट्रीय उत्पन्न गणनेत अडचण येते.

## 2.4 उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह:

उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह म्हणजे अशी प्रक्रिया की, ज्याद्वारे अर्थव्यवस्थेचे राष्ट्रीय उत्पन्न चक्राकार पद्धतीने सतत फिरत असते. कुटुंबे व्यवसायसंस्थांना आर्थिक साधनसामग्रीचा किंवा उत्पादन घटकांचा पुरवठा करतात. त्याबद्दल कुटुंबांना पैशाच्या स्वरुपात मोबदला मिळतो. अर्थव्यवस्थेत उत्पादन घटक आणि वस्तू व सेवा यांच्या प्रवाहाबरोबरच पैशाचाही प्रवाह चालू असतो. एकाच वेळी चलनी प्रवाह व वास्तव प्रवाह चालू असतात. मात्र, हे दोन्ही प्रवाह एकमेकांच्या विरोधी असतात.

### 2.4.1 उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह- महत्व:

चक्राकार प्रवाहाची संकल्पना अनेक दृष्टीने महत्त्वाची आहे ते पुढीलप्रमाणे.

**1) अर्थव्यवस्थेचे कार्य:** चक्राकार प्रवाहाची संकल्पना अर्थव्यवस्थेचे चित्र अधिक काटेकोरपणे स्पष्ट करते. अर्थव्यवस्था कार्यक्षमपणे कार्य करीत आहे की नाही याची त्यावरून कल्पना येते. त्याचप्रमाणे अर्थव्यवस्थेच्या कार्यात काही अडथळे असतील तर त्यांचीही माहिती यातून मिळते.

**2) असमतोलाची समस्या:** चक्राकार प्रवाहाच्या आधारे असमतोलाच्या प्रश्नाचा किंवा समस्येचा अभ्यास करता येतो. असमतोल का झालेला आहे याची कल्पना येते; तसेच पुन्हा समतोल कसा प्रस्थापित करता येईल याचीही माहिती मिळते.

**3) चलनविषयक धोरण:** उत्पन्नाच्या चक्राकार प्रवाहाचा अभ्यास अर्थव्यवस्थेतील बचत व गुंतवणूक यात समानता प्रस्थापित करण्याच्या बाबतीतील चलनविषयक धोरणाच्या महत्त्वपूर्ण भूमिकेवर प्रकाश टाकतो. वित्तीय बाजारामार्फत बचत व गुंतवणुकीत समानता प्रस्थापित होते. या बाजारावर चलनविषयक धोरणाद्वारे नियंत्रण ठेवले जाते.

**4) राजकोषीय धोरण:** उत्पन्न व खर्चाचा चक्राकार प्रवाह राजकोषीय धोरणाचे महत्त्व स्पष्ट करतो. राष्ट्रीय उत्पन्न समतोलात असण्यासाठी अपेक्षित बचत अधिक कर हे अपेक्षित गुंतवणूक अधिक सरकारी खर्च याबरोबर असले पाहिजे. बचत व कर ही उत्पन्न प्रवाहातील गळती तर अपेक्षित गुंतवणूक व सरकारी खर्च ही उत्पन्न प्रवाहातील भर होय. उत्पन्नाच्या चक्राकार प्रवाहाच्या समतोलासाठी गळती व भर समान असली पाहिजे. तसे नसेल तर सरकारला कर, खर्च यात बदल करून समानता राखावी लागते.

**5) चक्राकार प्रवाहातील गळती:** उत्पन्नाच्या चक्राकार प्रवाहातील गळती कोणत्या गोष्टींमुळे होते याची कल्पना चक्राकार प्रवाहाच्या संकल्पनेमुळे येते. उत्पन्न प्रवाहातील गळती थांबविण्यासाठी प्रयत्न करावे लागतात. उदा. आयात ही उत्पन्न प्रवाहातील गळती आहे. अशी गळती थांबविण्यासाठी सरकारला आयात

SYBCom-B-Eco-DBC

कमी आणि निर्यात वाढ करण्यासाठी प्रयत्न करावे लागतात.

**6) चक्राकार प्रवाहातील भर:** उत्पन्नाच्या चक्राकार प्रवाहात कोणत्या बाबींमुळे भर पडते हे समजणे आवश्यक असते. उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह समतोलात राहण्यासाठी या प्रवाहातील गळती रोखणे जसे आवश्यक आहे; तसेच चक्राकार प्रवाहात पडणारी भरही वाढणे आवश्यक आहे. गुंतवणूक, निर्यात, सरकारी खर्च यामुळे चक्राकार प्रवाहात भर पडते.

अशा प्रकारे अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने चक्राकार प्रवाहाची संकल्पना महत्त्वाची आहे. अर्थव्यवस्थेचे कार्य आणि अर्थव्यवस्थेच्या असमतोलाच्या प्रश्नाची या संकल्पनेमुळे माहिती मिळते.

### 2.4.2 कुटुंबे व व्यवसायसंस्था यातील उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह:

अर्थव्यवस्थेत कुटूंब आणि व्यवसाय अशी दोनच क्षेत्रे असलेल्या काल्पनिक अर्थव्यवस्थेतील उत्पन्नाच्या चक्राकार प्रवाहाची माहिती घेता येईल. भूमी, श्रम व भांडवल या उत्पादन घटकांची मालकी कुटुंबांकडे असते. कुटुंबांना या घटकांच्या सेवा विकून उत्पन्न मिळते. कुटुंबांकडून मिळणाऱ्या उत्पादन घटकांच्या आधारे व्यवसायसंस्था वस्तू व सेवांचे उत्पादन करतात व त्या कुटुंबांना किंवा उपभोक्त्यांना पुरवितात. अशा प्रकारे कुटुंब हे व्यवसायाकडून त्यांनी उत्पादित केलेल्या वस्तू विकत घेते. दोनच क्षेत्र असलेल्या अर्थव्यवस्थेतील उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह पुढील आकृतीत दाखविला आहे.




*आकृती: कुटुंबे व व्यवसायसंस्था यातील उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह*

कुटुंबे व व्यवसायसंस्था ही दोन क्षेत्रे असलेल्या अर्थव्यवस्थेतील उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह वरील आकृतीत दाखविलेला आहे. आकृतीत उत्पादन साधनसामग्री आणि वस्तू व सेवा यांचा वास्तव प्रवाह दाखविला आहे. आकृतीत, वरील बाजूस भूमी, श्रम, भांडवल व संयोजन कौशल्य या घटकांचा प्रवाह कुटुंबांकडून व्यवसायसंस्थांकडे जातो. तर उलट दिशेने वेतन, खंड, व्याज व नफा अशा घटकांच्या मोबदल्याच्या स्वरुपातील चलनी प्रवाह व्यवसायसंस्थांकडून कुटुंबांकडे जातो. आकृतीत खालच्या भागात वस्तू व सेवांवर कुटुंबांनी केलेल्या खर्चाच्या रूपाने चलनी प्रवाह कुटुंबांकडून व्यवसायसंस्थांकडे आणि वस्तू व सेवांचा प्रवाह विरुद्ध दिशेने व्यवसायसंस्थांकडून कुटुंबांकडे गेलेला आहे. पैशाचा किंवा चलनी प्रवाह घटकांच्या मोबदल्याच्या रूपात व्यवसायसंस्थांकडून कुटुंबाकडे जातो आणि उपभोग खर्चाच्या रूपाने हा प्रवाह परत व्यवसायसंस्थांकडे जातो. उत्पन्नाचा किंवा पैशाचा हा चक्राकार प्रवाह वर्षानुवर्षे सातत्याने चालू असतो. उत्पन्नाच्या चक्राकार प्रवाहाचा आकार नेहमीच स्थिर रहात नाही. मंदीच्या काळात या प्रवाहाचा संकोच होतो तर तेजीच्या काळात हा प्रवाह वाढलेला आढळतो.

कुटुंबे व व्यवसायसंस्था यातील उत्पन्नाचा चक्राकार प्रवाहात पुढील गोष्टी गृहीत धरलेल्या आहेत:

1) कुटुंबे आपल्या उत्पन्नातून बचत करीत नाहीत व तसेच व्यवसायसंस्था त्यांच्या नफ्यातील भागाची बचत करीत नाहीत.

2) अर्थव्यवस्थेत सरकार कोणतीही भूमिका पार पाडत नाही. सरकारला लोकांकडून कराच्या रूपाने पैसा मिळत नाही. तसेच सरकार व्यवसायसंस्थांनी उत्पादित केलेल्या वस्तू व सेवांवर करआकारणी करीत नाही.

3) वस्तू व सेवांची आयात किंवा निर्यात केली जात नाही.

## बचत व गुंतवणुकीसह उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह:

कुटुंबे आपल्याला मिळालेले सर्व उत्पन्न खर्च करतात असे वरील विवेचनात मानले आहे. प्रत्यक्ष व्यवहारात असे आढळत नाही. प्रत्यक्षातील अर्थव्यवस्थेत उत्पन्नाच्या चक्राकार प्रवाहातून उत्पन्नाची गळती होत असते. तसेच उत्पन्नाच्या चक्राकार प्रवाहात भर पडत असते. बचत उत्पन्नाच्या चक्राकार प्रवाहातील गळती होय तर गुंतवणूक या प्रवाहातील भर होय.

जेव्हा कुटुंबे आपल्या उत्पन्नातील काही भागाची बचत करतात तेव्हा त्यांच्या बचतीचा उत्पन्नाच्या चक्राकार प्रवाहावर परिणाम होतो. जेव्हा अधिक बचत केली जाते तेव्हा वस्तू व सेवांवरील खर्च कमी होऊन व्यवसायसंस्थांकडे जाणारा पैशाचा प्रवाह कमी होतो. व्यवसायसंस्थांना कमी पैसा मिळाल्याने ते कमी घटकांना उत्पादन कार्यात घेतात. त्यामुळे घटकांना देण्यात येणारा मोबदला कमी प्रमाणात दिला जातो. कुटुंबांच्या एकूण उत्पन्नात घट होते. बचतीमुळे अर्थव्यवस्थेतील एकूण उत्पन्न प्रवाह कमी होत असल्याने अर्थशास्त्रज्ञ बचतीला पैशाच्या खर्च प्रवाहातील गळती मानतात.

कुटुंबे आपल्या बचती बँका, विमा कंपन्या, वित्तीय गृहे किंवा इतर वित्तीय संस्थांमध्ये ठेवतात. या सर्व संस्थांना एकत्रितपणे वित्तीय संस्था किंवा वित्तीय बाजार म्हणतात. सर्व बचती वित्तीय बाजारात येतात असे येथे मानलेले आहे. तसेच कुटुंबा-कुटुंबांतर्गत कर्जव्यवहार होत नाहीत असेही गृहीत धरलेले आहे.

व्यवसायसंस्था यंत्रसामग्री, कारखाने, हत्यारे यासारख्या भांडवली वस्तूंच्या खरेदीसाठी वित्तीय बाजारातून कर्ज घेतात. उत्पादनक्षमता वाढविण्यासाठी व्यवसायसंस्था गुंतवणूक करतात. बचतीच्या रूपाने चक्राकार प्रवाहातून बाहेर गेलेले उत्पन्न वित्तीय बाजारात येऊन गुंतवणुकीच्या माध्यमातून पुन्हा उत्पन्न प्रवाहात येते. त्यामुळे उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह पूर्ववत चालू राहतो. पुढील आकृतीत हे अधिक स्पष्ट केले आहे.




*आकृती: बचत व गुंतवणुकीसह उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह*

बचत व गुंतवणुकीसह चक्राकार प्रवाहाच्या वरील आकृतीत मध्यभागी वित्तीय बाजार दर्शविला आहे. कुटुंबांच्या बचती वित्तीय बाजारात येतात. व्यवसायसंस्था वित्तीय बाजारातून कर्ज घेऊन गुंतवणूक करतात. त्यामुळे बचतीच्या रूपाने उत्पन्न-प्रवाहातून बाहेर पडलेला पैसा गुंतवणुकीच्या रूपाने पुन्हा प्रवाहात येऊन प्रवाह पूर्वीप्रमाणेच चालू राहतो.

*****************************************************************

# प्रकरण ३ - उत्पादण आणि रोजगार सिद्धांत

## प्रास्ताविक:

जे.बी. से यांनी बाजाराचा नियम मांडून अर्थव्यवस्थेत अतिरिक्त उत्पादनाची शक्यता नाकारली. प्रत्येक पुरवठा आपली मागणी निर्माण करतो. त्यामुळे जे जे उत्पादन होईल ते ते सर्व विकले जाते. त्यामुळे अर्थव्यवस्थेत जे जास्तीचे उत्पादन होईल ते ते सर्व विकले जाते. त्यामुळे अर्थव्यवस्थेत बेकारीची स्थिती निर्माण होत नाही हे 'से' यांनी स्पष्ट केले. जे. एम. केन्स यांनी 'से' च्या नियमावर टीका करून अतिरिक्त उत्पादनाची व बेकारीची शक्यता स्पष्ट केली. त्यांच्या मते, अर्थव्यवस्था अपूर्ण रोजगाराच्या पातळीला समतोलावस्थेत येते. केन्सने प्रभावी मागणीची कमतरता हे बेकारीचे कारण सांगितले.

## 3.1 रोजगाराचा सनातनवादी सिद्धांत:

रोजगाराचा सनातनवादी सिद्धांत असे गृहीत धरतो की, श्रमाचा पूर्ण रोजगार नेहमीच अस्तित्वात असतो. सनातनवाद्यांच्या मते, पूर्ण रोजगार ही सामान्य स्थिती असते आणि पूर्ण रोजगारापासून दूर जाणे ही असामान्य स्थिती असते. जरी कोणत्याही वेळी प्रत्यक्ष पूर्ण रोजगार नसला तरी पूर्ण रोजगाराकडे जाण्याची नेहमीच प्रवृत्ती असते, असे सनातनवादी सिद्धांताने प्रतिपादन केले आहे.

### रोजगाराच्या सनातन सिद्धांताची गृहीते:

रोजगाराचा सनातनवादी सिद्धांत पुढील गृहीतांवर आधारित आहे.

1) चलनवाढीशिवाय पूर्ण रोजगार अस्तित्वात आहे.
2) मुक्त बाजार किंमत पद्धती अस्तित्वात आहे.
3) श्रम व वस्तू बाजारात पूर्ण स्पर्धा आहे.
4) बंदिस्त, निर्हस्तक्षेपी भांडवलशाही अर्थव्यवस्था आहे.
5) वेतन आणि किमती लवचिक आहेत.
6) पैसारूप वेतन आणि वास्तव वेतन यात प्रत्यक्ष संबंध आहे.
7) पुरवठा स्वत: ची मागणी निर्माण करीत असल्याने केव्हाही मागणीची कमतरता असू शकत नाही.
8) अर्थव्यवस्थेचे एकूण उत्पादन हे उपभोग आणि गुंतवणूक खर्च यात विभागलेले आहे.

सनातनवाद्यांच्या मते, अर्थव्यवस्थेत सरकारचा हस्तक्षेप नसेल तर अर्थव्यवस्थेचा पूर्ण रोजगार पातळीला आपोआप समतोल प्रस्थापित होतो. अर्थव्यवस्थेत नेहमीच पूर्ण रोजगार असतो याचे स्पष्टीकरण सनातनवादी अर्थशास्त्रात 'से' च्या बाजाराच्या नियमाच्या आधारे दिलेले आहे. हा नियम रोजगाराच्या सनातनवादी सिद्धांताचा गाभा आहे.

फ्रेंच अर्थशास्त्रज्ञ जे. बी. से यांनी 'प्रत्येक पुरवठा स्वत: ची मागणी निर्माण करतो' या शब्दात आपला बाजाराचा नियम मांडला आहे. त्यांच्या मते, उत्पादन हे वस्तूसाठी मागणी निर्माण करते. त्याच्या मूळ स्वरुपात हा नियम वस्तुविनिमयाचे व्यवहार होत असलेल्या अर्थव्यवस्थेला लागू पडतो. बाजारात विक्रीसाठी आणलेली प्रत्येक वस्तू इतर काही वस्तूंसाठीची मागणी असते. या स्थितीत वस्तूचा पुरवठा व मागणी समान राहून अतिरिक्त उत्पादनाची शक्यता निर्माण होत नाही. पैशाचे अस्तित्व विचारात घेतले तरी या नियमास बाधा येत नाही. अर्थव्यवस्थेत जेवढ्या रकमेच्या वस्तूचे उत्पादन होते तेवढीच रक्कम खंड, वेतन, व्याज व नफा या रूपात उत्पादन घटकांना मिळते. उत्पादन घटकांना मिळणाऱ्या उत्पन्नातूनच मागणी निर्माण होत असल्याने ती पुरवठ्याएवढी असते. उत्पादन घटकांच्या मालकांना मिळालेले सर्व उत्पन्न ते उपभोग्य वस्तूंवर खर्च करतात या गृहीतावर से चा सिद्धांत आधारित आहे. उत्पादन घटकांना मिळालेले जे उत्पन्न खर्च होत नाही ते बचत केले जाते व बचत आपोआप गुंतविली जाते. बचत व गुंतवणूक यात असमानता निर्माण झाल्यास व्याजदर यंत्रणेद्वारे समानता आपोआप राखली जाते. व्याजदर उच्च असेल तर बचत जास्त असते आणि व्याजदर अल्प असेल तर बचतही कमी असते. तसेच व्याजदर उच्च असेल तर गुंतवणूक निधीसाठी मागणी कमी असते आणि व्याज दर अल्प असेल तर गुंतवणूक निधीसाठी मागणी जास्त असते. बचत व गुंतवणूक यात कशा प्रकारे समानता प्रस्थापित होते हे पुढील आकृतीत दाखविले आहे.

SYBCom-BEco-DBC




*आकृती: व्याजदराद्वारे बचत व गुंतवणूक समानता*

वरील आकृतीत 'बब' हा बचत वक्र आणि 'गग' हा गुंतवणूक वक्र आहे. 'स' बिंदूत 'अव' या व्याज दराला हे दोन्ही वक्र एकमेकांना छेदतात. या व्याज दराला बचत व गुंतवणूक समान असून ती 'अन' एवढी आहे. अशा स्थितीत जर गुंतवणुकीत वाढ झाली तर गुंतवणूक वक्र '$ग_1ग_1$' प्रमाणे उजव्या बाजूला स्थानांतरित होईल. 'अव' या व्याजदराला गुंतवणूक बचतीपेक्षा जास्त आहे. सनातनवादी अर्थशास्त्रज्ञांच्या मते, गुंतवणुकीत वाढ झाली तरी बचत वक्र 'बब' हा बचत वक्र त्याच्या मूळ ठिकाणीच राहील, बचत व गुंतवणूक समानता राखण्यासाठी व्याजदरात वाढ होईल. आकृती मध्ये '$अव_1$' हा नवीन व्याज दर असून या दराला '$स_1$', बिंदूत 'बब' आणि '$ग_1ग_1$' हे दोन्ही वक्र एकमेकांना छेदतात आणि 'अप' या पातळीला बचत व गुंतवणूक समान होतात.

पैशावर आधारलेल्या अर्थव्यवस्थेत 'से' च्या नियमाची वैधता सनातनवादी पैसा संख्या सिद्धांतावर आधारित आहे. प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ आयर्विंग फिशर यांनी पैसा संख्या सिद्धांताचा व्यवहार दृष्टीकोन मांडला. पैसा संख्या सिद्धांत असे स्पष्ट करतो की, पैशाची संख्या दुप्पट केल्यास किंमत पातळीही दुप्पट होते; याउलट पैशाची संख्या निमपट केल्यास किंमत पातळीही निमपट होते. पैसा केवळ विनिमयाचे माध्यम म्हणून कार्य करतो. पैशाच्या पुरवठ्यातील वाढीचा उत्पादन व रोजगार पातळीवर काहीही परिणाम होत नाही.

रोजगाराच्या सनातनवादी सिद्धांताचा अंतिम दृष्टिकोन 'प्रा. पिगु' यांनी मांडला असून त्यांनी श्रम बाजाराच्या संदर्भात 'से' चा नियम स्पष्ट केला आहे. त्यांच्या मते, खुल्या स्पर्धेच्या स्थितीत आर्थिक पद्धतीची प्रवृत्ती श्रम बाजारात आपोआप पूर्ण रोजगार साध्य करण्याची असते. वेतन रचनेतील ताठरता आणि मुक्त बाजार अर्थव्यवस्थेच्या कार्यातील अडथळे यामुळे बेकारी निर्माण होते. कामगार संघटनांना मान्यता, किमान वेतन कायदा मंजूर करणे इत्यादी मार्गांनी सरकार हस्तक्षेप करते आणि श्रमीक मक्तेदारीयुक्त वर्तन स्वीकारतात तेव्हा वेतनात वाढ होऊन बेकारी निर्माण होते. बेकारी दूर करून पूर्ण रोजगार साध्य करण्यासाठी पैसारूप वेतन कमी करावे लागते.

रोजगाराच्या सनातनवादी सिद्धांतात पैसारूप वेतन आणि वास्तव वेतन यातील बदल प्रत्यक्षपणे संबंधित आणि प्रमाणशीर आहेत. जेव्हा पैसारूप वेतनात घट होते तेव्हा वास्तव वेतनातही त्याच प्रमाणात घट होते व ते बेकारीत घट करते आणि शेवटी अर्थव्यवस्थेत पूर्ण रोजगार साध्य करते. हा संबंध किमती पैशाच्या संख्येच्या प्रमाणात आहेत या गृहीतावर आधारित आहे. स्पर्धात्मक अर्थव्यवस्थेत पैसारूप वेतनातील घट वस्तूचा उत्पादन खर्च आणि किंमत यात घट करुन त्यांच्या मागणीत वाढ करते असे प्रतिपादन करण्यात आलेले आहे. वस्तूची वाढलेली मागणी पूर्ण करण्यासाठी अधिक कामगारांना वस्तूच्या उत्पादनासाठी कामावर घेतले जाते. रोजगारात वाढ होत असताना पूर्ण रोजगार साध्य होईपर्यंत एकूण उत्पादनातही वाढ होते; परंतु जेव्हा अर्थव्यवस्था पूर्ण रोजगार पातळीला येते तेव्हा एकूण उत्पादन स्थिर राहते. भांडवलाचा साठा, तंत्रज्ञानविषयक ज्ञान व साधनसामग्री दिलेली असताना एकूण उत्पादन हे रोजगार संख्येचे वाढते फलन आहे. सनातनवाद्यांची अशी धारणा होती की, सामान्य स्पर्धात्मक स्थितीत चलनवाढ होऊ न देता पूर्ण रोजगार राखला जावू शकतो. 'से' च्या नियमाचा प्रत्यय येत असल्याने पूर्ण रोजगार पातळीचे उत्पादन त्या पातळीची मागणी निर्माण करते.

## 3.2 सनातनवादी सिद्धांतावरील केन्स यांची टीका:

लॉर्ड जॉन मेनार्ड केन्स यांनी रोजगाराच्या सनातनवादी सिद्धांतावर मोठ्या प्रमाणात टीका केली आहे. टीकेचे मुद्दे पुढीलप्रमाणे आहेत.

**1) पूर्ण रोजगाराचे गृहीत:** सनातनवादी सिद्धांतात पूर्ण रोजगार पातळीला अर्थव्यवस्था समतोलात येते असे गृहीत धरले आहे. केन्स यांनी या गृहीतावर टीका केली आहे. त्यांच्या मते, हे गृहीत अवास्तव आहे पूर्ण रोजगार ही विशेष स्थिती असून भांडवलशाही अर्थव्यवस्थेत अपूर्ण रोजगार ही सामान्य स्थिती असते याचे कारण भांडवलशाही अर्थव्यवस्था 'से' च्या बाजाराच्या नियमानुसार कार्य करीत नाहीत आणि पुरवठा नेहमीच मागणीपेक्षा जास्त असतो. भांडवलशाही अर्थव्यवस्थेतील अनैच्छिक बेकारीचे अस्तित्व अपूर्ण रोजगार समतोल ही सामान्य स्थिती असल्याचे स्पष्ट करते.

**2) अतिरिक्त उत्पादन:** सनातनवादी रोजगार सिद्धांतात अतिरिक्त उत्पादनाची शक्यता नाकारण्यात आली होती. 'से' च्या नियमानुसार 'प्रत्येक पुरवठा स्वत: ची मागणी निर्माण करतो. त्यामुळे अर्थव्यवस्थेत अतिरिक्त उत्पादनाची शक्यता नसते. केन्स यांच्या मते, अर्थव्यवस्थेत अतिरिक्त उत्पादन शक्य असते. कारण त्यांच्या मते, उत्पादन घटक त्यांना मिळालेले सर्व उत्पन्न वस्तू विकत घेण्यासाठी खर्च करत जात नाहीत तर, उत्पन्नाचा काही भाग बचत करतात. मिळालेले सर्व उत्पन्न उपभोग्य वस्तूंवर खर्च न झाल्याने एकूण मागणीची कमतरता निर्माण होते. सर्व उत्पादित वस्तू विकल्या न जावून सर्वसाधारण अतिरिक्त उत्पादनाची स्थिती निर्माण होते.

**3) स्वयं-समायोजन:** सनातनवादी रोजगार सिद्धांतात अर्थव्यवस्था स्वयंचलित आणि स्वयं-समायोजक असल्याचे मानले आहे. पूर्ण रोजगार समतोलाच्या स्वयंचलित व स्वयं-समायोजक प्रक्रियेसाठी निर्हस्तक्षेपाचे धोरण आवश्यक आहे असा सनातनवादी दृष्टिकोन आहे. मात्र, केन्स यांना तो मान्य नाही. त्यांच्या मते, भांडवलशाही अर्थव्यवस्था स्वयंचलित आणि स्वयं-समायोजक नसते. यात गरीब व श्रीमंत असे दोन वर्ग असतात. श्रीमंतांकडे अधिक संपत्ती असते व ते ती उपभोगावर खर्च करीत नाहीत आणि गरीबांकडे उपभोग्य वस्तू खरेदी करण्यासाठी पुरेसा पैसा नसतो. त्यामुळे एकूण पुरवठ्याच्या तुलनेत एकूण मागणीची कमतरता निर्माण होऊन अर्थव्यवस्थेत अतिरिक्त उत्पादन व बेकारी अनुभवास येते.

**4) बचत व गुंतवणूक समानता:** सनातनवाद्यांची अशी धारणा होती की पूर्ण रोजगार पातळीला बचत व गुंतवणूक समान असते आणि यात असमानता निर्माण झाल्यास व्याज दराच्या यंत्रणेद्वारे ती दूर होते. याचाच अर्थ, सनातनवाद्यांच्या मते, बचत व गुंतवणूक समान नसेल तर व्याज दरातील बदलाद्वारे त्यात समानता निर्माण होते. केन्सच्या मते, बचत व गुंतवणूक यातील समानता सनातनवादी म्हणतात त्याप्रमाणे व्याजदरामुळे निर्माण होत नाही तर उत्पनातील बदलामुळे निर्माण होते. त्यांच्या मते, बचत उत्पन्नावर अवलंबून असते आणि गुंतवणूक व्याज दराबरोबरच भांडवलाच्या सीमांत कार्यक्षमतेवर अवलंबून असते. बचत गुंतवणुकीपेक्षा जास्त असेल तर याचा अर्थ लोक उपभोगावर कमी खर्च करतात, त्यामुळे मागणी कमी होते. उत्पादन अतिरिक्त ठरून गुंतवणूक, उत्पन्न, रोजगार व उत्पादन यात घट होते. उत्पन्नात घट झाल्याने बचत कमी होऊन बचत व गुंतवणूक यात समानता निर्माण होते.

**5) वेतन कपातीचे धोरण:** प्रा. पिगु यांच्या मते, अर्थव्यवस्थेत बेकारी निर्माण झाल्यास पैसारूप वेतनातील कपातीद्वारे बेकारी दूर करुन अर्थव्यवस्थेत पूर्ण रोजगार प्रस्थापित करता येतो. केन्स यांनी प्रा. पिगु यांच्या वेतन कपातीच्या धोरणावर टीका केली आहे. त्यांच्या मते, अर्थव्यवस्थेत बेकारी कमी करण्याच्या बाबतीत वेतन कपातीचे धोरण योग्य नाही. वेतन कपातीमुळे बेकारी कमी होण्याऐवजी वाढण्याचीच शक्यता आहे. वेतनात कपात करून एखाद्या उद्योगातील रोजगारात वाढ करता येऊ शकते. मात्र संपूर्ण अर्थव्यवस्थेत वेतन कपातीद्वारे रोजगारात वाढ करता येत नाही, अर्थव्यवस्थेत मोठ्या प्रमाणात वेतनात कपात केल्यास लोकांच्या उत्पन्नात घट होऊन वस्तूंची मागणी कमी होईल. त्यामुळे उत्पादन व रोजगार यात घट होईल. केन्स यांच्या मते, आधुनिक काळातील कामगार संघटित झालेले असून त्यांचा वेतन कपातीला विरोध असल्याने व्यवहारिक दृष्टीनेही वेतन कपातीच्या धोरणाचा अवलंब करणे अडचणीचे आहे.

**6) सरकारचा हस्तक्षेप:** सरकारने अर्थव्यवस्थेतील कार्यात हस्तक्षेप करू नये असे सनातनवाद्यांचे मत होते. पूर्ण रोजगार समतोलाच्या स्वयंचलित व स्वयं-समायोजक प्रक्रियेसाठी निर्हस्तक्षेपाचे धोरण आवश्यक आहे; या सनातनवाद्यांच्या दृष्टिकोनाशी केन्स सहमत नाहीत. त्यांच्या मते, भांडवलशाही अर्थव्यवस्था

स्वयंचलित व स्वयं-समायोजक नसते. राजकोषीय व चलनविषयक उपाययोजनांद्वारे अर्थव्यवस्थेतील मागणी व पुरवठ्याचा मेळ घालण्यासाठी केन्स यांनी सरकारचा हस्तक्षेप आवश्यक असल्याचे ठाम प्रतिपादन केले.

**7) दीर्घकालीन समतोल:** सनातनवादी अर्थशास्त्रज्ञांच्या मते, अर्थव्यवस्था दीर्घकाळात पूर्ण रोजगार पातळीला समतोलात येते. सनातनवाद्यांनी दीर्घकाळास महत्त्व दिल्याबद्दल केन्स यांनी टीका केली आहे. केन्स यांनी अल्पकालीन समतोलावर भर दिला आहे. केन्सच्या मते, दीर्घकाळात आपण सर्व मृत झालेले असू (In the Long Run We are All Dead), त्यामुळे दीर्घकाळात सर्व काही चांगले असेल असे म्हणणे उपयोगाचे नाही. केन्सचे विश्लेषण अल्पकाळाशी संबंधित आहे. त्यांनी अभिरुची, सवयी, उत्पादनाचे तंत्र, श्रमाचा पुरवठा वगैरे गोष्टी स्थिर मानल्या आहेत, उपभोग मागणी स्थिर असल्याचे गृहीत धरून त्यांनी बेकारी दूर करण्यासाठी गुंतवणूक वाढविण्यावर भर दिला आहे. अशा प्रकारे रोजगाराचा सनातनवादी सिद्धांत अवास्तव आहे. तसेच सध्याच्या स्थितीत तो लागू पडणारा नाही.

## 3.3 केन्सचा रोजगार सिद्धांत:

केन्स यांनी त्यांच्या 'The General Theory of Employment Interest and Money' या ग्रंथात रोजगार विषयक सिद्धांताची चर्चा केली आहे. केन्स यांनी सनातनवादी सिद्धांताच्या विरुद्ध सिद्धांत मांडला आहे. त्यांच्या मते, सनातनवादी सिद्धांत हा पूर्ण रोजगाराच्या स्थितीतच लागू पडतो. सर्वसाधारण बाबतीत तो लागू पडत नाही. सनातनवाद्यांचे पूर्ण रोजगार स्थितीविषयीचे मूलभूत गृहीत वास्तववादी नाही. सर्वसाधारणपणे अर्थव्यवस्थेत नेहमी अपूर्ण रोजगार समतोल आढळतो. पूर्ण रोजगार ही अपवादाने दिसणारी बाब आहे. केन्सने आपला सिद्धांत सर्वसाधारण असल्याचा दावा केला आहे. केन्सचा सिद्धांत सर्वसाधारण असण्याची कारणे पुढीलप्रमाणे:

1) केन्सचा सिद्धांत हा पूर्ण व अपूर्ण अशा रोजगाराच्या सर्व पातळ्यांशी संबंधित आहे.
2) केन्सने संपूर्ण आर्थिक व्यवस्थेचा विचार केला आहे.
3) मागणी, उपभोग, गुंतवणूक, बचत, रोजगार, उत्पन्न व उत्पादन यांबाबत संपूर्ण अर्थव्यवस्थेचा विचार केला आहे.
4) केन्सच्या विश्लेषणाला कालमर्यादा नाही, ते सर्वसाधारण / कोणत्याही क्षणी लागू होण्यासारखे आहे.

### केन्सच्या रोजगार सिद्धांताची गृहीते:

1) केन्सने अल्पकाळाचा विचार केला आहे.
2) केन्सच्या सिद्धांतात उपभोग फलन, व्याजदर इ. चले अल्पकाळात स्थिर मानली आहेत.

### प्रभावी मागणीचे तत्व:

प्रभावी मागणीचे तत्व हे केन्स यांच्या रोजगाराच्या सर्वसाधारण सिद्धांताच्या केंद्रास्थानी आहे. या सिद्धांतानुसार, रोजगाराची संख्या अर्थव्यवस्थेतील प्रभावी मागणीच्या पातळीवर अवलंबून असते. एकूण मागणीच्या किंवा प्रभावी मागणीच्या कमतरतेमुळे बेकारी निर्माण होते. उपभोग आणि गुंतवणूक हे, अर्थव्यवस्थेतील प्रभावी मागणीचे दोन मूलभूत निर्धारक आहेत. प्रभावी मागणीची पातळी रोजगाराची पातळी निश्चित करते व त्यातून अर्थव्यवस्थेतील उत्पादन व उत्पन्नाची पातळी निश्चित होते. अशा प्रकारे रोजगाराची पातळी ही उपभोग व गुंतवणुकीने निश्चित होते. आधुनिक काळातील भांडवलशाही अर्थव्यवस्था सरकारचा हस्तक्षेप व सार्वजनिक क्षेत्राचे अस्तित्व यामुळे मिश्र अर्थव्यवस्था या स्वरूपाच्या आहेत. त्यामुळेच सरकारचा खर्च हा देखिल आधुनिक अर्थव्यवस्थेतील प्रभावी मागणीचा महत्त्वाचा निर्धारक आहे.

प्रभावी मागणी = C + I + G

C = कुटुंबाचा उपभोग खर्च (Consumption)

I = खासगी व्यवसायसंस्थांचा गुंतवणूक खर्च (Investment)

G = उपभोग आणि गुंतवणूक वस्तूंवरील सरकारचा खर्च (Government)

### प्रभावी मागणीच्या पातळीचे विश्लेषण (प्रभावी मागणी ठरविणारे घटक):

केन्स च्या मते, एकूण पुरवठा फलन व एकूण मागणी फलन यांच्या परस्परक्रियांनी प्रभावी मागणी निश्चित होते. विशिष्ट रोजगार पातळीला उत्पादकाच्या दृष्टीने असलेली एकुण मागणी किंमत आणि एकुण पुरवठा किंमत अर्थव्यवस्थेतील रोजगार संख्या निश्चित करते.

**एकूण पुरवठा फलन:**

दिलेल्या वस्तूच्या परिमाणाची 'पुरवढा किंमत म्हणजे अशी किंमत की, ज्या किमतीला वस्तूच्या त्या परिमाणाचा पुरवठा करण्याची उत्पादकाला इच्छा असते. त्यामुळे वस्तूचे पुरवठा पत्रक वेगवेगळ्या किमतीला विक्रेता जे वेगवेगळे परिमाण विक्रीसाठी आणतो ते दर्शविते. संपूर्ण अर्थव्यवस्थेसाठीचे एकूण पुरवठा फलन म्हणजे सर्व उत्पादकांचा उत्पादनाचा पुरवठा करण्याच्या बाबतीतील प्रतिसाद होय, केन्सच्या मते, रोजगाराच्या पातळीतील बदलाबरोबरच उत्पादनाची पातळी बदलते. वस्तूंचे उत्पादन करण्यासाठी उत्पादकाला खर्च करावा लागतो. विशिष्ट रोजगार पातळीला होणारे उत्पादन विकून त्याला आपला खर्च भरून निघेल एवढे किमान उत्पन्न मिळणे अपेक्षित असते. एकूण पुरवठा फलन म्हणजे विविध रोजगार पातळ्यांना होणारे उत्पादन विकून उत्पादकाला मिळाल्याच पाहिजेत अशा विविध किमान रकमांचे पत्रक होय, थोडक्यात, "एकूण पुरवठा किंमत म्हणजे विशिष्ट रोजगार पातळीला उत्पादनाच्या विक्रीपासून आवश्यक असलेली किंवा मिळालीच पाहिजे अशी प्राप्ती होय." "वेगवेगळ्या रोजगार पातळ्यांना असलेल्या एकूण पुरवठा किमतीचे पत्रक म्हणजे एकूण पुरवठा पत्रक होय."
पुढे काल्पनिक एकूण पुरवठा पत्रक दिले आहे.

*एकूण पुरवठा पत्रक:*

| रोजगाराची पातळी (लाख कामगार) | एकूण पुरवठा किंमत (कोटी रुपये) |
|---|---|
| 1 | 100 |
| 2 | 150 |
| 3 | 200 |
| 4 | 250 |
| 5 | 300 |
| 6 | 350 |
| 7 | 400 |

वरील तक्त्यात दिलेल्या माहितीवरून असे दिसते की, रोजगार पातळीतील वाढीबरोबर एकूण पुरवठा किंमत वाढत जाते. जर उत्पादकाला 1 लाख लोकांना रोजगार उपलब्ध करावयाचा असेल, तर त्यांनी उत्पादित केलेल्या उत्पादनाच्या विक्रीपासून त्यांना 1०० कोटी रुपये मिळालेच पाहिजेत, जर त्यांना 2, 3, 4 लाख लोकांना रोजगार उपलब्ध करावयाचा असेल, तर त्यांना उत्पादित केलेल्या उत्पादनाच्या विक्रीपासून अनुक्रमे 150 कोटी रुपये, 200 कोटी रुपये व 250 कोटी रुपये मिळाले पाहिजेत. जेव्हा अर्थव्यवस्था पूर्ण रोजगार पातळीला पोहोचते (7 लाख कामगार) तेव्हा एकूण पुरवठा किंमत सातत्याने वाढत जाते; परंतु रोजगारात मात्र वाढ होत नाही. या पत्रकाच्या आधारे एकूण पुरवठा वक्र काढता येतो. तो डावीकडून उजवीकडे वर चढत जाणारा असतो. रोजगार पातळीत वाढ झाली असता मिळालीच पाहिजे अशा अपेक्षित प्राप्तीत वाढ होते. मात्र, जेव्हा पूर्ण रोजगार पातळी गाठली जाते तेव्हा हा वक्र उभा म्हणजे 'य' अक्षाला समांतर होतो. एकूण पुरवठा किमतीत वाढ झाली तरी अधिक रोजगार पुरविणे शक्य नसल्याचे तो दर्शवितो.

**एकूण मागणी किंमत:**

"एकूण मागणी किंमत म्हणजे विशिष्ट रोजगार पातळीला झालेल्या उत्पादनाची विक्री करून अपेक्षित असलेली प्राप्ती होय." अर्थव्यवस्थेतील वेगवेगळ्या रोजगार पातळ्यांना एकूण मागणी किमती वेगवेगळ्या असतात."वेगवेगळ्या रोजगार पातळ्यांना असलेल्या एकूण मागणी किमतीचे पत्रक म्हणजे 'एकूण मागणी पत्रक' होय." पुढे काल्पनिक एकूण मागणी पत्रक दिले आहे.

*एकूण मागणी पत्रक:*

| रोजगाराची पातळी (लाख कामगार) | एकूण मागणी किंमत (कोटी रुपये) |
|---|---|
| 1 | 120 |
| 2 | 160 |
| 3 | 205 |
| 4 | 250 |
| 5 | 290 |
| 6 | 345 |
| 7 | 395 |



SYBCom-B.Eco-DBC

वरील तक्त्यात दिलेल्या माहितीवरून असे दिसते की, रोजगाराच्या पातळीत वाढ झाली असता अपेक्षित प्राप्तीत वाढ होते आणि रोजगाराची पातळी कमी असताना अपेक्षित प्राप्तीत घट होते. जेव्हा 5 लाख लोकांना रोजगार पुरविला आहे, तेव्हा एकूण मागणी किंमत 290 कोटी रुपये आहे आणि जेव्हा 2 लाख लोकांना रोजगार पुरविला आहे, तेव्हा एकूण मागणी किंमत 160 कोटी रुपये आहे. केन्सच्या मते, एकूण मागणी फलन हे रोजगार पातळीचे वाढते फलन आहे. एकूण मागणी पत्रकाच्या आधारे एकूण मागणी वक्र काढता येतो. तो डावीकडून उजवीकडे वर चढत जातो कारण रोजगार पातळीत वाढ झाली असता एकूण मागणी किमतीतसुद्धा वाढ होते.

**प्रभावी मागणीची निश्चिती:**

"जेथे एकूण मागणी किंमत व एकूण पुरवठा किंमत समान होते तेथे अर्थव्यवस्थेतील रोजगाराची पातळी निश्चित होते." उत्पादकाला अपेक्षित असलेली प्राप्ती आणि त्यांना मिळालीच पाहिजे अशी प्राप्ती जेथे समान होते तो बिंदू प्रभावी मागणी दर्शविते. याचाच अर्थ प्रभावी मागणी म्हणजे अशी मागणी की जी पुरवठ्याबरोबर असते. येथे उत्पादकाला सर्वसाधारण नफा मिळतो. जर एकूण मागणी किंमत एकूण पुरवठा किमतीपेक्षा जास्त असेल तर उत्पादकाला अधिक कामगारांना कामावर घेऊन नफा वाढविता येतो. एकूण मागणी किंमत म्हणजेच अपेक्षित प्राप्ती एकूण पुरवठा किमतीबरोबर म्हणजेच मिळालीच पाहिजे अशा प्राप्तीबरोबर होईपर्यंत ते रोजगारात वाढ करतील. एकूण मागणी किंमत व एकूण पुरवठा किंमत समान झाली की, प्रभावी मागणीचा बिंदू निश्चित होतो. हा बिंदू अर्थव्यवस्थेतील उत्पादन व रोजगाराची पातळी निश्चित करतो. पुढील तक्त्याच्या आधारे प्रभावी मागणीची निश्चिती स्पष्ट करता येईल.

*एकूण मागणी व एकूण पुरवठ्याचे पत्रक:*

| रोजगाराची पातळी (लाख कामगार) | एकूण पुरवठा किंमत (कोटी रुपये) | एकूण मागणी किंमत (कोटी रुपये |
|---|---|---|
| 1 | 100 | 120 |
| 2 | 150 | 160 |
| 3 | 200 | 205 |
| 4 | 250 | 250 |
| 5 | 300 | 290 |
| 6 | 350 | 345 |
| 7 | 400 | 395 |

वरील तक्त्यात दिलेल्या माहितीवरून असे दिसते की, जोपर्यंत एकूण मागणी किंमत ही एकूण पुरवठा किमतीपेक्षा अधिक आहे तोपर्यंत उत्पादकांना अधिक कामगारांना कामावर घेणे फायदेशीर ठरते. मात्र, अपेक्षित प्राप्ती व मिळालीच पाहिजे अशी प्राप्ती 250 कोटी रुपये होते, तेव्हा तेथे 4 लाख लोकांना रोजगार दिला जातो. येथे असलेली मागणी ही प्रभावी मागणी आहे. आकृतीच्या आधारे, प्रभावी मागणीची निश्चिती व अर्थव्यवस्थेचा समतोल स्पष्ट करता येईल.




*आकृती: प्रभावी मागणी*

वरील आकृतीत,

'य' अक्ष = प्राप्ती किंवा उत्पन्न, 'क्ष' अक्ष = रोजगार पातळी

'एमा' = एकूण मागणी फलन, 'एपु' = एकूण पुरवठा फलन

'एमा' व 'एपु' हे दोनी वक्र एकमेकांना 'स' बिदूत छेदतात. या बिंदूने दर्शविलेली मागणी ही प्रभावी मागणी आहे. येथे 'अप' एवढया कामगारांना कामावर घेतले जाते. या बिंदूव्यतिरिक्त असलेल्या बिंदूपाशी उत्पादकाला असाधारण नफा मिळतो किंवा तोटा होतो. 'अप$_1$', रोजगार पातळीला अपेक्षित प्राप्ती ही मिळालीच पाहिजे अशा प्राप्तीपेक्षा जास्त असल्याने उत्पादकांना नफा होतो, त्यांना अधिक कामगारांना रोजगार देणे फायदेशीर ठरते. 'अप' या पातळीपर्यंत रोजगारात वाढ करणे फायदेशीर आहे. याउट 'अप$_2$' या रोजगार पातळीला अपेक्षित प्राप्ती पेक्षा मिळालीच पाहिजे अशी प्राप्ती जास्त आहे. त्यामुळे उत्पादकांना तोटा होतो.

अशा प्रकारे आकृतीतील 'स' बिंदूत अर्थव्यवस्थेतील प्रत्यक्ष रोजगाराची पातळी निश्चित होते. अर्थव्यवस्थेतील उपलब्ध श्रमिकांची संख्या 'अप२' असल्याने हा समतोल अपूर्ण रोजगार सामतोल आहे.

केन्सच्या मते, एकूण मागणी फलन व एकूण पुरवठा फलन हे जे प्रभावी मागणीचे निर्धारक आहेत त्यापैकी एकूण पुरवठा फलन दिलेले आहे कारण ते उत्पादनाची तांत्रिक स्थिती, कच्च्या मालाची उपलब्धता वगैरे बाबींवर अवलंबून असते आणि अल्पकाळात यात बदल होत नाही. त्यामुळे अर्थव्यवस्थेतील रोजगार पातळी निश्चित करण्यात एकूण मागणी फलनच महत्त्वाची भूमिका बजावते.

**पूर्ण रोजगार पातळीला समतोल:**

केन्सच्या मते, एकूण मागणी फलन हे उपभोग फलन आणि गुंतवणूक फलन यावर अवलंबून असते.

उपभोग खर्च किंवा गुंतवणूक खर्च किंवा दोन्हींमध्ये घट झाल्यामुळे बेकारी निर्माण होते. त्यामुळेच उपभोग खर्च किंवा गुंतवणूक खर्च किंवा दोन्हीमध्ये वाढ करून रोजगाराच्या पातळीत वाढ करता येते. अर्थव्यवस्थेत पूर्ण रोजगार प्रस्थापित करण्यासाठी एकूण मागणीत वाढ घडवून आणणे आवश्यक आहे. एकूण मागणीत वाढ घडून आल्यास अर्थव्यवस्था पूर्ण रोजगाराच्या पातळीला समतोलात येऊ शकते, हे पुढील आकृती वरुन स्पष्ट करता येते.




*आकृती: पूर्ण रोजगार पातळीचा समतोल*

वरील आकृतीत,

'य' अक्ष = प्राप्ती, 'क्ष' अक्ष = रोजगार, 'एमा' = एकुण मागणी वक्र, 'एपु''= एकुण पुरवठा वक्र दाखविले आहेत. 'स' बिंदूत 'एमा' वक्र 'एपु' वक्राला छेदतो. 'स' बिंदू हा प्रभावी मागणीचा बिंदू असून तो 'अर$_1$, 'ही रोजगाराची पातळी निश्चित करतो. 'अर$_2$' ही अर्थव्यवस्थेतील पूर्ण रोजगाराची पातळी असून, त्या पातळीला समतोल साध्य करण्यासाठी प्रभावी मागणीच्या बिंदूत बदल होणे आवश्यक आहे. हे एकूण मागणीत वाढ करून एकूण मागणी वक्र 'एमा$_1$' या ठिकाणी स्थानांतरित झाला असता शक्य होते. 'एमा$_1$', हा वक्र 'एपु' वक्रास 'स$_1$' या बिंदूत छेदतो, 'स$_1$' हा प्रभावी मागणीचा नवीन बिंदू असून, तो अर्थव्यवस्थेतील पूर्ण रोजगार पातळीचा समतोल दर्शवितो. ही पर्याप्त रोजगार पातळी आहे. 'स$_1$' या बिंदूच्या पुढे एकूण मागणीत वाढ झाली तर केवळ चलनवाढ घडून येईल कारण उपलब्ध सर्व साधनसामग्री पूर्णपणे वापरली जात असून, अल्पकाळात या साधनसामग्रीत वाढ करणे शक्य नसते. प्रभावी मागणीचे तत्व हे केन्स यांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. प्रभावी मागणी अर्थव्यवस्थेतील रोजगाराची पातळी निश्चित करते. प्रभावी मागणीत जेव्हा

वाढ होते, तेव्हा रोजगारातही वाढ होते आणि प्रभावी मागणीत घट होते तेव्हा रोजगारातही घट होते. अशा प्रकारे प्रभावी मागणीच्या कमतरतेमुळे बेकारी निर्माण होते.

प्रभावी मागणी ही एकूण मागणी फलन व एकूण पुरवठा फलन यावर अवलंबून असते. एकूण मागणी फलन व एकूण पुरवठा फलनाच्या समतोल बिंदूने प्रभावी मागणी निश्चित होते. एकूण पुरवठा फलन अल्पकाळात स्थिर असल्याचे केन्सने गृहीत धरल्याने त्यांच्या सिद्धांतात एकूण मागणी फलन महत्त्वाचे आहे. एकूण मागणी फलन हे उपभोग फलन व गुंतवणूक फलन यांनी मिळून ठरते, उपभोग फलन हे उत्पन्नाचा आकार व लोकांची उपभोग प्रवृत्ती या दोन घटकांनी निश्चित होते. गुंतवणूक फलन हे अर्थव्यवस्थेतील गुंतवणुकीचे परिमाण निश्चित करीत असून, ते भांडवलाची सीमांत कार्यक्षमता आणि व्याजाचा दर यावर अवलंबून असते. भांडवलाची सीमांत कार्यक्षमता ही भांडवली मालमत्तेपासूनचे अपेक्षित उत्पन्न व त्या मालमत्तेची पुरवठा किंमत यावर अवलंबून असते. तर व्याजाचा दर रोखता पसंती फलन आणि पैशाची संख्या यावर अवलंबून असतो. समाजाची रोखता पसंती ही व्यवहार हेतू, सावधगिरी हेतू आणि लाभ किंवा सट्टेबाजीचा हेतू अशा तीन हेतूंनी निश्चित होते. केन्स यांचा सिद्धांत असे स्पष्ट करतो की, अर्थव्यवस्थेतील उत्पन्न व रोजगाराच्या पातळीत वाढ करण्यासाठी प्रभावी मागणीत वाढ घडवून आणणे आवश्यक आहे व त्यासाठी गुंतवणूक खर्चात वाढ झाली पाहिजे. केन्स यांच्या सिद्धांतात गुंतवणूक हा महत्त्वाचा घटक आहे.

**केन्सच्या सिद्धांतावरील टीका:**

केन्सच्या सिद्धांताने आधुनिक आर्थिक विचारात महत्त्वाचे योगदान दिले असले तरी या सिद्धांतात पुढील उणिवा दिसून देतात.

1) **भांडवलशाही सिद्धांत:** केन्सचा सिद्धांत हा मूलभूतपणे भांडवलशाही सिद्धांत आहे. तो मुक्त भांडवलशाही अर्थव्यवस्थेतील रोजगाराच्या निश्चितीची चर्चा करतो. समाजवादी आर्थिक व्यवस्थेच्या बाबतीत हा सिद्धांत लागू पडत नाही.

2) **चलनवाढीत अनुपयोगी:** केन्सवादी अर्थशास्त्र हे मंदीचे अर्थशास्त्र आहे. केन्सच्या सिद्धांताने भांडवलशाही अर्थव्यवस्थेतील मंदीच्या अवस्थेतील बेकारीचा प्रश्न सोडविण्यासाठी 'तुटीचा-अर्थभरणा' यासारखे धोरणात्मक उपाय सुचविले आहेत. सध्याचा काळ हा चलनवाढकारी स्थितीचा असून याबाबतीत हा सिद्धांत फारसा उपयोगी नाही.

3) **अल्पकाळाशी संबंधित:** केन्सचा सिद्धांत अल्पकाळाशी संबंधित आहे. गतिमान अर्थव्यवस्थेच्या दीर्घकालीन समस्यांचा यात विचार करण्यात आलेला नाही.

4) **बंदिस्त अर्थव्यवस्था:** केन्स यांनी सोपेपणासाठी बंदिस्त अर्थव्यवस्थेचे प्रतिमान गृहीत धरले आहे. मात्र, असे केल्याने देशाच्या रोजगार आणि उत्पन्न वाढीच्या बाबतीतील आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या भूमिकेकडे दुर्लक्ष झाले आहे.

5) **पूर्ण स्पर्धेचे गृहीत:** केन्स यांनी पूर्ण स्पर्धा गृहीत धरलेली आहे. मात्र, वास्तवात पूर्ण स्पर्धा आढळून येत नाही. त्यामुळे या सिद्धांताचे महत्त्व कमी होते.

6) **सूक्ष्म बाबींकडे दुर्लक्ष:** केन्सचा सिद्धांत हा पूर्णपणे समग्रलक्षी आर्थिक विश्लेषण या स्वरुपाचा असून, सूक्ष्म आर्थिक बाबींकडे यात दुर्लक्ष केले आहे.

7) **अल्पविकसित देशांना लागू नाही:** केन्सचा सिद्धांत अल्पविकसित देशांना लागू पडत नाही. केन्सने चक्रीय बेकारीचा विचार केला आहे. मात्र, अल्पविकसित देशांना छुप्या किंवा प्रच्छन्न बेकारीच्या समस्येला तोंड द्यावे लागते. केन्स यांनी खर्चाला प्रोत्साहन दिले व बचतीस नापसंती दर्शविली. गरीब देशांना भांडवल निर्मितीसाठी खर्चाला आळा घालणे व बचतीत वाढ करणे आवश्यक आहे. थोडक्यात, केन्स यांनी दावा केल्याप्रमाणे त्यांचा सिद्धांत हा खऱ्या अर्थाने सर्वसाधारण नाही. अशा प्रकारे केन्स यांच्या सिद्धांतातील उणीवा दाखवून देण्यात आल्या आहेत.

*******************************************************************

# प्रकरण 4 - उपभोग, बचत आणि गुंतवणूक

## प्रस्तावना:

केन्स यांनी उपभोग फलनासंबंधी विवेचन करताना उपभोगासंबंधीचा मानसशास्त्रीय नियम स्पष्ट केला आहे. उपभोग फलन हे उत्पन्न व उपभोग यातील संबंध स्पष्ट करते. उपभोग फलन किंवा उपभोग प्रवृत्तीवर व्यक्तिनिष्ठ व वस्तुनिष्ठ घटकांचा प्रभाव पडतो. बचत म्हणजे उत्पन्नातील उपभोगावर खर्च न झालेला भाग होय. बचत ही उत्पन्न प्रवाहातील गळती असते. मात्र बचतीच्या रुपाने गुंतवणुकीसाठी निधी उपलब्ध होतो. बचत फलन उत्पन्न व बचतीतील कार्यात्मक संबंध स्पष्ट करते. वास्तव भांडवलाच्या साठ्यातील वाढ म्हणजे निव्वळ गुंतवणूक होय. गुंतवणूक ही व्याज दर आणि भांडवलाची सीमांत कार्यक्षमता या दोन घटकांवर अवलंबून असते. केन्स यांनी उपभोग फलन स्पष्ट करताना गुंतवणूक गुणकाची संकल्पनाही स्पष्ट केलेली आहे. गुंतवणूक गुणकास समांतर अशी प्रवेग ही संकल्पनाही मांडण्यात आली आहे. प्रस्तुत प्रकरणात उपभोग फलनाचा अर्थ, सरासरी व सीमांत उपभोग प्रवृत्ती, केन्सचा उपभोगासंबंधीचा मानसशास्त्रीय नियम व उपभोग फलनावर परिणाम करणारे घटक बचत, गुंतवणूक प्रकार, गुंतवणूक गुणक, प्रवेग तत्त्व याविषयी माहिती दिली आहे.

## 4.1. उपभोग फलन:

### 4.1.1 उपभोग फलनाचा अर्थ:

"उपभोग फलन किंवा उपभोग प्रवृत्ती ही संज्ञा उत्पन्न व उपभोग यामधील संबंध एकूण उपभोग आणि एकूण व्यक्तिगत खर्चयोग्य उत्पन्न या दोन चलांमधील फलनात्मक संबंध म्हणजे 'उपभोग फलन' होय."या दोन चलांपैकी उपभोग हा परतंत्र चल आहे, तर उत्पन्न हा स्वतंत्र चल आहे. चिन्हांच्या साहाय्याने हे पुढीलप्रमाणे मांडता येईल.

$$C = f(Y)$$

यात, $C$ = उपभोग, $Y$ = उत्पन्न, $f$ = फलनात्मक संबंध आहे.

उत्पन्न व उपभोग यामधील फलनात्मक संबंध हा इतर परिस्थिती कायम असल्याच्या गृहीतावर अवलंबून आहे. उपभोग फलन किंवा उपभोग प्रवृत्ती म्हणजे वेगवेगळ्या उत्पन्न पातळ्यांना अनुसरून केल्या जाणाऱ्या खर्चाचे पत्रक किंवा कोष्टक होय. याचाच अर्थ उपभोग फलन वेगवेगळ्या उत्पन्न पातळ्यांना उपभोगावर प्रत्यक्षपणे करण्यात आलेला खर्च दर्शविते.

**उपभोग प्रवृत्ती पत्रक:**

"उपभोग प्रवृत्ती पत्रक म्हणजे वेगवेगळ्या उत्पन्न पातळ्यांना करण्यात आलेला उपभोगावरील खर्च दर्शविणारे पत्रक होय."हे पत्रक उत्पन्न व उपभोग यामधील फलनात्मक संबंध दर्शविते. खालील तक्त्यात काल्पनिक उपभोग फलन पत्रक दिले आहे.

*तक्ता: उपभोग प्रवृत्ती पत्रक*

| उत्पन्न (Y) (कोटी रुपये) | उपभोग (C) (कोटी रुपये) |
|---|---|
| 100 | 110 |
| 150 | 150 |
| 200 | 190 |
| 250 | 230 |
| 300 | 270 |
| 350 | 310 |

वरील तक्त्यातील पहिल्या कॉलममध्ये उत्पन्नाच्या वेगवेगळ्या पातळ्या दर्शविल्या आहेत, तर दुसऱ्या कॉलममध्ये वेगवेगळ्या उत्पन्न पातळ्यांना असलेली वास्तव उपभोग खर्चाची रक्कम दर्शविली आहे. वेगवेगळ्या उत्पन्न पातळ्यांना असलेल्या उपभोग खर्चाच्या रकमांशी संबंधित असलेल्या या पत्रकास उपभोग प्रवृत्ती पत्रक किंवा उपभोग फलन म्हटले जाते. उपभोग हे उत्पन्नाचे वाढते फलन असल्याचे वरील तक्त्यात दिसते. उत्पन्न व उपभोग यात एकाच दिशेने बदल झालेला आहे. म्हणजेच उत्पन्नातील वाढीबरोबर उपभोगात वाढ झालेली आहे. उत्पन्न 100 कोटी रुपये असताना उपभोग खर्च 110 कोटी रुपये

SYBCom-BECO-DBC

आहे. याचाच अर्थ अर्थव्यवस्थेत निर्माण झालेले उत्पन्न उपभोग खर्च भागविण्याच्या दृष्टीने पुरेसे नाही. त्यामुळे उत्पन्नापेक्षा उपभोग खर्च जास्त आहे. उत्पन्न 150 कोटी रुपये असताना उपभोग खर्च 150 कोटी रुपयेच आहे. त्यापुढे उत्पन्नात वाढ झाली असता उपभोग खर्चातही वाढ झालेली दिसते. प्रत्येक वेळी उत्पन्नात 50 कोटी रुपयांनी बदल झाला असता उपभोगात 40 कोटी रुपयांनी बदल झालेला आहे. 'अल्पकाळात उपभोग प्रवृत्ती स्थिर राहते' या गृहीतावर हे आधारित आहे. उपभोग फलन किंवा उपभोग प्रवृत्ती आकृतीच्या आधारे पुढील प्रमाणे स्पष्ट करता येते.




*आकृती: उपभोग फलन*

वरील आकृती मध्ये 'अक्ष' अक्षावर उत्पन्न आणि 'अय' अक्षावर उपभोग दर्शविला आहे. 'अन' ही रेषा उत्पन्न व उपभोग यांची समानता दर्शविते. 'उफ' हा उपभोग फलन किंवा उपभोग प्रवृत्ती वक्र आहे. हा वक्र वर चढत जाणारा असून, तो उपभोग हे उत्पन्नाचे वाढते फलन असल्याचे स्पष्ट करतो. आकृतीतील 'स' बिंदूत उत्पन्न व उपभोग समान आहे. त्यापुढे उत्पन्नात वाढ झाली असता उपभोगात वाढ झालेली आहे. मात्र, उत्पन्नात झालेल्या वाढीच्या प्रमाणात उपभोगात वाढ झालेली नाही. त्यामुळे उत्पन्न व उपभोग यात अंतर पडलेले दिसते. उत्पन्न 'अप$_२$' असताना उपभोग 'बप$_२$', एवढा आहे. 'अन' ही रेषा व 'उफ' वक्र यातील उभे अंतर म्हणजेच 'बब$_1$' हे उत्पन्नाचा उपभोगासाठी न वापरलेला म्हणजेच बचत केलेला भाग दर्शविते. उत्पन्नात झालेल्या वाढीबरोबर उत्पन्न व उपभोग यात अंतर पडून बचत वाढत गेलेली दिसते.

### 4.1.2 सरासरी उपभोग प्रवृत्ती (APC):

'दिलेल्या कालखंडातील एकूण उपभोगाचे एकूण व्यक्तिगत खर्चयोग्य उत्पन्नाशी असलेले प्रमाण म्हणजे सरासरी उपभोग प्रवृत्ती' होय. एकूण उपभोगास एकूण उत्पन्नाने भागले असता सरासरी उपभोग प्रवृत्ती समजते. चिन्हाच्या साहाय्याने हे पुढीलप्रमाणे मांडता येईल.

सरासरी उपभोग प्रवृत्ती = $\frac{C}{Y}$ येथे, C = उपभोग आणि Y = खर्चयोग्य उत्पन्न.

सरासरी उपभोग प्रवृत्तीचे आर्थिक महत्त्व असे की, याद्वारे नियोजित रोजगारा पासूनच्या उत्पादनाच्या एकूण खर्चापैकी किती भाग केवळ उपभोग्य वस्तू विकून भरून निघणे अपेक्षित आहे हे समजते, तसेच समाजाकडून वस्तू व सेवांच्या किती नगसंख्येची मागणी केली जाईल हेही समजते. थोडक्यात, एकूण उत्पन्नाचा किती भाग उपभोगावर खर्च केला जातो हे सरासरी उपभोग प्रवृत्तीवरून समजते.

*तक्ता: सरासरी उपभोग प्रवृत्ती*

| खर्चयोग्य उत्पन्न (Y) | उपभोग (C) | सरासरी उपभोग प्रवृत्ती $\frac{C}{Y}$ |
|---|---|---|
| 100 | 100 | $\frac{100}{100}$ = 1.00 किंवा 100 % |
| 200 | 180 | $\frac{180}{200}$ = 0.90 किंवा 90 % |
| 300 | 240 | $\frac{240}{300}$ = 0.80 किंवा 80 % |
| 400 | 300 | $\frac{300}{400}$ = 0.75 किंवा 75 % |
| 500 | 350 | $\frac{350}{500}$ = 0.70 किंवा 70 % |

SYBCom-BEco-DBC

वरील तक्त्यात वेगवेगळ्या उत्पन्न पातळीला असलेली सरासरी उपभोग प्रवृत्ती मोजली आहे. यात दिलेल्या माहितीवरून असे दिसते की, उत्पन्नात वाढ झाली असता सरासरी उपभोग प्रवृत्ती घटत गेलेली आहे. याचे कारण वाढत्या उत्पन्नाबरोबर बचत वाढत जाते. द

### 4.2.3 सीमांत उपभोग प्रवृत्ती (MPC):

"सीमांत उपभोग प्रवृत्ती म्हणजे एकूण उपभोगाच्या पातळीतील बदलाचे एकूण उत्पन्नाच्या पातळीतील बदलाशी असलेले प्रमाण होय."सीमांत उपभोग प्रवृत्तीने उत्पन्नातील वाढीचा उपभोगावर होणारा परिणाम समजतो याचाच अर्थ, समाजाच्या उत्पन्नात वाढ झाली असता त्यामुळे उपभोगात किती वाढ होईल हे सीमांत उपभोग प्रवृत्तीमुळे समजते. उपभोगातील बदलाला उत्पन्नातील बदलाने भागले असता सीमांत उपभोग प्रवृत्ती समजते. चिन्हांच्या साहाय्याने हे पुढीलप्रमाणे मांडता येईल.

सीमांत उपभोग प्रवृत्ती = $\frac{\Delta C}{\Delta Y}$

येथे, $\Delta$ = बदल (वाढ किंवा घट), C = उपभोग, Y = उत्पन्न

सीमांत उपभोग प्रवृत्ती नेहमी घन व एकापेक्षा कमी असते. लोक आपले सर्व उत्पन्न उपभोगावर खर्च करीत नाहीत. त्यामुळे वाढत्या उत्पन्नाबरोबर काही भाग बचत म्हणून बाजूला काढून ठेवला जातो. त्यामुळे सीमांत उपभोग प्रवृत्ती एक नसते, तर ती एक पेक्षा कमी असते. पुढील तक्त्यात वेगवेगळ्या उत्पन्न पातळीस असलेली सीमांत उपभोग प्रवृत्ती मोजली आहे. स्स्दवच्झ

*तक्ता: सीमांत उपभोग प्रवृत्ती*

| उत्पन्न (Y) | उपभोग (C) | सीमांत उपभोग प्रवृत्ती = $\frac{\Delta C}{\Delta Y}$ |
|---|---|---|
| 100 | 100 | $\frac{100}{100}$ = 1.0 किंवा 100 % |
| 200 | 180 | $\frac{80}{100}$ = 0.8 किंवा 80 % |
| 300 | 240 | $\frac{60}{100}$ = 0.6 किंवा 60 % |
| 400 | 280 | $\frac{40}{100}$ = 0.4 किंवा 40 % |
| 500 | 300 | $\frac{20}{100}$ = 0.2 किंवा 20 % |

वरील तक्त्यात वेगवेगळ्या उत्पन्न पातळीला दिलेल्या सीमांत उपभोग प्रवृत्तीवरून असे दिसते की, उत्पन्नात वाढ झाली असता उपभोगात कमी प्रमाणात वाढ होत गेली आहे.

### 4.1.4 केन्सचा उपभोगासंबंधीचा मानसशास्त्रीय नियम:

उपभोगाचा मूलभूत मानसशास्त्रीय नियम केन्सने मांडला असून, तो उपभोग फलनाचा मूलभूत आधार आहे. उपभोगासंबंधीचा हा मानसशास्त्रीय नियम असे स्पष्ट करतो की, उत्पन्नात वाढ झाली असता व्यक्तीच्या उपभोगात वाढ होते. मात्र, उत्पन्नात जेवढ्या प्रमाणात वाढ होते तेवढ्या प्रमाणात उपभोगात वाढ होत नाही. केन्स यांनी हा नियम परस्परांशी संबंधित अशा तीन विधानांच्या रूपात मांडला आहे.

1) जेव्हा उत्पन्न वाढते तेव्हा उपभोग खर्चातसुद्धा वाढ होते; परंतु उपभोगखर्चात झालेली वाढ उत्पन्नात झालेल्या वाढीच्या मानाने कमी असते. याचे कारण असे की, जेव्हा उत्पन्नात वाढ होते, तेव्हा आपल्या गरजा एका पाठोपाठ एक पूर्ण होत जातात. त्यामुळे उपभोग्य वस्तूंवर खर्च करण्याची गरज कमी होते. उत्पन्नात झालेल्या वाढीबरोबर उपभोगात घट होत नाही, तर उपभोगात वाढच होते. मात्र, ही वाढ उत्पन्नात झालेल्या वाढीच्या प्रमाणात होत नाही.

2) वाढलेले उत्पन्न उपभोग खर्च व बचत यात काही विशिष्ट प्रमाणात विभागले जाते. जेव्हा वाढलेले सर्व उत्पन्न उपभोगावर खर्च केले जात नाही, तेव्हा उर्वरित उत्पन्नाची बचत केली जाते. अशा प्रकारे उपभोग व बचत यात एकत्रितपणे बदल होतो.

3) उत्पन्नात वाढ होते तेव्हा नेहमीच उपभोग व बचत या दोन्हीतही वाढ होते. याचाच अर्थ उत्पन्नातील वाढीमुळे उपभोग किंवा बचत यात घट होत नाही. उत्पन्नात वाढ झाली असता त्यापेक्षा कमी प्रमाणात

SYBCom-B.Eco-DBC

उपभोगात वाढ होते, या विधानावर हे अवलंबून आहे. अशा प्रकारे उत्पन्नात झालेल्या वाढीबरोबर उपभोग व बचत या दोन्हीतही वाढ होते. उपभोगासंबंधीच्या या मानसशास्त्रीय नियमाची तीन विधाने पुढील तक्त्याच्या आधारे स्पष्ट करता येतील.

*तक्ता: उत्पन्नातील वाढीचा उपभोग व बचतीवरील परिणाम*

| उत्पन्न | उपभोग | बचत |
|---|---|---|
| 00 | 10 | -10 |
| 50 | 55 | -05 |
| 100 | 100 | 00 |
| 150 | 145 | 05 |
| 200 | 190 | 10 |
| 250 | 235 | 15 |
| 300 | 280 | 20 |

वरील तक्त्यात उत्पन्नात वाढ झाली असता उपभोग व बचत यात कशा प्रकारे बदल होतो यासंबंधी दिलेल्या माहितीच्या आधारे उपभोगासंबंधीच्या मानसशास्त्रीय नियमांची विधाने पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतात.

**अ) विधान-1:** उत्पन्नात 50 कोटी रुपयांनी वाढ झाली असता उपभोगात 45 कोटी रुपयांनी वाढ झाली आहे. उत्पत्रात झालेल्या वाढीबरोबर उपभोगखर्चात वाढ झालेली दिसते. उत्पन्नात वाढ होऊन ते 150, 200, 250 आणि 300 कोटी रुपये झाले असता उपभोग खर्चात वाढ होऊन तो अनुक्रमे 145, 190, 235 आणि 280 कोटी रुपये झालेला दिसतो.

**ब) विधान-2:** उत्पन्नात प्रत्येक वेळी 50 कोटी रुपयांनी वाढ झाली असता हे वाढलेले उत्पन्न काही विशिष्ट प्रमाणात उपभोग व बचत यात विभागले गेले आहे. वाढलेल्या प्रत्येक 50 कोटी रुपयांपैकी 45 कोटी रुपये उपभोगावर खर्च करण्यात आले आहेत व 5 कोटी रुपयांची बचत करण्यात आली आहे.

**क) विधान-3:** उत्पन्न 100 कोटी रुपयांवरून 150, 200, 250 आणि 300 कोटी रुपयांपर्यंत वाढत गेले असता उपभोगातसुद्धा 100 कोटी रुपयांवरून 145, 190, 235 आणि 280 कोटी रुपये झालेले आहे. त्याबरोबरीनेच बचतीतही 0 रुपयांपासून 5, 10, 15 आणि 20 कोटी रुपये अशी वाढ झालेली आहे. उत्पन्नात वाढ झाली असता उपभोगात घट होत नाही की बचतीतही घट होत नाही. आकृतीच्या आधारे या नियमाची तीन विधाने स्पष्ट करता येतील.




*आकृती: उपभोगासंबंधीचा केन्सचा मानसशास्त्रीय नियम*

वरील आकृतीत आडव्या 'क्ष' अक्षावर उत्पन्न मोजलेले आहे तर उभ्या 'य' अक्षावर उपभोग व बचत मोजलेली आहे. 'अ' बिंदूपासून 45 अंशाचा कोन करून काढलेली 'अप' ही रेषा उत्पन्न = उपभोग दर्शविते. या रेषेवरील प्रत्येक बिंदूत उत्पन्न व उपभोग समान आहे. या आकृतीच्या आधारे नियमाची विधाने पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतात.

**अ) विधान-1:** जेव्हा उत्पन्न 'अख' वरून 'अख$_1$' पर्यंत वाढते तेव्हा उपभोगातही 'सख' वरून 'नख$_1$' पर्यंत वाढ झालेली आहे; परंतु उपभोगात झालेली वाढ उत्पन्नात झालेल्या वाढीपेक्षा कमी आहे म्हणजेच 'नख$_1$' $<$ 'तख$_1$' आहे. येथे उत्पन्न उपभोगापेक्षा 'तन' एवढे जास्त आहे.

SYBCom-BEco-DBC

**ब) विधान-2:** जेव्हा उत्पन्न 'अख' वरून 'अख$_1$' आणि 'अख$_2$' एवढे वाढते तेव्हा हे वाढलेले उत्पन्न काही विशिष्ट प्रमाणात उपभोग व बचत यात विभागले जाते. या वाढलेल्या उत्पन्नापैकी 'नख$_1$' आणि 'न$_1$ख$_2$' उत्पन्न उपभोगासाठी खर्च झाले आहे, तर 'तन' आणि 'बन$_1$' ही अनुक्रमे बचत आहे.

**क) विधान-3:** वाढलेले उत्पन्न उपभोग व बचतीत वाढ घडवून आणते.

येथे 'न$_1$ख$_2$' > 'नख$_1$' आणि बन$_1$ > तन आहे. उत्पन्नातील वाढीबरोबर उपभोग व बचत या दोन्हीतही वाढ झालेली दिसते.

**केन्सच्या उपभोगासंबंधीच्या मानसशास्त्रीय नियमाची गृहीते:**

1) **मानसशास्त्रीय व संस्थात्मक घटक स्थिर:** उपभोग खर्चावर प्रभाव पाडणारे मानसशास्त्रीय व संस्थात्मक घटक स्थिर असतात या गृहीतावर हा नियम आधारित आहे. यात उत्पन्नाची वाटणी, अभिरुची, सवयी, सामाजिक चालिरीती, लोकसंख्यावाढ वगैरे घटकांचा समावेश होतो. अल्प काळात या घटकात बदल होत नसल्याने उपभोग केवळ उत्पन्नावरच अवलंबून असतो.

2) **सामान्य स्थिती:** हा नियम सामान्य स्थिती अस्तित्वात असते या गृहीतावर आधारित आहे. सामान्य स्थितीत हा नियम अनुभवास येतो. युद्ध, क्रांती, चलनवाढातिरेक अशा असामान्य स्थितीत हा नियम अनुभवास येत नाही किंवा बरोबर असल्याचे आढळत नाही.

3) **खुली भांडवलशाही अर्थव्यवस्था:** जेथे सरकारी हस्तक्षेप होत नाही अशा भांडवलशाही अर्थव्यवस्थेत या नियमाचा प्रत्यय येतो. अशा अर्थव्यवस्थेत लोकांना आपले उत्पन्न मनाप्रमाणे खर्च करण्याचे स्वातंत्र्य असते. समाजवादी किंवा सरकारचे नियंत्रण असलेल्या अर्थव्यवस्थेत हा नियम प्रत्ययास येत नाही.

**केन्सच्या नियमाचे सूचितार्थ:**

केन्सच्या नियमाचे ध्वन्यर्थ म्हणजेच या नियमातून ध्वनित होणारे अर्थ हे उपभोग फलनाचे महत्त्व स्पष्ट करतात. केन्सच्या नियमाचे ध्वन्यर्थ किंवा उपभोग फलनाचे महत्त्व पुढीलप्रमाणे:

1) **'से' चा नियम:** 'प्रत्येक पुरवठा स्वत: ची मागणी निर्माण करतो' असे 'से' च्या नियमात सांगितले आहे. याचाच अर्थ अर्थव्यवस्थेत अतिरिक्त उत्पादनाची किंवा बेकारीची शक्यता नसते; परंतु 'से' चा नियम बरोबर नसल्याचे केन्सच्या नियमातून स्पष्ट होते. जेव्हा उत्पन्न वाढते तेव्हा ते सर्वच्या सर्व उपभोगावर खर्च केले जात नाही. त्यामुळे पुरवठ्यापेक्षा मागणी कमी राहून त्यातून उत्पादन अतिरिक्त होऊन बेकारी वाढते.

2) **सरकारी हस्तक्षेप:** 'से' च्या नियमात खुली अर्थव्यवस्था आवश्यक असल्याचे मानले आहे; परंतु केन्सच्या नियमातून सरकारच्या हस्तक्षेपाची आवश्यकता स्पष्ट होते. जेव्हा उत्पन्नात झालेल्या वाढीबरोबर त्या प्रमाणात उपभोग वाढत नाही, तेव्हा अतिरिक्त उत्पादनाची व बेकारीची समस्या निर्माण होते. यातून मार्ग काढण्यासाठी अर्थव्यवस्थेत सरकारच्या हस्तक्षेपाची गरज असते.

3) **गुंतवणुकीस महत्त्व:** लोक आपले सर्वच्या सर्व उत्पन्न उपभोगावर खर्च करू शकत नाहीत यावर केन्सच्या नियमाने भर दिला आहे. लोकांच्या या प्रवृत्तीमुळे उत्पन्न व उपभोग यात अंतर पडते. हे अंतर उपभोग किंवा गुंतवणूक यात वाढ करून भरून काढता येते. अल्पकाळात उपभोग फलन स्थिर असल्याने उत्पन्न व उपभोग यातील अंतर केवळ गुंतवणुकीत वाढ करून भरून काढता येते. अशा प्रकारे केन्सच्या मानसशास्त्रीय नियमाने गुंतवणुकीच्या महत्त्वपूर्ण भूमिकेवर भर दिला आहे.

4) **अपूर्ण रोजगार समतोल:** केन्स यांनी मांडलेली अपूर्ण रोजगार समतोलाची कल्पना ही उपभोगाच्या मानसशास्त्रीय नियमावर आधारलेली आहे. प्रभावी मागणीचा रोजगाराची समतोल पातळी दर्शविणारा बिंदू हा पूर्ण रोजगाराचा नसतो, तर अपूर्ण रोजगार पातळीचा असतो. याचे कारण उपभोक्ते वाढलेले सर्व उत्पन्न उपभोगावर खर्च करीत नसल्याने एकूण मागणी एकूण पुरवठ्याच्या तुलनेत कमी राहते. सरकारने जर उत्पन्न व उपभोग यातील अंतर भरून निघेल एवढी गुंतवणूक केली, तर पूर्ण रोजगार समतोल शक्य आहे.

5) **भांडलाची सीमांत कार्यक्षमता:** खुल्या अर्थव्यवस्थेत भांडवलाच्या सीमांत कार्यक्षमतेच्या बाबतीत घटती प्रवृत्ती असल्याचे मानसशास्त्रीय नियम स्पष्ट करतो. उत्पन्नात वाढ होते तेव्हा त्या प्रमाणात उपभोगात वाढ होत नाही. त्यामुळे उपभोग्य वस्तूंची मागणी घटून बाजारात वस्तू पडून राहतात. त्यामुळे उत्पादक उत्पादन कमी करतात. त्यातून भांडवली वस्तूंची मागणी कमी होते. त्यामुळे अपेक्षित नफ्याच्या दरात घट होते. भांडवलाची सीमांत कार्यक्षमता घटल्याचे यातून सूचित होते. उपभोग प्रवृत्तीत वाढ झाल्याशिवाय भांडवलाच्या सीमांत कार्यक्षमतेतील घट कमी करता येत नाही.

**6) बचत व गुंतवणूक:** भांडवलशाही अर्थव्यवस्थेत नेहमीच अतिरिक्त बचतीचा धोका असतो. याचे कारण लोकांच्या उत्पन्नात मोठ्या प्रमाणात वाढ होते, तेव्हा उत्पन्न व उपभोग यातील अंतर अधिक प्रमाणात वाढते. जेव्हा अर्थव्यवस्थेतील लोक श्रीमंत असतात, तेव्हा त्यांची सीमांत उपभोग प्रवृत्ती कमी असते. ते अधिक बचत करतात. म्हणजेच वस्तूंची मागणी कमी राहते. त्यामुळे गुंतवणूकही कमी केली जाते.

**7) उत्पन्नवाढीचे स्वरूप:** वाढलेले सर्व उत्पन्न उपभोगावर खर्च केले जात नाही ही बाब गुणक सिद्धांत स्पष्ट करतो. गुणक सिद्धांत किंवा उत्पन्नवाढीची प्रक्रिया ही जेव्हा अर्थव्यवस्थेत सुरुवातीस गुंतवणुकीत जी भर पडते तिच्यामुळे उत्पन्नात कमी प्रमाणात भर पडते हे स्पष्ट करते. लोक आपल्या वाढलेल्या उत्पन्नाचा सर्व भाग उपभोगावर खर्च करीत नसल्याने हे घडते. गुणकाचे मूल्य सीमांत उपभोग प्रवृत्तीच्या आधारे शोधले जाते.

$$\text{गुणक} = \frac{1}{1 - \text{सीमांत उपभोग प्रवृत्ती}} \text{ होय}$$

सीमांत उपभोग प्रवृत्ती जास्त असेल, तर गुणकाचे मूल्य जास्त येते. याउलट सीमांत उपभोग प्रवृत्ती कमी असेल तर गुणकाचे मूल्य कमी येते.

**8) व्यापारचक्राचा वळणबिंदू:** केन्सचा मानसशास्त्रीय नियम व्यापारचक्राच्या वळणबिंदूचे स्पष्टीकरण देतो. म्हणजेच अर्थव्यवस्थेला तेजीकडून मंदीकडे किंवा मंदीकडून तेजीकडे कलाटणी कशामुळे मिळते याचे स्पष्टीकरण या नियमातून मिळते. अर्थव्यवस्था पूर्ण रोजगार पातळीला पोहोचण्यापूर्वीच घसरण सुरू होते कारण लोक त्यांचे वाढलेले सर्व उत्पन्न उपभोगावर खर्च करू शकत नाहीत. त्यामुळे मागणी घटते. त्यातून अतिरिक्त उत्पादन व बेकारीची स्थिती निर्माण होते, तसेच भांडवलाच्या सीमांत कार्यक्षमतेत घट होते. त्यामुळे घसरण घडून येते.

### 4.1.5 उपभोग प्रवृत्तीचे निर्धारक घटक:

उपभोग फलनावर / उपभोग प्रवृत्तीवर परिणाम करणारे व्यक्तिनिष्ठ व वस्तुनिष्ठ घटक पुढील प्रमाणे.

**अ) व्यक्तिनिष्ठ घटक:**

उपभोगात बदल घडवून आणण्यास अनेक व्यक्तिनिष्ठ घटक कारणीभूत ठरतात. व्यक्तिनिष्ठ घटकांचा संबंध मानवी स्वभावाची मानसशास्त्रीय लक्षणे, सामाजिक रचना, सामाजिक संस्था व सामाजिक व्यवहार यांच्याशी असतो. उत्पन्नात वाढ झाली असता त्यामुळे घडून येणारे उपभोगासंबंधीचे मानवी वर्तन हे मानसशास्त्रीय हेतूंवर अवलंबून असते. काही हेतू असे असतात की, जे व्यक्तींना त्यांच्या उत्पन्नातून खर्च कमी करण्यास भाग पाडतात. केन्स यांनी अशा प्रकारचे आठ हेतू दिले आहेत, ते पुढीलप्रमाणे आहेत.

**1) सावधगिरीचा हेतू:** भविष्यकाळातील संकटासंबंधी आगाऊ अंदाज करता येत नाही. अशा संकटांना तोंड देण्यासाठी रोख रक्कम राखून ठेवण्याच्या लोकांच्या इच्छेचा उपभोगावर परिणाम होतो. या हेतूने लोक अधिक पैसा जवळ ठेवीत असतील, तर उपभोग प्रवृत्ती कमी होते.

**2) दूरदृष्टीचा हेतू:** भविष्यकाळातील अपेक्षित गरजा भागविण्यासाठी तरतूद करण्याच्या इच्छेचा उपभोग फलनावर परिणाम होतो. उदा. वृद्धापकाळासाठीची तरतूद, मुलांचे शिक्षण यासाठी अधिक पैसा राखून ठेवला, तर उपभोगात घट होते.

**3) हिशेबाचा हेतू:** आज कमी उपभोग घेण्यापेक्षा पैसा कर्जाऊ देऊन अधिक व्याज मिळवून पुढील काळात मोठ्या प्रमाणात उपभोग घेण्याची इच्छा असेल, तर उपभोगात घट होते.

**4) सुधारणेचा हेतू:** लोकांना आपल्या खर्चात हळूहळू वाढ करून आपल्या राहणीमानात हळूह सुधारणा करण्याची इच्छा असेल, तर वाढत्या उत्पन्नाबरोबर खर्चात म्हणजेच उपभोगात कमी प्रमाणात वाढ होते .

**5) स्वातंत्र्याचा हेतू:** लोकांकडे अधिक पैसा असेल, तर त्यांना आर्थिक स्वातंत्र्य मिळते, त्यांची खरेदीशक्ती वाढते. असे स्वातंत्र्य मिळविण्याचा हेतू असेल, तर लोक अधिकाधिक रोख पैसा जवळ बाळगतात.

**6) उद्योजनाचा हेतू:** व्यावसायिक प्रकल्प सुरू करण्याची इच्छा असेल, तर लोक त्यासाठी अधिकाधिक पैसा उभा करण्याचा प्रयत्न करतात. त्यातून उपभोगात घट होते.

SYBCom-B-Eco-DBC

**7) अभिमानाचा हेतू:** लोकांना आपली भरभराट व्हावी, आपल्याजवळ संपत्तीचा साठा वाढावा असे वाटत असेल, तर ते उपभोगात कपात करतात. त्यामुळे उपभोगात घट होते.

**8) द्रव्यलोभाचा हेतू:** द्रव्यलोभ किंवा धन लालसा याचाही उपभोग फलनावर परिणाम होतो. अधिकाधिक द्रव्यलोभामुळे उपभोगात घट होते. अशा विविध व्यक्तिनिष्ठ घटकांचा उपभोग फलनावर प्रभाव पडून उपभोगात घट होते. व्यक्तिनिष्ठ घटक उपभोगात वाढ घडवून आणण्यासही कारणीभूत ठरतात. चैनीची किंवा विलासी वृत्ती असणारे किंवा भविष्याची चिंता न करणारे उपभोगावर अधिक प्रमाणात खर्च करतात.

**ब) वस्तुनिष्ठ घटक:**

उपभोगावर उत्पन्नातील बदलाचा परिणाम होतो. उत्पन्न व उपभोग यामधील संबंध उपभोग फलनाने दाखविला जातो. स्थूलमानाने उत्पन्नात वाढ झाली असता उपभोगात वाढ होते व उत्पन्नात घट झाली असता उपभोगात घट होते. उपभोग प्रवृत्तीवर किंवा उपभोग फलनावर उत्पन्नाबरोबरच इतर अनेक वस्तुनिष्ठ घटकांचा प्रभाव पडतो. हे वस्तुनिष्ठ घटक पुढीलप्रमाणे.

**1) सर्वसाधारण किंमत पातळी:** सर्वसाधारण किंमत पातळी हा समाजाच्या उपभोगावर प्रभाव पाडणारा महत्त्वाचा घटक आहे जेव्हा सर्वसाधारण किंमत पातळीत वाढ होते किंवा चलनवाढ घडून येते, तेव्हा उपभोग फलन खालच्या बाजूला स्थानांतरित होते. याचे कारण सर्वसाधारण किंमत पातळीतील वाढीमुळे लोकांकडील पैशाच्या खरेदीशक्तीत घट होते. त्यामुळे उपभोग फलन खालच्या बाजूला स्थलांतरित होते. अशाच प्रकारे जेव्हा सर्वसाधारण किंमत पातळीत घट होते, तेव्हा लोकांकडील पैसा व वित्तीय मालमत्तेच्या वास्तव मूल्यात वाढ होते. आपल्या चालू उत्पन्नातून अधिक उपभोग घेण्याची प्रेरणा लोकांना मिळते. त्यामुळे उपभोग फलन वरच्या बाजूस स्थानांतरित होते.

**2) राजकोषीय धोरण:** सरकारच्या राजकोषीय धोरणाचा देशातील लोकांच्या उपभोग प्रवृत्तीवर परिणाम होतो. समजा, सरकारने मोठ्या प्रमाणात कर आकारणी केली, तर त्यामुळे समाजातील लोकांच्या खर्चयोग्य उत्पन्नात घट होते व त्याचा उपभोगावर प्रतिकूल परिणाम होतो. याउलट सरकारने करात मोठ्या प्रमाणात कपात केली, तर त्यामुळे उपभोग फलन वरच्या बाजूला स्थानांतरित होते.

**3) व्याज दर:** व्याज दराचा सुद्धा उपभोग प्रवृत्तीवर परिणाम होतो. व्याज दर जर अधिक असेल, तर लोकांना अधिक बचत करण्याची प्रेरणा मिळते. त्यामुळे त्यांची उपभोग प्रवृत्ती कमी होते. याउलट बाजारातील व्याज दर कमी असेल, तर लोक कमी बचत करतात व त्यामुळे उपभोग प्रवृत्तीत वाढ होते. मात्र, व्याजाचा दर अधिक असेल, तर सर्वच लोक आपल्या बचतीत वाढ करतीलच असे नाही.

**4) उत्पन्नाचे विभाजन:** उत्पन्नाची समाजात झालेली विभागणी उपभोग फलनाची पातळी निश्चित करते. राष्ट्रीय उत्पन्नाची वाटणी जर अधिक समान प्रमाणात झालेली असेल, तर उपभोग प्रवृत्ती अधिक असते. याउलट जर राष्ट्रीय उत्पन्नाचे विषम प्रमाणात विभाजन झालेले असेल म्हणजेच गरीब व श्रीमंत यांच्या उत्पन्नात मोठ्या प्रमाणात तफावत असेल, तर उपभोग प्रवृत्ती कमी असते. याचे कारण श्रीमंतांची उपभोग प्रवृत्ती ही गरिबांच्या तुलनेने कमी असते हे आहे.

**5) अपेक्षांतील बदल:** लोकांच्या अपेक्षांतील बदलांचा उपभोग प्रवृत्तीवर प्रभाव पडतो. जेव्हा लोकांची नजीकच्या भविष्यकाळात युद्ध थांबण्याची व किमतीत वाढ होण्याची अपेक्षा असते, तेव्हा ते नजीकच्या भविष्यकाळातील गरजा भागविता याव्यात यासाठी वस्तूंवर अधिक खर्च करतात. याउलट जेव्हा लोकांना भविष्यात किमतीत घट होईल असे वाटते, तेव्हा ते आपला चालू उपभोग कमी करतात. जेव्हा किमती प्रत्यक्षात कमी होतात तेव्हा ते अधिक खर्च करतात.

**6) अनपेक्षित लाभ / तोटे:** अनपेक्षितपणे होणारे लाभ आणि तोटे यांचाही उपभोग प्रवृत्तीवर परिणाम होतो. भागांच्या (शेअर्सच्या) किमतीत वाढ होते, तेव्हा भागधारक त्यांची स्थिती चांगली झाल्याचे समजून आपल्या उपभोगात वाढ करतात. याउलट जेव्हा भागांच्या (शेअर्स) किमतीत घट होते, तेव्हा भागधारकांना अचानक तोटा सहन करावा लागतो. त्यामुळे त्यांच्या उपभोगात घट होते.

**7) संपत्तीचा साठा:** अर्थव्यवस्थेतील कुटुंबाकडे असलेला संपत्तीचा साठा उपभोग प्रवृत्ती ठरविणारा महत्त्वाचा घटक आहे. जमीन, घरे अशा वास्तव मालमत्तेबरोबर, रोख शिल्लक, बचती, बँकांकडील मुदत ठेवी, रोखे व बाँड अशा वित्तीय मालमत्तेचा संपत्तीत समावेश होतो. अर्थव्यवस्थेतील कुटुंबांकडे अशी संपत्ती

SYBCom-BEco-DBC

मोठ्या प्रमाणात असेल, तर ते आपल्या चालू उत्पन्नातील अधिक भाग उपभोगावर खर्च करतील. याउलट कुटुंबांकडे कमी प्रमाणात संपत्ती असेल, तर चालू उत्पन्नाचा कमी भाग उपभोगावर खर्च केला जातो.

**8) कर्जाची उपलब्धता:** कर्जाच्या उपलब्धतेच्या स्थितीवरही उपभोग प्रवृत्ती अवलंबून असते. सहजपणे कर्ज उपलब्ध होत असेल, तर उपभोगात वाढ होऊन उपभोग फलन वरच्या बाजूला स्थानांतरित होते. भारतात बँकांनी कमी व्याज दराने घरे, वाहने, संगणक, इतर टिकाऊ उपभोग्य वस्तू वगैरेंसाठी कर्ज उपलब्ध केल्याने उपभोगात मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. सहजपणे कर्ज उपलब्ध होत नाही, तेव्हा उपभोग प्रवृत्ती कमी असते.

**9) वेतन पातळीतील बदल:** जर वेतन दरात वाढ झाली, तर उपभोग फलन वरच्या बाजूला स्थानांतरित होते. कामगारांची उपभोग प्रवृत्ती जास्त असल्याने ते आपल्या वाढलेल्या उत्पन्नापैकी अधिक भाग उपभोगावर खर्च करतात; परंतु वेतनात झालेल्या वाढीबरोबरच त्यापेक्षा जास्त प्रमाणात किंमत पातळीत वाढ झाली, तर वास्तव वेतनात घट होऊन उपभोग फलन खालच्या बाजूस स्थानांतरित होते. वेतन दरात कपात करण्यात आली, तर समाजाच्या उत्पन्नात घट होऊन उपभोग फलनात घट होते.

**10) बचतविषयक दृष्टिकोन:** लोकांच्या बचतविषयक दृष्टिकोनाचा प्रभाव उपभोग फलनावर पडतो. जर लोकांना भावी उपभोग हा चालू उपभोगापेक्षा महत्त्वाचा वाटत असेल, तर ते अधिक बचत करतील व उपभोग फलन खालच्या बाजूला स्थानांतरीत होईल. याउलट स्थितीत उपभोग प्रवृत्तीत वाढ होईल. उच्च बचत असतांना उपभोग प्रवृत्ती कमी असते.

**11) कंपन्यांची वित्तीय धोरणे:** उत्पन्न ठेवून घेणे, लाभांश देणे आणि पुनर्गुंतवणूक यासंबंधीच्या कंपन्यांच्या धोरणांचा प्रभाव उपभोग फलनावर पडतो. जर कंपन्यांनी अधिक पैसा राखीव निधी म्हणून ठेवला, तर भागधारकांना देण्यात येणारा लाभांश कमी प्रमाणात असेल. त्यामुळे भागधारकांचे उत्पन्न कमी होऊन उपभोग फलन खालच्या बाजूस स्थानांतरित होईल. इतरही अनेक प्रकारे कंपन्यांची वित्तीय धोरणे उपभोग फलनावर प्रभाव पाडतात.

**12) ड्यूसेनबेरी परिकल्पना:** जेम्स ड्यूसेनबेरी यांनी उपभोग फलनावर परिणाम करणारी सापेक्ष उत्पन्न परिकल्पना मांडली आहे. या परिकल्पनेचा पहिला भाग 'प्रदर्शन परिणाम' याच्याशी संबंधित आहे. त्यांच्या मते, माणसाची उच्च पातळीचा उपभोग गाठण्याची प्रवृत्ती असते व व्यक्ती श्रीमंत शेजाऱ्याच्या उपभोगाचा आकृतीबंध गाठण्यासाठी स्पर्धा करतात किंबहुना त्यांच्याही पुढे जाण्याचा प्रयत्न करतात. अशा प्रकारे उपभोग पसंती ह्या परस्परावलंबी आहेत. वरील सर्व घटकांचा उपभोग प्रवृत्तीवर प्रभाव पडून उपभोग प्रवृत्तीत वाढ होते किंवा उपभोग प्रवृत्तीत घट होते.

## 4.2 बचत फलन:

"बचत म्हणजे उत्पन्नातील उपभोगावर खर्च न झालेला भाग होय."उत्पन्नातून उपभोग वजा केला असता बचत समजते. उपभोगा प्रमाणेच बचतही उत्पन्नावर अवलंबून असते. उत्पन्न आणि बचत यामधील संबंध बचत फलन किंवा बचत प्रवृत्तीने दर्शविला जातो. वाढत्या उत्पन्नाबरोबर उपभोगात त्याच प्रमाणात वाढ होत नाही, तेव्हा काही भागाची बचत केली जाते. चिन्हांच्या साहाय्याने बचत फलन पुढीलप्रमाणे दर्शविता येते.

$S = f(Y)$ यात, S = बचत फलनात्मक संबंध आणि Y = उत्पन्न आहे.

आकृतीच्या आधारे बचत फलनाची संकल्पना स्पष्ट करता येईल.




*आकृती: बचत फलन*

वरील आकृतीत, 'य' अक्षावर बचत आणि 'क्ष' अक्षावर उत्पन्न दर्शविले आहे. 'बब$_1$' बचत फलन किंवा बचत प्रवृत्ती वक्र असून, तो बचत आणि उत्पन्न यामधील फलनात्मक संबंध दर्शवितो. उत्पन्न शून्यापासून 'प$_1$' पर्यंत वाढत जाईपर्यंत उपभोग उत्पन्नापेक्षा जास्त असल्याने बचत ऋण आहे. 'प$_1$' बिंदूत बचत शून्य आहे. उत्पन्नात 'प$_1$' पेक्षा जास्त वाढ झाली असता बचतीत वाढ झालेली दिसते.

**सरासरी व सीमांत बचत प्रवृत्ती:**

उपभोग फलनाचे ज्याप्रमाणे सरासरी उपभोग प्रवृत्ती व सीमांत उपभोग प्रवृत्ती हे दोन गुणधर्म आहेत, तसेच बचत फलनाचेही सरासरी बचत प्रवृत्ती व सीमांत बचत प्रवृत्ती हे गुणधर्म आहेत. ते पुढे स्पष्ट केले आहेत.

### 4.2.1 सरासरी बचत प्रवृत्ती (APS):

उत्पन्न आणि बचत यामधील एक महत्त्वपूर्ण संबंध सरासरी बचत प्रवृत्तीने स्पष्ट केला जातो. 'सरासरी बचत प्रवृत्ती' म्हणजे खर्चयोग्य उत्पन्नाचे बचत केलेले प्रमाण होय."एकूण बचतीचे एकूण उत्पन्नाशी असलेले प्रमाण म्हणजे 'सरासरी बचत प्रवृत्ती' होय."एकूण बचतीस एकूण खर्चयोग्य उत्पन्नाने भागले असता सरासरी बचत प्रवृत्ती समजते. चिन्हांच्या साहाय्याने हे पुढीलप्रमाणे मांडता येईल.

$$\text{सरासरी बचत प्रवृत्ती} = \frac{S}{Y}$$

येथ S = बचत  आणि  Y = खर्चयोग्य उत्पन्न

सरासरी उपभोग प्रवृत्ती प्रमाणेच सर्वसाधारणपणे उत्पन्न वाढले असता सरासरी बचत प्रवृत्तीही बदलते. उत्पन्नात वाढ झाली असता सरासरी उपभोग प्रवृत्तीत घट होते. यातून असे सूचित होते की, उत्पन्नात वाढ झाली असता सरासरी बचत प्रवृत्तीत वाढ होते.

**सरासरी उपभोग प्रवृत्ती व सरासरी बचत प्रवृत्ती यांची बेरीज एक:**

उत्पन्न एकतर उपभोगासाठी वापरले जाते किंवा बचत केली जाते, त्यामुळे सरासरी उपभोग प्रवृत्ती व सरासरी बचत प्रवृत्ती यांची बेरीज 1 येते.

$$C + S = Y$$

उपभोग + बचत = उत्पन्न

समीकरणाच्या दोन्ही बाजूस खर्चयोग्य उत्पन्नाने (Y) भागले असता आपल्याला पुढील समीकरण मिळते.

$$\frac{C}{Y} + \frac{S}{Y} + \frac{Y}{Y} = 1$$

येथे, $\frac{C}{Y}$ म्हणजे सरासरी उपभोग प्रवृत्ती आणि $\frac{S}{Y}$ म्हणजे सरासरी बचत प्रवृत्ती असल्याने,

$$APC + APS = 1$$

याचाच अर्थ, सरासरी उपभोग प्रवृत्ती व सरासरी बचत प्रवृत्ती यांची बेरीज 1 येते.

### 4.2.2 सीमांत बचत प्रवृत्ती (MPS):

सरासरी बचत प्रवृत्ती बचत केलेले उत्पन्नाचे प्रमाण दर्शविते, तर सीमांत बचत प्रवृत्ती वाढलेल्या किंवा जादा खर्चयोग्य उत्पन्नापैकी किती भागाची बचत केली जाते हे दर्शविते. त्यामुळेच 'सीमांत बचत प्रवृत्ती' म्हणजे खर्चयोग्य उत्पन्नाने प्रेरित झालेला बचतीतील बदल होय. याचाच अर्थ, "सीमांत बचत प्रवृत्ती म्हणजे एकूण बचतीच्या पातळीतील बदलाचे एकूण खर्चयोग्य उत्पन्नाच्या पातळीतील बदलाशी असलेले प्रमाण होय."बचतीतील बदलाला खर्चयोग्य उत्पन्नातील बदलाने भागले असता सीमांत बचत प्रवृत्ती समजते. चिन्हाच्या साहाय्याने हे पुढीलप्रमाणे मांडता येईल.

$$\text{सीमांत बचत प्रवृत्ती} = \frac{\Delta S}{\Delta Y}$$

येथे, Δ = बदल ( वाढ किंवा घट)

S = बचत

Y = खर्चयोग्य उत्पन्न

सीमांत बचत प्रवृत्तीवरून वाढलेल्या खर्चयोग्य उत्पन्नाचा किती भाग बचत म्हणून बाजूला काढून ठेवला जातो हे समजते.

SYBCom-B.Eco-DBC

### 4.2.3 बचतीचे निर्धारक घटक:

बचतीवर पुढील काही घटक परिणाम करतात / प्रभाव टाकतात.

1) **उत्पन्न पातळी:** उत्पन्नाची पातळी बचतीवर फार मोठा परिणाम घडून आणते. उपभोग खर्चापेक्षा उत्पन्न जास्त असेल तर बचत केली जाते. उत्पन्नाच्या प्रमाणात वाढत जाईल त्याप्रमाणात उपभोग खर्चाच्या तुलनेत बचत वाढत जाते.

2) **उत्पन्न वितरण:** उत्पन्नाच्या वितरणावर बचत अवलंबून असते. उत्पन्नाचे योग्य वाटप घडून येत असेल तर व्यक्तीला बचत करायला संधी असते. निर्वाह क्षम उत्पन्नापेक्षा कमी उत्पन्न मिळत असल्यास बचत करणे शक्य नसते. त्यामुळे एखाद्या देशात उत्पन्नाचे वितरण कसे केले जाते; यावरही त्या देशातील बचतीचे प्रमाण अवलंबून असते.

3) **वापर प्रेरणा:** अर्जित केलेले उत्पन्न कसे खर्च होईल हे व्यक्तीला प्राप्त होणाऱ्या प्रेरणांवर अवलंबून असते. काटकसर करणारी व्यक्ती किंवा कंजूष व्यक्ती कोणत्याही कारणाशिवाय बचत करते.

4) **संपत्ती:** संपत्ती मिळवन्याची प्रेरणा ज्या व्यक्तीमध्ये असते अशी व्यक्ती बचत करते.

5) **सवय:** व्यक्तीच्या खर्चविषयक सवयी बचतीवर प्रभाव टाकतात.

6) **व्यक्तिनिष्ठ हेतू:** काही व्यक्ती ठरावीक हेतुने किंवा विशिष्ट उद्दिष्टाने प्रेरीत होऊन त्या उद्दिष्ट पुर्ती साठी बचत करतात.

7) **व्याज दर:** व्याजदरातील बदलानुसार व्यक्ती बचत करतात व्याजदर अधिक असेल तर बचत वाढविली जाते याउलट, व्याजदर कमी असेल तर कमी बचत केली जाते.

8) **सावधानी:** भविष्यकाळात अनेक गोष्टींसाठी पैशांची आवश्यकता भासू शकते. आकस्मिक कारणांसाठी लोक बचत करतात. वृद्धावस्था, आजारपण, दुर्घटना आपत्कालीन परिस्थिती अशा गोष्टींच्या व्यवस्थापनासाठी बचत केली जाते.

9) **जीवन स्तर:** प्रत्येक व्यक्ती जीवन जगत असताना जीवनमानाची पातळी उंचावण्यासाठी प्रयत्न करतो, त्यासाठी आपल्या वर्तमान उत्पन्नातून बचत करणे आवश्यक असते.

10) **दूरदृष्टी:** भविष्य नेहमी अनिश्चित असते. दूरदृष्टी असणारी व्यक्ती आपल्या पाल्यांचे शिक्षण, विवाह इत्यादीसाठी व्यवस्था करून ठेवतो तसेच स्वतःचा वृद्धापकाळ सुरक्षित रहावा यासाठी वर्तमान काळात बचत करतो.

11) **गुंतवणूक:** व्यक्ती आपल्या वर्तमान काळातील उत्पन्नावर कधीच खुश नसतो त्याला आपले उत्पन्न वाढले पाहिजे असे नेहमी वाटत असते. यासाठी, व्यवहारी व्यक्ती बचत करून त्यातून गुंतवणूक करतो व अधिक उत्पन्न मिळविण्याचे मार्ग शोधतो.

12) **आर्थिक स्वातंत्र्य:** व्यक्ती आर्थिक दृष्ट्या आत्मनिर्भर असण्यासाठी नेहमी प्रयत्नशील असतो. वेळप्रसंगी निकड भासल्यास कुणाकडून उधार-उसनवार पैसे घेण्यापेक्षा स्वतःच्याच वर्तमान उत्पन्नातून भविष्यकाळासाठी बचत केली जाते.

13) **प्रतिष्ठा:** आजच्या काळात पैसा प्रतिष्ठा पावलेला आहे. धनवान व्यक्तींचा आदर केला जातो. प्रतिष्ठा प्राप्त करण्यासाठी व्यक्ती बचत करतो किंवा संपत्तीचा संग्रह करतो.

14) **व्यक्ती स्वभाव:** काही व्यक्ती कोणत्याही कारणाशिवाय बचत करतात. अशा व्यक्तींना साधारणपणे आपण कंजूष असे म्हणतो असे लोक आपल्याकडील पैसा वाढत जावा यासाठी बचत करत असतात.

### 4.2.4 उपभोग व बचत फलनातील संबंध (MPC & MPS):

खर्चयोग्य उत्पन्नात वाढ झाली असता हे वाढलेले उत्पन्न उपभोगासाठी वापरले जाते किंवा बचत केली जाते. त्यामुळेच सीमांत उपभोग प्रवृत्ती व सीमांत बचत प्रवृत्ती यांची बेरीज 1 येते. पुढील प्रकारे हे स्पष्ट करता येईल.

उत्पन्नात बदल झाला असता उपभोगात किंवा बचतीत बदल होतो.

$$\Delta C + \Delta S = \Delta Y$$

(उपभोगातील बदल + बचतीतील बदल = उत्पन्नातील बदल)

वरील समीकरणातील दोन्ही बाजूस $\Delta Y$ ने भागले असता-

SYBCom-B.Eco-DBC

$$\frac{\Delta C}{\Delta Y} + \frac{\Delta S}{\Delta Y} = \frac{\Delta Y}{\Delta Y} = 1$$

येथे $\frac{\Delta C}{\Delta Y}$ म्हणजे सीमांत उपभोग प्रवृत्ती व $\frac{\Delta S}{\Delta Y}$ म्हणजे सीमांत बचत प्रवृत्ती आहे.

त्यामुळेच सीमांत उपभोग प्रवृत्ती व सीमांत बचत प्रवृत्ती यांची बेरीज 1 येते .

## 4.3 गुंतवणूक:

अल्पकाळात राष्ट्रीय उत्पन्न व रोजगाराची पातळी एकूण मागणीवर अवलंबून असते. उपभोग मागणी व गुंतवणूक मागणी हे एकूण मागणीचे दोन भाग आहेत. अल्पकाळात कमी-अधिक प्रमाणात उपभोग फलन स्थिर राहत असल्याने उत्पन्न व रोजगार निश्चितीच्या बाबतीत गुंतवणूक मागणी अतिशय महत्त्वाची आहे.

### अ) गुंतवणूकीचा अर्थ:

सर्वसाधारणपणे व्यक्ती जेव्हा भाग, बाँड व कर्जरोखे खरेदी करते तेव्हा व्यक्तीने गुंतवणूक केली असे म्हटले जाते. मात्र, ही देशातील उत्पन्न व रोजगार निश्चित करणारी वास्तव गुंतवणूक नसते. ही केवळ वित्तीय गुंतवणूक आहे. वास्तव गुंतवणूक म्हणजे वास्तव भांडवलाच्या साठ्यात पडणारी भर होय. केन्सच्या मते, गुंतवणूक म्हणजे जी भांडवली साधनात भर टाकते अशी 'वास्तव गुंतवणूक' होय. अशी गुंतवणूक भांडवली वस्तूंच्या उत्पादनात व खरेदीत वाढ करून उत्पन्न व उत्पादनाच्या पातळीत वाढ करते. अशा प्रकारे अर्थशास्त्रात गुंतवणूक म्हणजे यंत्रसामग्री, इमारत, साधने, हत्यारे वगैरे भांडवली वस्तूत भर टाकण्यासाठी करण्यात आलेला नवीन खर्च होय.

### ब) गुंतवणूक प्रकार:

#### 1) स्थूल आणि निव्वळ गुंतवणूक:

वास्तव भांडवलाच्या साठ्यातील वाढ म्हणजेच निव्वळ गुंतवणूक, अर्थव्यवस्थेतील एकूण मागणीच्या पातळीत वाढ करते व त्यामुळे उत्पन्न व रोजगाराच्या पातळीत वाढ होते. केन्स आणि इतर अनेक अर्थशास्त्रज्ञ उपभोग्य वस्तूच्या साठ्यातील वाढीचा समावेश देशाच्या भांडवलात आणि त्यामुळे गुंतवणुकीत करतात. भांडवल म्हणजे कारखाने, संयंत्रे, साधने यासारखी 'वास्तव मालमत्ता' होय. इतर वस्तूंचे उत्पादन करण्यासाठी उत्पादनप्रक्रियेत वापरली जाऊ शकतील अशी अगोदर उत्पादन झालेली आदाने म्हणजे 'भांडवल' होय. निव्वळ गुंतवणुकीच्या माध्यमातून भांडवल व गुंतवणूक एकमेकांशी संबंधित आहेत. एका वर्षात नवीन भांडवली मालमत्तेवर खर्च करण्यात आलेली एकूण रक्कम म्हणजे स्थूल गुंतवणूक होय. मात्र, प्रत्येक वर्षी भांडवलाचा काही साठा खराब होतो. त्याच्या ऐवजी दुसऱ्या भांडवलाची पुनःस्थापना आवश्यक असते. स्थूल गुंतवणुकीतून घसारा वजा केला असता निव्वळ गुंतवणूक समजते. निव्वळ गुंतवणूक म्हणजे अर्थव्यवस्थेच्या अस्तित्वातील भांडवल साठ्यातील निव्वळ वाढ होय. जर स्थूल गुंतवणूक घसाऱ्याइतकी असेल, तर निव्वळ गुंतवणूक शून्य असेल आणि अर्थव्यवस्थेच्या भांडवली साठ्यात काहीही वाढ होणार नाही. जर स्थूल गुंतवणूक घसाऱ्यापेक्षा कमी असेल, तर अर्थव्यवस्थेतील भांडवलसाठ्यात घट होते. अशा प्रकारे अर्थव्यवस्थेच्या वास्तव भांडवलसाठ्यात वाढ होण्यासाठी स्थूल गुंतवणूक घसाऱ्यापेक्षा जास्त असणे गरजेचे आहे.

#### 2) स्वायत्त आणि प्रेरित गुंतवणूक:

##### i) स्वायत्त गुंतवणूक:

'जी गुंतवणूक उत्पन्नाच्या पातळीतील बदलानुसार बदलत नाही तिला स्वायत्त गुंतवणूक म्हणतात.'

याचाच अर्थ, अशी गुंतवणूक उत्पन्नावर अवलंबून नसते किंवा उत्पन्न अलवचिक असते. स्वायत्त गुंतवणुकीवर नवप्रवर्तन, शोध, लोकसंख्या व श्रमदल यांची वृद्धी, संशोधन, सामाजिक व कायदेशीर संस्था, युद्ध, क्रांती वगैरे बहिर्जात घटकांचा प्रभाव पडतो. मात्र, अशा गुंतवणुकीवर मागणीतील बदलाचा प्रभाव पडत नाही. सरकार किंवा खासगी उत्पादनसंस्थांनी केलेली आर्थिक व सामाजिक गुंतवणूक स्वायत्त असते. स्वायत्त गुंतवणुकीत धरणे, रस्ते, कॅनॉल, शाळा, हॉस्पिटल यांवरील खर्चाचा समावेश होतो. अशा प्रकारची गुंतवणूक ही सर्वसाधारणपणे सार्वजनिक धोरणाशी संबंधित असल्याने स्वायत्त गुंतवणूक ही सार्वजनिक गुंतवणूक समजली जाते. दीर्घकाळात सर्व प्रकारची खासगी गुंतवणूक ही स्वायत्त गुंतवणूक असू शकते

SYBCom-BEco-DBC

कारण, त्या गुंतवणुकीवर बहिर्जात घटकांचा प्रभाव पडतो. पुढील आकृतीच्या आधारे स्वायत्त गुंतवणूक स्पष्ट करता येईल.




*आकृती: स्वायत्त गुंतवणूक*

वरील आकृतीत 'य  अक्षावर गुंतवणूक व 'क्ष' अक्षावर उत्पन्न दर्शविले आहे. 'गग$_1$' हा स्वायत्त गुंतवणूक वक्र आहे. हा वक्र असे स्पष्ट करतो की, उत्पन्नाच्या सर्व पातळ्यांना गुंतवणूक 'अग' एवढी स्थिर आहे. अशा प्रकारे स्वायत्त गुंतवणूक उत्पन्नातील बदलानुसार बदलत नसल्याने स्वायत्त गुंतवणुकीचा वक्र 'क्ष' अक्षाला समांतर असतो.

### ii) प्रेरित गुंतवणूक:

"उत्पन्न पातळीतील बदलाने प्रभावित होणारी गुंतवणूक म्हणजे प्रेरित गुंतवणूक होय."उत्पन्न पातळीत झालेल्या वाढीबरोबर प्रेरित गुंतवणुकीत वाढ होते. उत्पन्न पातळी मोठी असेल, तर समाजाचा उपभोगही मोठा असेल. अधिक उपभोग्य वस्तूंचे उत्पादन करण्यासाठी भांडवली वस्तूत अधिक गुंतवणूक केली जाईल.

किमती, वेतन आणि व्याजाचा दर अशा नफ्यावर प्रभाव पाडणाऱ्या घटकांचा प्रेरित गुंतवणुकीवर परिणाम होतो, तसेच मागणीचाही या प्रकारच्या गुंतवणुकीवर परिणाम होतो. मात्र, प्रेरित गुंतवणूक उत्पन्न या घटकावर अधिक प्रमाणात अवलंबून असते.

प्रेरित गुंतवणूक हे उत्पन्नाचे फलन आहे. प्रेरित गुंतवणूक उत्पन्न लवचीक आहे. उत्पन्नात वाढ झाली असता प्रेरित गुंतवणुकीत वाढ होते आणि उत्पन्नात घट झाली असता प्रेरित गुंतवणुकीत घट होते. प्रेरित गुंतवणुकीचा वक्र पुढील आकृतीत दर्शविला आहे.

आकृतीत 'य' अक्षावर गुंतवणूक व 'क्ष' अक्षावर उत्पन्न दर्शविले आहे. ' ग$_1$ग$_1$' हा प्रेरित गुंतवणुकीचा वक्र आहे. हा वक्र उत्पन्नात झालेल्या वाढीबरोबर गुंतवणुकीत वाढ होत असल्याचे आणि उत्पन्नात झालेल्या घटीबरोबर गुंतवणुकीत घट होत असल्याचे दर्शवितो. उत्पन्न 'अप$_२$' असताना गुंतवणूक 'ग$_२$प$_२$' एवढी आहे. उत्पन्नात वाढ होऊन ते 'अप$_४$' झाले असता गुंतवणुकीत वाढ होऊन ती ' ग$_४$प$_४$' एवढी होते. उत्पन्नात 'अप$_४$' वरून 'अप$_३$' पर्यंत घट झाली, तर गुंतवणुकीत घट होऊन ती 'ग$_३$प$_३$' एवढी होते. प्रेरित गुंतवणुकीचा वक्र आकृतीत दर्शविल्याप्रमाणे डावीकडून उजवीकडे वर चढत जाणारा असतो.

SYBCom-BEco-DBC




*आकृती: प्रेरित गुंतवणूक*

## 4.4 भांडवलाची सीमान्त लाभक्षमता (MEC):

उपभोगप्रवृती निर्धारित करणा-या सर्व घटकांचा परिणाम उपभोगप्रवृत्तीवर होत असला तरी अल्पकाळात उपभोगप्रवृत्ती बरीचशी स्थिर असते. यामुळे अल्पकाळात गुंतवणूक हा घटक अधिक महत्त्वाचा ठरतो. गुंतवणूक ही भांडवलाची सीमान्त लाभक्षमता आणि व्याजाचा दर या दोहोवर अवलंबून असते.

"एखाद्या भांडवली वस्तूपासून तिच्या संपूर्ण आयुष्यात मिळणाऱ्या वार्षिक लाभांची आज अपेक्षित असलेली किंमत त्या वस्तूच्या पुरवठा-किंमतीएवढी होण्यासाठी ज्या दराने बट्टा अथवा कसर कापली जाईल तो दर म्हणजे भांडवलाची सीमान्त लाभक्षमता"अशी केन्स यांनी व्याख्या केलेली आहे.

दुसऱ्या शब्दांत, कोणत्याही मालमत्तेचा एक जादा नग घेतल्यास त्यापासून अपेक्षित असलेल्या लाभापासून ज्या विशिष्ट दराने कसर कापून ही लाभाची रक्कम त्या मालमत्ता नगाच्या पुनःस्थापन खर्चाबरोबर होते तो दर म्हणजे भांडवलाची सीमान्त लाभक्षमता होय.

कोणत्याही मालमत्तेचे अपेक्षित आयुष्य असते. या संपूर्ण आयुष्यात आजच्या किंमतीवरून एकूण स्थुल अपेक्षित लाभ शोधून काढता येतो. या स्थुल लाभातून इतर घटकांचा मोबदला वर्ग करून केवळ त्या भांडवली वस्तूला मिळणारा लाभ अथवा प्रतिफल शोधून काढता येते. याला 'निव्वळ लाभ' असे म्हणतात. सबंध आयुष्यात मिळणाऱ्या या निव्वळ लाभाचे मूल्य विशिष्ट दराने कमी करावे लागते. अशा रितीने कमी करून आलेले प्रतिफल त्या भांडवली वस्तूच्या पुरवठा-किमतीबरोबर म्हणजे तशीच नवीन वस्तू खरेदी करण्यासाठी द्याव्या लागणा-या अपेक्षित किमतीबरोबर आले पाहिजे. तसे ते आले तर गुंतवणूक केली जाईल. त्याहून जास्त प्रतिफल देत असेल तर गुंतवणूक वाढविली जाईल, त्याहून कमी आल्यास गुंतवणूक कमी केली जाईल. भांडवलाची पुरवठा-किमत $C_r$ ने भांडवली वस्तूपासून मिळणारे वार्षिक प्रतिफल $Q_1$, $Q_2$ इत्यादी अक्षरांनी आणि बट्टयाचा दर $r$ ने दाखविल्यास, भांडवली वस्तूची पुरवठा किमत = अपेक्षित लाभ हे समीकरण पुढीलप्रमाणे दाखविता येईल.

$$C_r = \frac{Q_1}{(1+r)} + \frac{Q_2}{(1+r)^2} + \frac{Q_3}{(1+r)^3} + \ldots\ldots \frac{Q_n}{(1+r)^n}$$

या समीकरणात, पहिल्या वर्षानंतर मिळणारा निव्वळ लाभ $\frac{Q_1}{(1+r)}$ या पदाने, दुसऱ्या वर्षानंतर मिळणारा लाभ $\frac{Q_2}{(1+r)^2}$ पदाने, याप्रमाणे दाखविला आहे उदाहरणार्थ, 10 % हा दर मानला तर एक वर्षाच्या अखेरीस मिळणाऱ्या प्रत्येक रुपयाची आजची किमत $\frac{1}{(1+0.10)}$ = 90.91 पैसे येईल. तसेच दोन वर्षांनी मिळणाऱ्या प्रत्येक रुपयाची आजची किंमत $\frac{1}{(1+0.10)^2}$ म्हणजे 82.65 पैसे येईल. याचाच अर्थ असा की, आज गुंतवलेल्या 90.91 पैशांच्या एका वर्षाने 10 % दराने 1 रुपया होतो; तर आज गुंतविलेल्या 82.65 पैशांचा 2 वर्षांनी 10 % दराने 1 रुपया होतो. आता एखाद्या यंत्राची आजची किमत 3000 रुपये आणि त्याचे आयुष्य 2 वर्षे असे समजू. पहिल्या वर्षाच्या अखेरीस या यंत्रापासून मिळणारा निव्वळ लाभ 1100 रुपये आणि दुसऱ्या वर्षाच्या अखेरीस मिळणारा लाभ 2420 रुपये असेल तर या एकूण लाभांची 10 % नी कसर कापून आजची किंमत 3000 रुपये येईल.

सूत्राप्रमाणे

$$3000 = \frac{1100}{(1+0.10)} + \frac{2420}{(1+0.10)^2}$$

$$= \frac{1100}{1.10} + \frac{2420}{1.21}$$

$$= 1000 + 2000 = 3000$$

वरील उदाहरणात 10 % या दराने एकूण लाभाची किंमत कमी झाली आहे. तेव्हा ती यंत्राच्या आजच्या किमतीएवढी म्हणजेच पुरवठा किमतीएवढी झाली आहे. येथे 10 % ही भांडवलाची सीमान्त लाभक्षमता आहे. या उदाहरणावरून, भांडवलाची सीमान्त लाभक्षमता ही भांडवली वस्तूची पुरवठा किंमत आणि अपेक्षित (वार्षिक) लाभ या दोन घटकांवर कशी अवलंबून आहे हे स्पष्ट होते. भांडवली वस्तूची पुरवठा-किमत 3000 रुपयांपेक्षा कमी झाली तर अपेक्षित लाभ त्या किंमती एवढा होण्यासाठी 10 % पेक्षा जास्त दराने कसर / बट्टा कापावा लागेल. म्हणजेच भांडवली वस्तूची पुरवठा-किंमत घटल्यास भांडवलाची सीमान्त लाभक्षमता वाढते. उलट, पुरवठा-किमत वाढल्यास सीमान्त लाभक्षमता घटेल. तसेच अपेक्षित लाभ वाढला तर 10 % पेक्षा जास्त दराने बट्टा कापावा लागेल. म्हणजेच भांडवलाची सीमान्त लाभक्षमता वाढेल. उलट, अपेक्षित लाभ कमी झाल्यास भांडवलाधी सीमान्त लाभक्षमता घटेल.

**भांडवलाच्या सीमान्त लाभक्षमतेवर परिणाम करणारे घटक(MEC):**

भांडवलाची सीमान्त लाभक्षमता वाढल्यास (व्याजाचा दर दिलेला असेल तर) गुंतवणूक वाढते; आणि भांडवलाची सीमान्त लाभक्षमता घटल्यास गुंतवणूक कमी होते. म्हणूनच गुंतवणुकीच्या आणि पर्यायाने एकूण परिणामकारक मागणीच्या संदर्भात भांडवलाच्या सीमान्त लाभक्षमतेला महत्त्वाचे स्थान आहे. भांडवलाच्या सीमान्त लाभक्षमतेवर अल्पकालीन व दीर्घकालीन घटक परिणाम करतात.

**अ) अल्पकालीन घटक:**

अल्पकाळात भांडवलाच्या सीमान्त लाभक्षमतेवर पुढील घटकांचा प्रभाव असतो.

**1) अपेक्षित मागणी:** अर्थव्यवस्थेत उत्पादित केल्या जाणाऱ्या वस्तूच्या मागणीसंबंधी उद्योजकांच्या अपेक्षा काय आहेत यावर भांडवलाची सीमान्त लाभक्षमता अवलंबून असते. मागणीत वाढ होण्याची अपेक्षा असेल तर भांडवलाची सीमान्त लाभक्षमता वाढेल, याउलट परीस्थितीत भांडवलाची सीमान्त लाभक्षमता घटेल.

**2) उपभोग प्रवृत्ती:** अल्पकाळात, कोणत्याही कारणाने, उपभोग प्रवृत्ती वाढली तर भांडवलाची सीमान्त लाभक्षमता व त्यामुळे गुंतवणूक वाढेल. याचे कारण उपभोग प्रवृत्ती वाढल्यास विविध वस्तू व सेवा यांची मागणी वाढून अपेक्षित लाभ वाढेल; उलट झाल्यास भांडवलाची सीमान्त लाभक्षमता घटेल.

**3) खर्च आणि किमती:** भावी काळातील खर्चाच्या आणि किमतीच्या अपेक्षित प्रवृत्तीचाही भांडवलाच्या सीमान्त लाभक्षमतेवर परिणाम होतो. किमती फारशा वाढणार नाहीत पण खर्चात मात्र बरीच वाढ अपेक्षित आहे. असे असल्यास भांडवलाची सीमान्त लाभक्षमता कमी होईल, खर्च वाढणार नाही पण किमती वाढतील तशी अपेक्षा असल्यास भांडवलाची सीमान्त लाभक्षमता वाढून गुंतवणुकीस चालना मिळेल.

**4) उत्पन्नातील फेरबदल:** त्वरकाच्या माध्यमातून उत्पन्नाचा प्रत्यक्ष परिणाम गुंतवणुकीवर होत असतो. उत्पन्न वाढले की उपभोग्य वस्तूंची मागणी वाढून भांडवलाची सीमान्त लाभक्षमता वाढते आणि त्यामुळे गुंतवणूक वाढते. अनपेक्षित लाभ अथवा हानी, करवाढ अथवा कर-सवलत यांच्यामुळे उत्पन्नात फेरफार होतात तेव्हा भांडवलाच्या सीमान्त लाभक्षमतेतही त्यानुसार बदल होतात.

**5) व्यावसायिक आत्मविश्वास:** खासगी साहस पद्धतीत व्यावसायिकांचा आत्मविश्वास हा घटक गुंतवणुकीच्या दृष्टीने महत्त्वाचा असतो. व्यावसायिक आणि उद्योजक आशावादी असतील तर भांडवलाची सीमान्त लाभक्षमता वाढेल. याउलट, भविष्यातील लाभाबाबत साशंकता असेल तर लाभक्षमता घटून गुंतवणूक कमी होईल.

**6) प्रचलित लाभाचा दर:** भावी लाभासंबंधी अंदाज करताना प्रचलित लाभाचा दर हा महत्त्वाचा घटक मानला जातो. आजच्या लाभावर उद्याच्या अपेक्षा अवलंबून असतात. म्हणूनच प्रचलित लाभाचा दर चांगला असेल तर भांडवलाची सीमान्त लाभक्षमता वाढून गुंतवणूक उत्तेजित होईल.

**ब) दीर्घकालीन घटक:**

दीर्घकाळात भांडवलाच्या सीमान्त लाभक्षमतेवर पुढील घटक परिणाम करतात.

SYBCom-B-Eco-DBC

**1) लोकसंख्यावाढ:** लोकसंख्या वाढती असल्यास सगळ्याच वस्तूंची मागणी वाढत जाणारी असते. त्यामुळे जेथे लोकसंख्या वेगाने वाढत जाणारी असते तेथे भांडवलाची सीमान्त लाभक्षमता वाढती असते. उलट, ज्या अर्थव्यवस्थेतील लोकसंख्या घटती असते त्या अर्थव्यवस्थेतील भांडवलाच्या सीमान्त लाभक्षमतेवर लोकसंख्येचा प्रतिकूल परिणाम होतो.

**2) नवीन प्रदेश:** एखाद्या देशात नवीन प्रदेश विकासासाठी उपलब्ध होतात तेव्हा रस्तेबांधणी, विद्युतीकरण, पाणीपुरवठा, गृहनिर्माण, शेतीविकास आणि औद्योगिकीकरण इत्यादी क्षेत्रांत गुंतवणुकीच्या फार मोठ्या संधी निर्माण होतात. त्यामुळे भांडवलाची सीमान्त लाभक्षमता वाढते.

**3) तांत्रिक प्रगती:** उत्पादनाच्या तंत्रात सुधारणा घडवून आणणारे शोध लागतात आणि त्या शोधामुळे श्रमात आणि खर्चात बचत करून उत्पादन करण्याची शक्यता निर्माण होते तेव्हा नफा मिळण्याच्या अशा तांत्रिक प्रगतीमुळे भांडवलाची सीमान्त लाभक्षमता वाढते.

**4) प्रचलित गुंतवणुक:** भावी गुंतवणुकीवरील लाभांच्या अपेक्षा वर्तमान गुंतवणुकीच्या स्वरूपावर (आणि परिमाणावरही) अवलंबून असतात. उदाहरणार्थ, घड्याळे, पोलादी फर्निचर, रेडिओ-सेट इत्यादी क्षेत्रांत आजची गुंतवणूक फार मोठी असेल तर उद्या या क्षेत्रात गुंतवणुकीला फारसा वाव राहणार नाही. अशी क्षेत्रे जितकी जास्त तितकी भांडवलाची सीमान्त लाभक्षमता कमी राहील.

**5) प्रचलित उत्पादनक्षमता:** अस्तित्वात असलेली उत्पादनक्षमता कितपत वापरली जाते यावरही दीर्घकालीन लाभक्षमता अवलंबून असते. प्रचलित उत्पादनक्षमता पुरेपूर वापरली जात नसेल तर आहे त्याच क्षमतेचा वापर करून वाढत्या मागणीचे आवाहन स्वीकारणे शक्य होईल अर्थात नव्या भांडवली वस्तूची गरज फारशी भासणार नाही म्हणून भांडवलाची सीमांत लाभ क्षमता कमी राहील उलट आज अतिरिक्त उत्पादनक्षमता मुळीच नसेल तर भांडवलाची सीमांत लाभ क्षमता जास्त राहील .

## 4.5 गुंतवणूक गुणक:

गुणकाची संकल्पना सर्वप्रथम आर. एफ. कान (Kahn) यांनी विकसित केली. आर. एफ. कान यांचा गुणक रोजगार गुणक होता. केन्स यांनी या संकल्पनेच्या आधारे गुंतवणूक गुणकाची संकल्पना मांडली. केन्स यांनी आपल्या गुणक सिद्धांतात गुंतवणुकीतील बदलाचा उपभोग खर्चावर व त्याद्वारे अल्पकाळात उत्पन्ननिर्मितीवर होणारा परिणाम मांडला आहे. गुणक सिद्धांत हा केन्सच्या रोजगारविषयक सिद्धांताचा अविभाज्य भाग आहे. केन्सच्या मते, उपभोग प्रवृत्ती दिलेली असताना गुणक एकूण रोजगार व उत्पन्न आणि गुंतवणुकीचा दर यामधील संबंध स्पष्ट करतो.

गुणक ही संकल्पना गुंतवणूक खर्चातील बदलाचा प्रेरित उपभोग खर्चाद्वारे एकूण उत्पन्नावर होणारा परिणाम स्पष्ट करते. अशा प्रकारे सुरुवातीस झालेली गुंतवणुकीतील वाढ आणि त्यामुळे होणारी एकूण उत्पन्नातील वाढ यामधील संबंध गुणक दर्शविते.

"गुणक हे उत्पन्नातील वाढीचे गुंतवणुकीतील वाढीशी असलेले प्रमाण होय."

जर गुंतवणुकीतील बदल म्हणजे $\Delta I$ व उत्पन्नातील बदल म्हणजे $\Delta Y$ मानले तर, गुणक $(K) = \frac{\Delta Y}{\Delta I}$ होय .

सुरुवातीस झालेल्या गुंतवणुकीमुळे एकूण उत्पन्नात त्या गुंतवणुकीच्या अनेक पटीने वाढ होत असल्याचे गुणक ही संकल्पना स्पष्ट करते. ही वाढ कशा प्रकारे होते हे उदाहरणाच्या आधारे स्पष्ट करता येईल. समजा, सरकारने सार्वजनिक कामावर (रस्ते बांधणे) 100 कोटी रुपये गुंतवणूक खर्च करण्याचे ठरविले. ही कामे करण्यासाठी सरकार श्रमिकांना कामावर घेईल, कच्चा माल खरेदी केला जाईल. त्यामुळे श्रमिकांना वेतन मिळेल, कच्च्या माल पुरविणाऱ्यांना त्याच्या किमती व इतर घटक पुरविणाऱ्यांना त्याचे मोबदले मिळतील. रस्तेबांधणीच्या कार्यात सहभागी झालेल्या सर्व घटकांना मिळून 100 कोटी रुपये मिळतील. लोक आपल्याला मिळालेले उत्पन्न उपभोग्य वस्तूंवर खर्च करतील. उपभोग्य वस्तूंवर किती उत्पन्न खर्च केले जाईल हे लोकांच्या सीमांत उपभोग प्रवृत्तीवर अवलंबून असते. समजा, लोकांची सीमांत उपभोग प्रवृत्ती 3/5 किंवा 60 % आहे. अशा स्थितीत लोक आपल्याला मिळालेल्या 100 कोटी रुपये उत्पन्नापैकी 60 कोटी रुपये उपभोग्य वस्तूंवर खर्च करतील. त्यामुळे उपभोग्य वस्तूंचा पुरवठा करणाऱ्यांना 60 कोटी रुपये मिळतील. ज्यांना हे 60 कोटी रुपये मिळतील ते त्यांच्या सीमांत उपभोग प्रवृत्तीला अनुसरून उपभोगावर खर्च करतील. समजा, त्यांचीही सीमांत उपभोग प्रवृत्ती 3/5 असेल, तर ते 60 कोटी रुपयांपैकी 3/5 रक्कम म्हणजेच 36 कोटी रुपये उपभोगावर खर्च करतील. त्यांनी खर्च केलेले हे 36 कोटी रुपये त्यांना उपभोग्य

SYBCom-B-Eco-DBC

वस्तू पुरविणाऱ्यांना मिळतील. तेसुद्धा आपल्याला मिळालेला उत्पन्नापैकी काही भाग उपभोगावर खर्च करतील. उपभोग खर्चाची साखळी पुढे चालू राहून लोकांचे उत्पन्न वाढत जाईल. मात्र, प्रत्येक वेळी उत्पन्नात होणारी जादा वाढ ही पूर्वीपेक्षा कमी राहील. याचे कारण मिळालेल्या उत्पन्नापैकी काही भागाची लोकांकडून बचत केली जाईल. अशा प्रकारे रस्तेबांधणीसाठी जी 100 कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात आली होती तेवढ्याच रकमेने उत्पन्नात वाढ होत नाही, तर त्याच्या काही पटीत होते. गुणक प्रक्रिया उलट्या दिशेनेही घडून येते. याचाच अर्थ, गुंतवणुकीत घट झाली असता त्याच्या काही पटीत उत्पन्नात घट होते.

**गुणकाचे सूत्र:**

सुरुवातीस केलेल्या गुंतवणुकीमुळे उत्पन्नात एकूण किती वाढ होईल हे समजण्यासाठी गुणकाचे मूल्य समजणे आवश्यक असते. गुणकाचे मूल्य सीमांत उपभोग प्रवृत्तीने निश्चित होते. गुणकाचे मूल्य शोधून काढण्यासाठी पुढील सूत्र वापरल जाते.

$$\text{गुणक} = \frac{1}{1-\text{सीमांत उपभोग प्रवृत्ती}} \quad \text{म्हणजेच,} \quad K = \frac{1}{1-MPC}$$

वरील सुत्रानुसार, एकातून सीमांत उपभोग प्रवृत्ती वजा केली असता सीमांत बचत प्रवृत्ती समजते. याचे कारण सीमांत उपभोग प्रवृत्ती व सीमांत बचत प्रवृत्ती यांची बेरीज एक येते. त्यामुळे -

$$\text{गुणक} = \frac{1}{\text{सीमांत बचत प्रवृत्ती}}$$ - असेही गुणकाचे सूत्र दिले जाते.

उदा. समजा, सरकारने 100 कोटी रुपये एवढी गुंतवणूक खर्चात वाढ केली. समाजाची सीमांत उपभोग प्रवृत्ती 3/5 किंवा 60 % आहे. तर गुणकाचे मूल्य आणि एकूण उत्पन्नात किती वाढ घडून येईल हे वर दिलेल्या सूत्राच्या आधारे शोधता येईल.

$$\text{गुणक} = \frac{1}{1-\text{सीमांत उपभोग प्रवृत्ती}} = \frac{1}{1-\frac{3}{5}} = \frac{1}{\frac{2}{5}} = \frac{1\times5}{2} = \frac{5}{2} = 2.5$$

∴ गुणकाचे मूल्य 2.5 आहे.

गुंतवणुकीतील वाढीला गुणकाच्या मूल्याने गुणले असता एकूण उत्पन्नातील वाढ समजते.

येथे, रु. 100 कोटी × 2.5 = रु. 250 कोटी एवढी एकूण उत्पन्नात वाढ होईल.

**गुंतवणूक गुणक गृहिते किंवा मर्यादा:**

गुणक काही गृहितांवर आधारित आहे. ही गृहिते खरी ठरली तर गुणकाची कार्यवाही योग्य प्रकारे होते. ही गृहिते प्रत्यक्षात दिसून आली नाही / काही प्रमाणातच पूर्ण झाली तर गुणकाच्या कार्यवाहीस मर्यादा पडतात. गुणकाची गृहिते / मर्यादा) पुढीलप्रमाणे.

**1) उपभोग्य वस्तूची उपलब्धता:** उपभोग्य वस्तू पुरेशा प्रमाणात उपलब्ध असतील तर मिळालेले उत्पन्न उपभोग्य वस्तुंवर खर्च होईल. मात्र उपभोग्य वस्तू उपलब्ध नसतील तर उत्पन्न मिळणाऱ्यांना पाहिजे तेवढ्या प्रमाणात ते उपभोग्य वस्तुंवर खर्च करता येणार नाही. त्यामुळे उत्पन्न प्रसाराची प्रक्रिया कमी वेगाने होईल.

**2) गुंतवणुक सातत्य:** गुणकाच्याद्वारे उत्पन्नात सातत्यपूर्ण वाढ होण्यासाठी गुंतवणुकीत सातत्य असणे आवश्यक आहे. गुंतवणुकीच्या सातत्यात अडथळा आला तर राष्ट्रीय उत्पन्न पुन्हा मूळ पातळीला येईल. नवीन गुंतवणुकीचा प्रवाह सातत्यपूर्ण राहणे गुणकाची कार्यवाही योग्य प्रकारे होण्यासाठी आवश्यक आहे. तसेच गुंतवणुकीत निव्वळ वाढ झाली पाहिजे.

**3) प्रेरित गुंतवणुक अभाव:** गुणकाचे वास्तविक मूल्य समजण्यासाठी प्रेरित उपभोगाचा गुंतवणुकीवर परिणाम होत नाही असे गृहित धरले आहे. याचाच अर्थ प्रवेगाची कार्यवाही होत नाही व त्यामुळे मूळ रकमेने गुंतवणुकीत वाढ होते. प्रवेगाची कार्यवाही झाल्यास गुणकाचे मूल्य पूर्वीच्या तुलनेत जास्त राहील.

**4) सीमांत उपभोग प्रवृत्ती:** गुणकाचे वास्तविक मूल्य समजण्यासाठी उत्पन्न प्रसाराच्या प्रक्रियेत सीमांत उपभोग प्रवृत्तीत बदल होत नाही असे गृहित धरावे लागते. गुणक सीमांत उपभोग प्रवृत्तीवर अवलंबून असतो. जर काही कारणामुळे सीमांत उपभोग प्रवृत्तीत बदल झाला तर गुणकाच्या मूल्यात बदल होईल.

**5) बंदिस्त अर्थव्यवस्था:** गुणकाचे पूर्ण मूल्य समजण्यासाठी अर्थव्यवस्था बंदिस्त आहे असे गृहित धरणे आवश्यक असते. याचाच अर्थ देशाचे जगातील इतर देशांशी व्यापारी संबंध नाहीत असे गृहित धरले आहे. जर देशाचे जगातील इतर देशांशी व्यापारी संबंध असतील तर गुणकाच्या मूल्यात वाढ किंवा घट होऊ शकते. देशाची निर्यात आयातीपेक्षा जास्त असल्यास उत्पन्नाच्या प्रवाहात निव्वळ भर पडून गुणकाचे मूल्य

SYBCom-B.Eco-DBC

अपेक्षित मूल्यापेक्षा जास्त असेल. याउलट स्थितीत, देशाची आयात निर्यातीपेक्षा जास्त असेल तर उत्पन्नाच्या प्रवाहातून गळती होऊन गुणकाचे मूल्य अपेक्षित मूल्यापेक्षा कमी असेल.

6) **उत्पन्न व खर्च यात कालापव्यय:** गुणकाचे पूर्ण मूल्य समजण्यासाठी उत्पन्न मिळणे व ते खर्च करणे यात कालापव्यय होत नाही असे गृहित धरलेले आहे. उपभोक्ते त्यांना मिळालेले उत्पन्न ताबडतोब खर्च करतात असे यातून सूचित होते. मात्र प्रत्यक्ष व्यवहारात असे घडत नाही. उपभोक्त्यांना उत्पन्न मिळणे व त्यांनी खर्च करणे यात अंतर पडते. जर यात मोठ्या प्रमाणात अंतर पडले तर गुणकाचा प्रभाव कमी राहील.

7) **अपूर्ण रोजगार:** अर्थव्यवस्थेत ऐच्छिक बेकारी अस्तित्वात आहे असेही गुणकाचे गृहित आहे. ऐच्छिक बेकारी अस्तित्वात असेल तर गुणकाच्या कार्यवाहीने उत्पन्न, उत्पादन व रोजगार यात सातत्यपूर्ण वाढ होत राहील. पूर्ण रोजगाराची स्थिती गाठली तर उत्पन्न, उत्पादन व रोजगार यात वाढ होणार नाही.

**गळती:**

गुणक प्रक्रियेतील गळतीमुळे नवीन गुंतवणुकीचा होणारा गुणक परिणाम कमी प्रमाणात होतो कारण गळतीमुळे उत्पन्न प्रवाहातून उत्पन्न बाजूला काढले जाते. महत्त्वाच्या गळती पुढीलप्रमाणे आहेत.

1) **बचत:** बचत ही गुणक प्रक्रियेतील अतिशय महत्त्वाची गळती आहे. सीमांत उपभोग प्रवृत्ती एकपेक्षा कमी असल्याने सर्व उत्पन्न उपभोगावर खर्च होत नाही. उत्पन्नाच्या काही भागाची बचत केली जाते. सीमांत बचत प्रवृत्ती जेवढी जास्त तेवढे गुणकाचे मूल्य कमी येते.

2) **तीव्र रोखता पसंती:** तीव्र रोखता पसंती असल्याने लोक वाढलेले उत्पन्न व्यवहार, सावधगिरी व लाभ हेतूसाठी निष्क्रिय रोख शिल्लक स्वरूपात धारण करीत असतील, तर ती उत्पन्न प्रवाहातील गळती ठरते.

3) **जुने रोखे खरेदी:** वाढलेल्या उत्पन्नाचा काही भाग उपभोगावर खर्च करण्याऐवजी जुन्या रोख्यांच्या खरेदीसाठी वापरला, तर त्यामुळे उत्पन्नात होणारी वाढ पूर्वीपेक्षा कमी असेल. दुसऱ्या शब्दात सांगावयाचे झाल्यास, जेव्हा लोक जुने रोखे खरेदी करतील तेव्हा गुणकाचा आकार कमी होईल.

4) **कर्जाची परतफेड:** वाढलेल्या उत्पन्नाचा काही भाग बँकांकडून घेतलेल्या कर्जाच्या परतफेडीसाठी वापरला, तर तेवढ्या प्रमाणात रक्कम उत्पन्न प्रवाहातून काढून घेतली जाईल. त्यामुळे गुणकाचा आकार कमी होईल.

5) **आयात:** अर्थव्यवस्था खुली असेल, तर वाढलेल्या उत्पन्नाचा काही भाग आयात वस्तूंवर खर्च केला जाणे शक्य आहे. आयातीवर खर्च झालेल्या उत्पन्नामुळे परकीय देशात उत्पन्न वाढ होईल. मात्र, देशांतर्गत अर्थव्यवस्थेत उत्पन्न व उत्पादन यात वाढ होत नाही.

6) **किमत वाढ:** किंमत चलनवाढ ही गुणकाच्या कार्यवाहीतील महत्त्वाची गळती आहे. उपभोग्य वस्तूंच्या किंमतीतील वाढ त्यांच्यावर अधिक खर्च केला जात असल्याचे सूचित करते. त्यामुळे वाढलेले उत्पन्न उच्च किमतीने शोषले जाते आणि वास्तव उपभोग व उत्पन्नात घट होते.

7) **कर आकारणी:** प्रगतीशील करांमुळे करदात्याचे खर्चयोग्य उत्पन्न घटते व त्यांच्या उपभोग खर्चात घट होते. वाढती करआकारणी उत्पन्नाच्या प्रवाहात घट घडवून आणते आणि गुणकाचा आकार कमी करते.

वरील विविध बाबींमुळे उत्पन्न प्रवाह कमी होऊन गुणकाचा प्रभाव मर्यादित होतो.

केन्सनंतरच्या काळातील अर्थशास्त्रज्ञांनी गुणक सिद्धांतावर टीका केली आहे. गुणक सिद्धांताची एक उणीव अशी की, हा सिद्धांत गुंतवणुकीच्या उपभोग खर्चाच्याद्वारे उत्पन्नावर होणाऱ्या परिणामाचा अभ्यास करतो परंतु, उपभोगाच्या गुंतवणुकीवर होणाऱ्या परिणामाकडे हा सिद्धांत दुर्लक्ष करतो. गुणक संकल्पना उपभोगावर मोठ्या प्रमाणात भर देते.

**गुणक संकल्पनेचे महत्व:**

गुणकाची संकल्पना हे केन्सचे उत्पन्न व रोजगार सिद्धांतास महत्त्वाचे योगदान आहे. गुणक संकल्पना अनेक दृष्टीने महत्त्वाची आहे. गुणक संकल्पनेचे महत्त्व पुढीलप्रमाणे.

1) **गुंतवणुकीचे महत्त्व:** गुणक सिद्धांताने उत्पन्न व रोजगार सिद्धांतातील गुंतवणुकीचे महत्त्व स्पष्ट केले आहे. अल्पकाळात उपभोग फलन स्थिर असल्याने उत्पन्न व रोजगार यातील चढउतार गुंतवणुकीच्या दरातील चढउतारांमुळे घडून येतात.

**2) व्यापार चक्र:** गुणक ही संकल्पना व्यापार चक्राचे स्पष्टीकरण देण्यास उपयोगी पडते. जेव्हा गुंतवणुकीत घट होते, तेव्हा उत्पन्न व रोजगार यात घट होऊन अपसरण घडून येते व पुढे मंदी येते. याउलट, गुंतवणुकीतील वाढ तेजी निर्माण होण्यास कारणीभूत ठरते.

**3) बचत-गुंतवणूक:** गुणक संकल्पना बचत व गुंतवणूक यात समानता प्रस्थापित करण्यास उपयोगी पडते. जर बचत व गुंतवणूक यात तफावत पडली आणि गुंतवणूक अधिक झाली, तर गुंतवणुकीतील वाढीमुळे गुणक प्रक्रियेद्वारा उत्पन्नात सुरुवातीस झालेल्या गुंतवणुकीतील वाढीपेक्षा अधिक वाढ होते. उत्पन्नातील वाढीमुळे बचतीत वाढ होते व ती गुंतवणुकीबरोबर होते.

**4) आर्थिक धोरण:** आर्थिक धोरण निश्चित करताना गुणक संकल्पनेचा उपयोग होतो. पूर्ण रोजगार प्रस्थापित करणे, व्यापारचक्र नियंत्रित करणे, सार्वजनिक गुंतवणूक, तुटीचा-अर्थभरणा अशा धोरणांच्या बाबतीत ही संकल्पना उपयोगी पडते.

## 4.6 प्रवेग तत्त्व:

केन्स यांनी मांडलेली गुणक संकल्पना गुंतवणुकीत वाढ झाली असता उत्पन्नात गुंतवणुकीत झालेल्या वाढीच्या अनेक पटीत वाढ होत असल्याचे स्पष्ट करते. दुसऱ्या बाजूला केन्सने विचारात घेतली नाही, अशी प्रवेग संकल्पना असून केन्सनंतर व्यापार चक्र आणि आर्थिक वृद्धीच्या सिद्धांताच्या चर्चेत तिचा वापर करण्यात आला. ही संकल्पना गुणकाच्या विरोधी परिणाम स्पष्ट करते. सुरुवातीस 1903 मध्ये टी. एन. कार्व्हर यांनी उपभोगातील आणि निव्वळ गुंतवणुकीतील बदल यामधील संबंध मांडला. मात्र, अफटलायन यांनी 1909 मध्ये या तत्त्वाचे सविस्तर विश्लेषण केले. प्रवेग तत्त्व ही संज्ञा अर्थशास्त्रात 1917 मध्ये प्रा. जे. एम. क्लार्क यांनी प्रथम मांडली. पुढे हिक्स, सॅम्युल्सन आणि हॅरॉड यांनी व्यापार चक्राच्या संबंधात ती अधिक विकसित केली. भांडवली वस्तूंची मागणी ही उपभोग्य वस्तूच्या मागणीवर अवलंबून असते. यावर प्रवेग तत्त्व आधारित आहे. प्रवेग तत्त्व हे ज्याद्वारे उपभोग्य वस्तूच्या मागणीत झालेली वाढ (किंवा घट) भांडवली वस्तूच्या मागणीत वाढ (किंवा घट) घडवून आणते ती प्रक्रिया स्पष्ट करते. कुरिहारा यांच्या मते, "प्रवेग सहगुणक म्हणजे प्रेरित गुंतवणूक आणि उपभोगखर्चातील सुरुवातीचा बदल यामधील गुणोत्तर होय."

चिन्हाच्या रूपात,

$\beta = \Delta I / \Delta C$ किंवा $\Delta I = \beta \Delta C$.

यात, $\beta$ = प्रवेग सहगुणक,

$\Delta I$ = गुंतवणुकीतील निव्वळ बदल,

$\Delta C$ = उपभोगखर्चातील निव्वळ बदल.

उदा. जर उपभोगखर्चात 15 कोटी रुपये वाढ झाल्यामुळे गुंतवणुकीत 60 कोटी रुपये वाढ झाली, तर प्रवेग सहगुणक 4 येईल. प्रवेग तत्त्वाची कार्यपध्दती काल्पनिक उदाहरणाच्या आधारे पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

समजा, 100000 उपभोग्य वस्तूंचे उत्पादन करण्यासाठी 100 यंत्रांची आवश्यकता आहे. समजा या यंत्राचे आयुष्य 10 वर्षे आहे म्हणजेच ही यंत्रे सुस्थितीत 10 वर्षे चालू शकतात. याचाच अर्थ 100000 उपभोग्य वस्तूंचे उत्पादन सातत्याने चालू राहण्यासाठी प्रत्येक वर्षी 10 यंत्रांची पुनःस्थापना करणे आवश्यक आहे. उपभोग्य वस्तूंची मागणी स्थिर आहे असे गृहित धरले तर यंत्रांची वार्षिक मागणी 10 असेल. या मागणीचा उल्लेख 'पुनःस्थापन मागणी' असा करता येईल. जोपर्यंत उपभोग्य वस्तूंच्या मागणीत बदल होत नाही तोपर्यंत यंत्राची मागणी प्रतीवर्षी 10 एवढीच राहील. समजा उपभोग्य वस्तूच्या मागणीत 10 टक्क्यांनी वाढ झाली तर उपभोग्य वस्तूंची वाढलेली मागणी पूर्ण करण्यासाठी अधिक यंत्रांची आवश्यकता भासेल. उपभोग्य वस्तूच्या उत्पादनात वाढ करण्यासाठी 10 % किंवा 10 यंत्रांची गरज असेल. यंत्रांची वार्षिक मागणी पूर्वीसारखी 10 नसेल तर ती 20 (10 पुनःस्थापनासाठी आणि 10 वाढलेल्या उपभोग्य वस्तुंची मागणी पूर्ण करण्यासाठी) एवढी असेल. यंत्राची मागणी 10 वरून 20 होईल म्हणजेच मागणीत 100 टक्के वाढ होईल. येथे हे लक्षात घ्यावे लागेल व ते म्हणजे उपभोग्य वस्तूच्या मागणीत 10 टक्के म्हणजेच तुलनेने अल्प वाढ झाली असता यंत्राच्या मागणीत 100 टक्के वाढ होते. यंत्राचे उत्पादन करणाऱ्या उद्योगातील रोजगारात दुप्पट वाढ होईल. उपभोग्य वस्तुंच्या उद्योगातील रोजगाराच्या तुलनेत यंत्राचे उत्पादन करणाऱ्या उद्योगातील रोजगारात अधिक चढउतार अनुभवास येतात. प्रवेग तत्त्व असे स्पष्ट करते की, भांडवली वस्तू उद्योगातील बदलाच्या तुलनेत

SYBCom-B.Eco-DBC

उपभोग्य वस्तू उद्योगातील बदल अधिक प्रमाणात असतात. वर स्पष्ट केलेल्या काल्पनिक उदाहरणात प्रवेग 10 आहे. याचा अर्थ उपभोग्य वस्तूच्या मागणीत 10 टक्क्यांनी वाढ झाली असता यंत्राच्या मागणीत उपभोग्य वस्तूच्या मागणीतील वाढीच्या 10 पट वाढ होते.

**प्रवेग तत्वाची गृहीते:**

1) स्थिर भांडवल उत्पादन गुणोत्तर आहे.
2) उत्पादनवाढीसाठी आवश्यक भांडवली साधनसामग्री उपलब्ध होते.
3) संयंत्रात अतिरिक्त क्षमता उपलब्ध नाही.
4) मागणीतील वाढ कायम स्वरूपाची आहे.
5) पत व भांडवलपुरवठा लवचिक आहे.
6) उत्पादनातील वाढीमुळे निव्वळ गुंतवणुकीत ताबडतोब वाढ घडून येते.

**प्रवेग तत्वावरील टीका:**

अर्थशास्त्रज्ञांनी प्रवेग तत्त्वावर मोठ्या प्रमाणावर टीका केली आहे. प्रवेग तत्त्वाची गृहीते चुकीची असल्याने त्याच्या कार्यवाहीस मर्यादा पडतात. प्रवेग तत्त्वाच्या बाबतीतील उणिवा पुढीलप्रमाणे.

**1) भांडवल उत्पादन गुणोत्तर:** प्रवेग तत्त्व स्थिर भांडवल उत्पादन गुणोत्तरावर आधारलेले आहे. मात्र, हे गुणोत्तर स्थिर राहत नाही. व्यापार चक्राच्या विविध अवस्थांत भांडवल उत्पादन गुणोत्तरात बदल होतो.

**2) साधनसामग्रीची उपलब्धता:** प्रवेग तत्त्वाने साधनसामग्रीची उपलब्धता गृहीत धरलेली आहे. हे अर्थव्यवस्थेत जोपर्यंत बेरोजगार आहे तोपर्यंतच शक्य आहे; परंतु जेव्हा अर्थव्यवस्थेत पूर्ण रोजगार प्रस्थापित होतो तेव्हा साधनसामग्रीच्या विस्ताराअभावी भांडवली वस्तू उद्योगांचा विस्तार होऊ शकत नाही.

**3) संयंत्र क्षमता:** प्रवेग तत्त्वाने असे गृहीत धरले आहे की, संयंत्राच्या क्षमतेचा पूर्णपणे वापर केला जातो. मात्र, जर काही यंत्राचा पूर्णपणे वापर केला जात नसेल, तर अशा स्थितीत उपभोग्य वस्तूंची मागणी वाढल्यास भांडवली वस्तूंच्या मागणीत वाढ होणार नाही.

**4) तात्पुरती कायम मागणी:** प्रवेग तत्त्व आणखी असेही गृहीत धरते की, वाढलेली मागणी ही कायम स्वरूपाची आहे. मात्र, उपभोग्य वस्तूंच्या मागणीतील वाढ तात्पुरत्या स्वरूपाची असेल, तर उत्पादक नवीन भांडवली वस्तूत गुंतवणूक करणार नाही.

**5) लवचिक पतपुरवठा:** प्रवेग तत्त्व लवचिक पतपुरवठा गृहीत धरते. भांडवली वस्तू उद्योगात गुंतवणुकीसाठी स्वस्त दराने पतपुरवठा होतो, असे येथे मानले आहे. मात्र, पुरेशा प्रमाणात स्वस्त पतपुरवठा उपलब्ध झाला नाही, तर भांडवली वस्तूतील गुंतवणूक मर्यादित राहील.

**6) निर्णयप्रक्रियेतील अपेक्षा:** प्रवेग तत्त्वाने उद्योजकाच्या पातळीवरील निर्णयप्रक्रियेतील अपेक्षांच्या भूमिकेकडे दुर्लक्ष केले आहे. गुंतवणूक निर्णयावर केवळ मागणीचाच प्रभाव पडत नाही तर राजकीय बदल, आंतरराष्ट्रीय घटना, आर्थिक वातावरणाच्या भावी अपेक्षांचाही प्रभाव पडतो .

**7) तंत्रज्ञान:** प्रवेग तत्त्वाने गुंतवणुकीच्या बाबतीतील तंत्रज्ञानविषयक घटकांच्या भूमिकेकडे दुर्लक्ष केले आहे. तंत्रज्ञानविषयक बदल एक तर भांडवलाची बचत करणारे असतात किंवा श्रमाची बचत करणारे असतात. त्यामुळे ते गुंतवणुकीत वाढ किंवा घट होण्यास जबाबदार ठरतात. अशा प्रकारे, प्रवेग तत्त्वाच्या बाबतीत काही उणिवा असल्या तरी हे तत्त्व गुणक सिद्धांतापेक्षा उत्पादनवाढीच्या प्रक्रियेचे अधिक स्पष्ट व वास्तववादी स्पष्टीकरण देते. उत्पन्न आणि रोजगार यांतील मोठ्या प्रमाणावर चढ-उतार हे भांडवली वस्तू उद्योगातील चढ-उतारामुळे घडून येत असल्याचे प्रवेग तत्त्व स्पष्ट करते; परंतु हे तत्त्व खालच्या वळण बिंदूपेक्षा वरच्या वळण बिंदूचे स्पष्टीकरण अधिक चांगले देते.

*****************************************************************************

संदर्भ ग्रंथ: (1) समग्रलक्षी अर्थशास्त्र- डॉ. मुकुंद महाजन, निराली प्रकाशन, ऑगस्ट 2003
(2) समग्रलक्षी अर्थशास्त्र प्रा. डॉ. राजेंद्र रसाळ, सक्सेस प्रकाशन, जुन 2014

SYBCom-Sem3-DBC

| | |
|---|---|
| Filename: | SYBCom-Eco-Sem3 |
| Directory: | C:\Users\Sampada\Documents |
| Template: | C:\Users\Sampada\AppData\Roaming\Microsoft\Templates\Normal.dotm |
| Title: | |
| Subject: | |
| Author: | Sampada |
| Keywords: | |
| Comments: | |
| Creation Date: | 8/1/2020 1:52:00 PM |
| Change Number: | 27 |
| Last Saved On: | 8/24/2020 6:35:00 PM |
| Last Saved By: | Sampada |
| Total Editing Time: | 357 Minutes |
| Last Printed On: | 8/24/2020 6:37:00 PM |

As of Last Complete Printing

| | |
|---|---|
| Number of Pages: | 46 |
| Number of Words: | 22,336 (approx.) |
| Number of Characters: | 127,318 (approx.) |

SYBCom–B.Eco–DBC